# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १४/२००५.** **दिनांक २.१०.२००५.**
**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.३० वाजता.**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक २ ऑक्टोबर, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१०५७९-२००५, दि. २४ सप्टेबर,२००५ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक २ ऑक्टोबर, २००५ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील. | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. | ०६. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे. |
| ०७. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | ०८. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ०९.. | मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर. | १०. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय |
| ११. | मा. डॉ. पी. एल. तिवारी. | १२. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते. |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री.प्रकाश रामदास काळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव, मा.श्री समि खतिब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा. डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांचे आलेल्या दूरध्वनी निरोपाची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीस मा.कार्यकारी अधिकारी यांनी विद्यमान व्यवस्थापन समितीने दि.२३.८.२००४ पासून श्रीसाईबाबा संस्थानचा कारभार हाती घेतला आहे. तेंव्हापासून आजपर्यंतचे वर्षभरात पूर्ण केलेली कामे, चालू असलेली कामे, नियोजित कामे व संस्थान कामकाजात केलेली सुधारणा याबाबतचा अहवाल सभागृहात वाचून दाखविला, यावर सभेने टाळ्या वाजवून मा.कार्यकारी अधिकारी यांचे अभिनंदन केले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.१८.९.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५७९** व्यवस्थापन समितीचे दि.१८.९.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविणत आल्या होत्या,त्याची नोंद घेत असतांना पुढीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**निर्णय क्र.४८० मध्ये-**

बँक खाती बंद करावयाच्या बँकामध्ये खालील बँकाची नांवे वगळण्यात यावीत.
०१) अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँक लि., शिर्डी
०२) सिंडीकेट बँक,शिर्डी (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**निर्णय क्र.५०८ मध्ये -**

श्री साईबाबा दैनंदिनी-२००६ व श्री साईबाबा दिनदर्शिका -२००६ छपाईकामी तयार करणेत आलेल्या तुलनात्मक तक्त्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.
०१) श्री साईबाबा दैनंदिनी -२००६ मागणी -५०,००००
०२) श्री साईबाबा दिनदर्शिका -२००६ (६ शिटर्स) मागणी -७५,००००
०३) श्री साईबाबा दिनदर्शिका -२००६ (सिंगल शिट) मागणी -२०,००००

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

०१) श्री साईबाबा दैनंदिनी -२००६ मागणी -५०,०००
०२) श्री साईबाबा दिनदर्शिका -२००६ (६ शिटर्स) मागणी -७५,०००
०३) श्री साईबाबा दिनदर्शिका -२००६ (सिंगल शिट) मागणी -२०,०००

**तसेच शेवटचा परिच्छेद-**

सभेत कोटेशनसादरकर्त्यांनी तयार केलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकांचे नमुन्यांची मा.सदस्यांनी समक्ष पहाणी करुन, श्रीसाईबाबा दैनंदिनी-२००६ व श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ (सिंगल शिट) करिता मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे व मे.मेग्ना ग्राफीक्स इं.लि.,मुंबई यांचे दर मान्य करण्यात येऊन, मे.मेग्ना ग्राफीक्स इं.लि.,मुंबई यांना एकूण पुरवठ्याच्या ६० % व मे.महाराष्ट्र सहकारी

मुद्रणालय, पुणे यांना४०% पुरवठा आदेश देण्यात यावा. तत्पुर्वी व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या ६०% व ४०% या प्रमाणात छपाई करुन देणेबाबत त्यांची लेखी संमती घेऊन नंतरच छपाई आदेश देण्यात यावेत.

तसेच श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ (६ शिटर्स) करिता मे.मेग्ना ग्राफीक्स इं.लि.,मुंबई यांचे दर मान्य करण्यात येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

**याऐवजी**

सभेत कोटेशनसादरकर्त्यांनी तयार केलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकांचे नमुन्यांची मा.सदस्यांनी समक्ष पहाणी करुन, श्री साईबाबा दैनंदिनी -२००६चे छपाईचे काम मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे यांचे दर मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून सर्व श्री साईबाबा दैनंदिनी-२००६ ची छपाई करुन घेण्यात यावी. तसेच दिनदर्शिका-२००६ सिंगल सिटर व सिक्स सिटर्सचे अनुक्रमे २० हजार नग व ७५ हजार नग छपाईचे सर्व काम मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि.मुंबई यांचे दर मान्य करणेत येऊन सदरहू काम त्यांचेकडून करुन घेण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**निर्णय क्र.५४५ मध्ये -**

अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून श्री पी.आर.भंडारी ॲण्ड असोसिएटस्, कोपरगांव व मे.बी.जी.गायकवाड ॲण्ड कंपनी, अहमदनगर यांचे नांवाचा समावेश करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

**विषय नं.०२.** **दिनांक १०.९.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय निवड समितीचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.५८०** दिनांक १०.०९.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय निवड समितीचे सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व विश्वस्तांना पुरविण्यात आल्या होत्या त्याची नोंद घेण्यात येऊन ते सोबत **परिशिष्ट "अ" म्हणून** ठेवण्यात आले आहे. या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्ठी देण्यात आली.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) या माध्यमातून चालविण्यात येणा-या रुग्णालयासाठी खालील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या थेट प्रत्यक्ष मुलाखती (Walk- in -interview) बाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन उमेदवारांना दि.१०/०९/२००५ रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत बोलविण्यात आले होते. या उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी सर्व मा.विश्वस्तांना जा.क्र.एसएसएस-वशी-०४-९७५२-२००५, दि.८.९.२००५ अन्वये कळविण्यात आले होते.

| Sr.No | Name of the post | No.of posts | Sr.No | Name of the post | No.of posts |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Cardiac Surgeon<br>M.S.M.Ch.(C.V.T.S.)F.R.C.S. (Cvst) | 01 | 02. | Neuro Surgeon<br>M.S.M.Ch.(Neuro) | 01 |
| 03. | Onco Surgeon<br>M.S.M.Ch.(Onco)D.Onco | 01 | 04. | Plastic Surgeon<br>M.S.M.Ch.(Plastic) | 01 |
| 05. | Paed Surgeon<br>M.S.M.Ch.(Paed) | 01 | 06. | Maxillo Facial Surgeon<br>M.S.M.(Surgery) | 01 |
| 07. | Cardiac Physician<br>M.D.D.M.(Card) | 01 | 08. | Physician Nephrology<br>M.D.D.M.(Nephro) | 01 |
| 09. | Intensivist<br>M.D/Medicine M.D/Anaesthesia | 01 | 10.. | Gen Surgeon<br>M.S. (Gen.surgeon) | 03 |
| 11. | E.N.T.Surgeon<br>M.S (E.N.T) | 01 | 12. | Ophthalmogists<br>M.S.(Ophthalmogists) | 02 |
| 13. | Ortho Surgeon<br>M.S.(Ortho.) | 01 | 14. | Gen.Physician<br>M.D.(Medicine) | 03 |
| 15. | Ob & Gynecologists<br>M.D/M.S (Ob.&Gy.) | 02 | 16. | Radiologists CT Scan & X-ray (01 Senior, 01 Junior ) M.D. (Radiology) | 02 |
| 17. | Sonologist<br>M.D.(Sonology) | 01 | 18. | Paediatrician<br>M.D.(Paed.) | 02 |
| 19. | Dermatologist<br>M.D.(Skin &V.D.) | 01 | 20. | Anaesthesiologists<br>M.D.(Anaesthesia)D.A. (Anaesthesia) | 8+8=16 |
| 21. | Pathologist<br>M.D.(Pathology) | 01 | 22. | Resident Doctor<br>M.B.B.S.+Clinical Diploma | 22 |
| 23. | B.T.O<br>M.B.B.S. F.D.A. Recognition | 02 | | | |

त्यानुसार या मुलाखती घेणेकामी रुग्णालय निवड समितीचे अध्यक्ष व संस्थान व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.डॉ.पी.एल.तिवारी; उपस्थित होते. तसेच इतर सदस्यांपैकी मा.श्री सुरेश वाबळे, मा.कार्यकारी अधिकारी हे ही उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

**वरील मुलाखतीत एकंदर ४० उमेदवारांनी भाग घेतला. त्याचा तपशील खालील प्रमाणे.**

**१) कार्डिॲक सर्जन** - एकूण जागा- ०१ हजर उमेदवार- ०१

डॉ.प्रकाश सी.मारपकवार, एम.एस.,एम.सी.एच.(कार्डिॲक सर्जन), पुणे यांची निवड करण्यात आली आहे व त्यांना ताबडतोब रुजू होण्यासाठीचे आदेश मुलाखतीत देण्यात आला आहे. त्यांनी कमीत कमी

रुपये ३० हजारापेक्षा जास्त अशी मासिक अपेक्षा केली आहे. त्यावेळी त्यांना शासनाच्या आदेशानुसार पगार ठरविण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.

**२) <u>न्यूरो सर्जन</u>** - एकूण जागा- ०१ हजर उमेदवार- ०२

०१. डॉ.के.एन.टिंगरे, औरंगाबाद, डी.एल.ओ.एम.एस.,एम.सी.एच. हे पद पूर्णवेळासाठी घेण्यास तयार होते. परंतु त्यांना मानधनाबद्दल किमान रु.५०,०००/- किंवा जास्त अशी मासिक अपेक्षा आहे. त्यांच्या बाबत निर्णय होऊ शकला नाही.

०२. डॉ.भरत गोविंद नाईक, अहमदनगर, एम.सी.पी.एस.डी.(आर्थो),एम.एस.,डी.एन.बी., एम.सी.एच. हे दुसरे उमेदवार पूर्ण वेळ देण्यास अनुकूल नव्हते. त्यांना मानद पदाची अपेक्षा आहे. मानद पदांचा विचार होतांना त्यांना मानद पदावर घेण्यात यावे असा निर्णय झाला.

**३) <u>आंको सर्जन</u> -** एकूण जागा- ०१ या पदासाठी केवळ एक उमेदवाराने अर्ज केला होता.

०१. डॉ.श्रीमती प्रतिभा बी. तिवाडे,एम.एस.(जनरल सर्जन) या जनरल सर्जन असून त्यांना या विषयातील विशेष प्राविण्य नसून रुग्णालयातील तशा कामाचा अनुभव आहे. तेव्हा त्यांना आंको सर्जन पदावर न घेता जनरल सर्जन म्हणून घेण्यात यावे असे ठरले.

**४) <u>प्लॅस्टिक सर्जन</u> -** एकूण जागा- ०१ हजर उमेदवार- ०२

०१. डॉ.मनिष पटेल,नाशिक, एम.एस.,एम.सी.एच.(प्लॅस्टिक सर्जरी) हे सध्या नाशिक येथे त्यांचा खाजगी व्यवसाय चालवितात. पहिले तीन महिने ते रुग्णालयात व नाशिक येथील व्यवसायात काम करु इच्छितात व त्यानंतर ते पूर्ण वेळ पद स्वीकारण्यास तयार आहेत. त्यांना तशी मुभा देण्यात आली आहे. नियुक्तीसाठी निवड करण्यात आली आहे.

०२. डॉ.नरेंद्र गोविंद नाईक,अहमदनगर, डी.एन.बी.,एम.एस.,एम.सी.एस. हे दुसरे उमेदवार उपस्थित होते. ते सध्या व्यवसाय करीत आहेत. त्यांना मानद सेवा देण्यात रस आहे. मानद पदे भरतांना त्यांनाही संधी देण्यात यावी असा निर्णय झाला.

**६) <u>मॅक्झिलो फेशियल सर्जन</u>** -एकूण जागा- ०१ हजर उमेदवार- ०१

०१. डॉ.सोनिया जिंदाल, पुणे, बी.डी.एस., एम.डी.एस.या पदासाठी एकच उमेदवार उपस्थित होते. त्यांनाही मानद सेवा देण्यात रस आहे. मानद पदे नियुक्तीच्या वेळी यांचा विचार व्हावा असे ठरले.

**१०) <u>जनरल सर्जन</u>** - एकूण जागा- ०३ हजर उमेदवार- ०२

या सोबत एक आंको सर्जन पदाच्या उमेदवार या श्रेणीत घेतल्या आहेत.

०१. डॉ.श्रीमती प्रतिभा तिवाडे,नाशिक,एम.एस.(जनरल सर्जन) यांची मुलाखत आंको सर्जन म्हणून घेतली गेली परंतु त्यांची निवड जनरल सर्जन म्हणून करण्यात आली आहे.

०२. डॉ.शुभेंदू भारव्दाज,शिर्डी,एम.एस.लॅप्रास्कोपी ट्रेनिंग हे मानद पदासाठी इच्छूक उमेदवार होते. मानद पदे भरतांना त्यांना कुठलेही मानधन न देता त्यांच्या रुग्णांवर या रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यासाठी संधी देण्याचे मान्य करण्यात आले आहे. इतर अटी व शर्ती नंतर ठरविण्यात येतील. दि.२९.१.२००५ रोजी यांच्या निवडीस हरकत घेण्यात आली आहे.

०३. डॉ.अजित सुभाष जेजूरकर,धामणगाव, एम.एस.(जनरल सर्जरी) यांना पूर्ण वेळ पदासाठी संधी द्यावी या विचाराने निवड करण्यात आली आहे.

**११) <u>इ.एन.टी. सर्जन</u>** -एकूण जागा- ०१ हजर उमेदवार- ०१

०१. डॉ स्नेहल नि.पाटील,शिर्डी,एम.बी.एस.,डी.ओ.आर.एल.,डी.एच.एम.यांची मुलाखत घेतली. त्यांचा अनुभव अर्हता लक्षात घेऊन त्यांना आर.एम.ओ. या श्रेणीत नियुक्ती देण्यात यावी असा निर्णय झाला.

**१२) <u>ऑफथॉल्मॉलॉजिस्ट</u>** - एकूण जागा- ०२ हजर उमेदवार- ०२

०१.डॉ.अजित यशवंत पाटील,नाशिक डी.एन.बी.,ऑफथॉल्मॉलॉजिस्ट आहेत. सुपर स्पेशालिटीचा त्यांना अनुभव नाही. सामान्य रुग्णालयासाठी त्यांना निवडण्यात आले असून प्रतिक्षा यादीवर ठेवावे असे ठरले.

०२.डॉ.रोहीत एस. कोद्रे, कोपरगाव, एम.बी.बी.एस., डी.ओ.एम.एस., एफ.आर.एस. हे संस्थान सामान्य रुग्णालयात कंत्राटी पध्दतीवर कार्यरत आहेत. त्यांच्या सेवा पूर्ण वेळ करुन कायम स्वरुपी नियुक्तीत वर्ग करण्यात याव्यात, असा निर्णय झाला.

**१३) <u>आर्थोपेडीक सर्जन</u>** -एकूण जागा- ०३ हजर उमेदवार- ०२

डॉ.प्रताप पी. गिरगुणे,अहमदनगर,एम.एस.आर्थो., व डॉ.अर्जुन वेगास,एम.एस.(आर्थो) हे यापूर्वीच्या निवड यादीत नियुक्तीसाठी निवडण्यात आलेले उमेदवार आहेत. ते सध्या संस्थान रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने काम करतात. त्यांना नियमित करुन घेऊन कायम स्वरुपी नियुक्ती देण्यात यावी असे ठरले.

**१४) <u>जनरल फिजिशियन</u>** - एकूण जागा- ०३ हजर उमेदवार- ०१

०१ डॉ.अमोल आर. हरताळकर, पुणे, एम.डी.,(जनरल मेडिसीन) हे सध्या संस्थान रुग्णालयात तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत आहेत. त्यांना यापुढे नियमित करुन कायम स्वरुपी नियुक्तीत वर्ग करण्यात यावे, असा निर्णय झाला. शासन मान्यतेनंतर हे लागू होऊ शकेल.

**१५) <u>ऑबस्ट्रेट्रिक्स व गायनॅकॉलॉजी</u>** - एकूण जागा- ०२ हजर उमेदवार- ०२

०१. डॉ.कुलदीप रविंद्र वाघ, कोपरगाव, एम.एस.(ओ.बी.जी.),डिप्लोमा इन ॲडव्हान्सड लॅप्रास्कोपीक सर्जरी इन जर्मनी यांची या पदासाठी निवड करण्यात आली.

०२. डॉ.विलास ना.कुरुडे,शिर्डी,एम.डी.(ओ.बी.जी.) सध्या संस्थान रुग्णालयात तात्पुरत्या स्वरुपाच्या नियुक्तीवर आहेत. त्यांची नियुक्ती नियमित व कायम स्वरुपी पदावर शासनाच्या मान्यतेनंतर वर्ग करावी असा निर्णय झाला

**१६) <u>रेडीओलॉजीस्ट</u>** -एकूण जागा- ०२ हजर उमेदवार- ०१

या पदासाठी डॉ.मंगेश प्र.तरटे,अहमदनगर,एम.बी.बी.एस.,डी.एम.आर.डी.,पी.जी.डी.एम.एल. एस. हे उमेदवार उपस्थित होते. त्यांची अर्हता व अनुभव पाहता त्यांना ज्युनियर रेडिओलॉजीस्ट या पदावर नियुक्त करावे असा निर्णय झाला.

**१८) <u>पेडियॅट्रिशियन</u>** - एकूण जागा- ०२ हजर उमेदवार- ०१

डॉ.शामकांत विठ्ठल शिंदे, पुणे, एम.डी.(बालरोग तज्ञ) यांना पूर्ण वेळ बालरोग तज्ञ म्हणून तात्काळ नियुक्ती करावी असा निर्णय झाला.

**१९) <u>डॅर्मटोलॉजिस्ट (त्वचारोग तज्ञ)</u>** -एकूण जागा- ०१ हजर उमेदवार- ०१

या पदासाठी एक उमेदवार डॉ.दादासाहेब एल.कांबळे,पढेगाव,एम.डी.(स्कीन) उपस्थित होते. त्यांची पूर्णवेळ पदासाठी निवड करण्यात आली. त्यांना नियुक्ती पत्र देण्यात यावे असे ठरले.

**२०) <u>ॲनेस्थेशिऑलॉजिस्ट</u>** एकूण जागा- १६ हजर उमेदवार- ०६

या पदासाठी एकूण सहा उमेदवार उपस्थित होते. त्यातील दोन M.D. अर्हतेचे व इतर चार D.A. अर्हताधारक होते.

०१. डॉ.दिपक आर.भुजबळ,बार्शी,एम.बी.बी.एस.,डी.ए. यांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र द्यावे असे ठरले.

०२.डॉ.सचिन दि.खोचीकर,देवराक्षेत्र, एम.बी.बी.एस.,डी.ए.यांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र द्यावे असे ठरले.

०३.डॉ.विनोद व्ही.खर्डे,लोणी,एम.बी.बी.एस.,डी.ए., यांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र द्यावे असे ठरले.

०४.डॉ.आरती बी.मुरडे,श्रीरामपूर,एम.बी.बी.एस.डी.ए., यांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र द्यावे असे ठरले.

०५.डॉ.एस.पी.तांबे हे M.D. अर्हता धारक असून त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती करावी असा निर्णय झाला.

०६. डॉ.अभय वि.अनूरकर शिर्डी, हे M.D. अर्हता प्राप्त असून सध्या संस्थान सेवेत तात्पुरत्या नियुक्तीवर आहेत. त्यांना पूर्ण वेळ व नियमित स्वरुपात नियुक्ती देण्यात यावी असा निर्णय झाला.

**२२) <u>रेसिडेंट मेडीकल ऑफिसर</u>** -एकूण जागा- २२ हजर उमेदवार- १५

या पदासाठी एकूण १५ उमेदवारांना मुलाखतीची संधी देण्यात आली. डॉ.स्नेहल नि.पाटील यांनी ENT पदासाठी अर्ज केला होता. त्यांनाही याच पदासाठी निवडण्यात आले. असे एकंदर १६ उमेदवार निवडण्यात आले. किमान MBBS व त्यावरील अर्हतेचाच यात विचार करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | डॉ. भिमराव ग.कांबळे, कोरची, | एम.बी.बी.एस. |
| ०२. | डॉ.भागवत के.जे.,मातोरी, | एम.बी.बी.एस. |
| ०३. | डॉ.उल्हास गो. पवार, नाशिक, | एम.बी.बी.एस. |
| ०४. | डॉ.दिनेश श्री. कोडसकर, औरंगाबाद, | एम.बी.बी.एस.,टी.डी.डी.,ए.एफ.आय.एच. |
| ०५. | डॉ.उषा वि. कोळपे, लातुर, | एम.बी.बी.एस.,डी.जी.ओ. |
| ०६. | डॉ.वैशाली ल. क्षीरसागर ,नाशिक , | एम.बी.बी.एस.,डी.जी.ओ. |
| ०७. | डॉ.वीणा शां लोढा, पुणे, | एम.बी.बी.एस. |
| ०८. | डॉ.शेख मुसा चांद, नाशिक, | एम.बी.बी.एस. |
| ०९. | डॉ.अभय पी.चंदनशीव,धुळे, | एम.बी.बी.एस. |
| १०. | डॉ.गणेश बी.सोनवणे, पिंपळनेर, | एम.बी.बी.एस. |
| ११. | डॉ.चैतन्य बी.तांबे ,विजापूर, | एम.बी.बी.एस.,सी.पी.एस.,डी.जी.ओ. |
| १२. | डॉ.अजयकुमार बी.धोंगडे ,औरंगाबाद, | एम.बी.बी.एस.,डी.आर्थो |
| १३. | डॉ.राजेंद्र बी.पारखे, राहाता, | एम.बी.बी.एस. |

१४. डॉ.नितीन अ.तुपे, राहाता, एम.बी.बी.एस.
१५. डॉ.दीपाली तांबे ,विजापूर, एम.बी.बी.एस.
१६. डॉ.श्रीमती स्नेहल पाटील, धुळे, एम.बी.बी.एस., डी.ओ.आर.एल

दि.२९-३० जानेवारी २००५ रोजी झालेल्या मुलाखतीत निवडलेले ५ उमेदवार धरुन एकूण २१ उमेदवार निवडले आहेत.

नियोजित रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या सेवकांचा आकृतीबंध तयार करुन तो शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. त्यास शासनाची मान्यता होणे बाकी आहे. संस्थानचे नियोजित "श्री साईबाबा हॉस्पिटल" तातडीने सुरु करणे असल्याने उपरोक्त प्रमाणे नियुक्तीसाठी निवड केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्वरीत नेमणूका देणे आवश्यक आहे. तथापि, सदरचे पदांना अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने सदरहू उमेदवारांना कायम आस्थापनेवर-वेतनश्रेणीवर नेमणूका देता येणार नाहीत. त्यामुळे आवश्यकतेनुसार वरिष्ठ प्रशासक,रूग्णालये यांचे शिफारसीनुसार मा. कायदेशीर सल्लागार ॲड.श्री.अशोक पाटील यांचे सल्ल्यानुसार अत्यावश्यक वैद्यकीय अधिकाऱ्यांना केवळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूका देण्यांत याव्यात. वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी संबंधितांना द्यावयाचे मानधनाची रक्कम निश्चित करुन सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा. शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर नेमणूका करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना संस्थानचे हॉस्पिटलमध्ये कायम आस्थापनेवर, विहित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात.

कार्डिओलॉजिस्ट व रेडीओलॉजिस्ट यांना तात्काळ नेमणूक देऊन रुजू करुन घेण्यात यावे. इतर निवडलेल्या डॉक्टर्सना सुमारे १ ऑक्टोबर २००५ पासून रुजू होण्यास नियुक्ती आदेश देण्यात यावेत. इतर पदांसाठी उमेदवार न मिळाल्यामुळे या पदासाठी येणा-या अर्जाचा वेळोवेळी विचार व्हावा योग्य आढळल्यास निवड करण्यात यावी अशीही शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं.०३. व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ व दि.१८.०७.२००५ रोजी अनुक्रमे शिर्डी व मुंबई येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.५८१.** व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ व दि.१८.०७.२००५ रोजी अनुक्रमे शिर्डी व मुंबई येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेली व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. जमाखर्च तक्ता ऑगस्ट,२००५**

**निर्णय क्र.५८२. (A).** माहे ऑगस्ट,२००५ मधील जमा-खर्चाचे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे ऑगस्ट, २००५ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. ५८२. (B).** माहे ऑगस्ट, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३. माहे ऑगस्ट, २००५ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ५८२. (C).** माहे ऑगस्ट, २००५ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. माहे ऑगस्ट, २००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ५८२. (D).** माहे ऑगस्ट, २००५ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीचे तपशीलवार विवरण, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ५८२. (E).** माहे २६ ऑगस्ट , २००५ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे**

**निर्णय क्र. ५८२. (F).** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र. ५८२. (G).** माहे सप्टेबर,२००५ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे. एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०८. माहे ऑगस्ट, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ५८२. (H).** माहे ऑगस्ट, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या लिलावाद्वारे झालेल्या विक्रीच्या अहवालाची, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०९. माहे ऑगस्ट, २००५ मध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ५८२. (I).** माहे ऑगस्ट, २००५ मध्ये रुपये २५, ०००/- चे मर्यादेत मा. कार्यकारी अधिकारी, यांचे मान्यतेने विविध आवश्यक बाबींवर करण्यात आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**१०. रुग्णालयातील रुग्णांना माहे ऑगस्ट, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ५८२. (J).** माहे ऑगस्ट,२००५ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५. संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बिले.**

**निर्णय क्र. ५८३.** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबूत असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने मंजूर होतो. पण ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाळू नाथा शेज्वळ | ९४१६.०० | ९४१६.०० |
| २ | श्री. वसंत नाना जेजूरकर | ९७६३.०० | ७६५०.०० |
| ३ | डॉ. एस. बी. गोंदकर | ९३७३.०० | ९१७३.०० |
| ४ | श्री. सतिष गंगाधर बकरे | १७१७.०० | १७१७.०० |
| ५ | श्री. बाळासाहेब मुरलीधर टुपके | ४९००.०० | ४३००.०० |
| ६ | श्री. निवृत्ती शंकर शिंदे | ५६००.०० | ५६००.०० |
| ७ | श्री. पांडुरंग धोंडू दाणी | २४०९.०० | २४०९.०० |
| ८ | श्री. किसन पाराजी काटकर | १३,२४१.०० | ८५७९.०० |
| ९ | श्री. भिका उखा सावंत | ६९२४.०० | ६९२४.०० |
| १० | श्री. अरुण बारकू कोंड | १०६४७.०० | १०६४७.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.०६. सेल काऊंटर मशिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८४.** श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळेमध्ये रक्त लघवीच्या विविध प्रकारच्या तपासण्या करणेकामी सन १९९९ साली सेल काऊंटर मशिन घेण्यात आले होते. सदर मशिनचे मॉडेल DANAM मे.ॲनालॅटीकल ॲटोमेशन लि.,मुंबई यांचेकडून खरेदी रु.५,६५,३७३.२५ इतक्या किंमतीत घेतले होते.

सदर मशिन घेतल्यापासून त्यावर दररोज सरासरी ८० ते ९० तपासण्या होत असतात. त्यामुळे एकाच मशिनवर कामाचा जादा बोजा पडत असल्याने सदरचे मशिन वरचेवर नादुरुस्त होत असते. त्यांचे मुंबईहून इंजिनिअर येणे, स्पेअर्स मिळणे, दुरुस्ती इत्यादीसाठी बराच वेळ जातो. त्यामुळे प्रयोगशाळेतील तपासण्याचे काम मॅन्युअल पध्दतीने करावे लागते व पर्यायाने रुग्णांस रिपोर्ट मिळणेस उशीर होतो. म्हणून प्रयोगशाळा विभागाने त्यांचे दि.०२.०७.२००५ रोजीचे पत्रान्वये काम बंद पडू नये म्हणून पर्यायी नवीन मशिन घेण्याबाबत मागणी केली आहे. सदर मशिनबाबत प्रयोगशाळा विभागाने हे मशिन ज्यांचेकडून आपण नवीन मशिन खरेदी करु त्यांना सध्याचे जुने मशिन परत करुन

(Buyback ) त्याची किंमत नवीन मशिनच्या किंमतीतून वजावट करुन घेता येईल असे कळविले आहे.

सदर मशिनची अंदाजे किंमत रु.६,००,०००/- (रु.सहा लाख मात्र) इतकी असून सदरचे खर्चास व मशिन (Buyback )करुन नवीन मशिन खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.०७.** **श्री.भागचंद मुरलीधर ठोंबळ, कांगोणी, श्री.बाळासाहेब सोपानराव रोहम,संवत्सर, श्री.दामोदर श्रीधर जोशी,पुणे, श्री.नेजकर महमंदगौस रसुल, इचलकंरजी, श्री.मधुकर दिनकरराव जाधव, कागल, सौ.सावंत मंगल दिलीप, दहिगाव व श्री.शशिकांत राजाराम कदम,नाशिक यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मिळणेबाबतचे अर्ज.**

**निर्णय क्र.५८५.** **(१)** श्री.भागचंद मुरलीधर ठोंबळ, रा.कांगोणी यांनी दि. १८/०७/२००५ रोजीचे अर्जान्वये त्यांचे हृदयशस्त्रक्रियेकरीता संस्थानकडे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी केलेली आहे. परंतु श्री. ठोंबळ यांना यापुर्वी त्यांचे हृदयशस्त्रक्रियेकरीता संस्थानतर्फे वैद्यकीय आर्थिक अनुदान म्हणून रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र) डी.डी.नं. २३२७७५ दि. ११/०४/१९९८ अन्वये ग्रँट मेडिकल फाऊंडेशन रुबी हॉल क्लिनीक, पुणे या रुग्णालयाकडे दि. १६/०४/१९९८ रोजी पाठविण्यात आलेले आहेत.

श्री.ठोंबळ यांनी पुन्हा दुस-यांदा हृदयशस्त्रक्रियेकरीता अनुदान मागणी अर्ज केलेला असून त्यांची हृदयशस्त्रक्रिया सहयाद्री स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे या रुग्णालयात होणार आहे. त्याकरीता रु.१,२०,०००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

श्री.ठोंबळ यांचेकरीता दि. १६/०४/१९९८ रोजी पाठविलेल्या अनुदान रकमेबाबत ग्रँट मेडिकल फाऊंडेशन रुबी हॉल क्लिनीक, पुणे या रुग्णालयाकडे दूरध्वनीव्दारे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, सदर रुग्णाची शस्त्रक्रिया आमचे रुग्णालयात झालेली असून संस्थानने पाठविलेली अनुदानाची रक्कम श्री. ठोंबळ यांचे शस्त्रक्रियेकरीता वापरण्यात आलेली आहे.

तथापि श्री. ठोंबळ यांची पहिली हृदयशस्त्रक्रिया सन १९९८ मध्ये झालेली असून दुर्देवाने त्यांना दुस-यांदा शस्त्रक्रियेस सामोरे जावे लागत असून त्यांची दुसरी हृदयशस्त्रक्रिया कोकणमित्र मंडळ मेडिकल ट्रस्टचे सहयाद्री स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे या रुग्णालयात होणार आहे त्यासाठी त्यांनी संस्थानकडे अनुदान मागणी केलेली आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार एका रुग्णास एकदाच अनुदान देण्यात येते. परंतु दि.०८-०९/१२/२००१ रोजी शिरडी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं.२२ निर्णय क्र. ५९१ अन्वये एक सर्वसाधारण धोरण म्हणून, यापुढे कॅन्सरचे उपचारासाठी पुनश्च, एकूण विहित कमाल आर्थिक मर्यादेपर्यंत अनुदान देण्यास मुभा असावी असे ठरलेले आहे. यानुसार श्री. आगलावे यांना कॅन्सरचे उपचाराकरीता दुस-यांदा अनुदान देण्यात आलेले आहे.

वरील निर्णयानुसार सध्या वैद्यकीय आर्थिक अनुदान रकमेची कमाल आर्थिक मर्यादा रु. २०,०००/- एवढी आहे. म्हणजेच एका रुग्णास त्याचे दोन्ही अर्जास मिळून जास्तीत जास्त रु.२०,०००/- एवढीच रक्कम देता येते.

श्री.ठोंबळ यांना त्यांचे हृदयशस्त्रक्रियेकरीता पहिल्या अर्जास अनुसरुन रु.२०,०००/- वैद्यकीय आर्थिक अनुदान म्हणून देण्यात आलेले आहेत. त्यामुळे श्री. ठोंबळ यांना दुस-यांदा अनुदान देता येत नाही.

**(२)** श्री.बाळासाहेब सोपानराव रोहम, रा. संवत्सर यांनी त्यांची पत्नी सौ. सविता बाळासाहेब रोहम यांचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे अनुदान मागणी अर्ज केलेला आहे. अर्जासोबत उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र व शस्त्रक्रिया तारखेचे प्रमाणपत्र जोडलेले नाही.

सौ.रोहम यांचे मेंदुमध्ये रक्ताच्या गाठी झाल्याने त्यांचेवर इथापे हॉस्पिटल, संगमनेर या खाजगी रुग्णालयात मेंदुवरील शस्त्रक्रिया होणार असून त्याकरीता रु. ८०,०००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युनिसीपल रुग्णालय,सार्वजनिक धर्मादाय न्यासाने चालविलेले रुग्णालय अगर सार्वजनिक लिमिटेड कंपनीने (Public Limited Company) चालविलेले रुग्णालय यातील उपचार/शस्त्रक्रियेवरील खर्चापोटीच देण्यात येते.

सौ.रोहम यांना अनुदान देणेबाबत मा.खासदार श्री. शंकररावजी काळे यांनी शिफारस पत्र दिलेले आहे.

मा.सदस्य डॉ.ई.बी. गोंदकर यांनी दि. १२/०८/२००५ रोजी दूरध्वनीव्दारे 'यापुर्वी आपण मा. व्यवस्थापन समितीचे मंजूरीने खाजगी रुग्णालयाचे नावे अनुदानाची रक्कम दिलेली असल्याने श्री. रोहम यांचा अर्ज मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवावा' असे कळविलेले आहे.

**(३)** श्री.दामोधर श्रीधर जोशी, रा. पुणे यांनी त्यांचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे.

श्री.जोशी हे डेंगु मलेरिया या आजाराने ग्रस्त असून त्यांचेवर दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे या रुग्णालयात उपचार चालू आहेत. त्यांचे उपचाराकरीता रु. २,००,०००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री. जोशी यांचे आजाराकरीता वैद्यकीय आर्थिक अनुदान देता येत नाही. कारण सदर आजार नियमावलीत नाही.

श्री.जोशी यांना अनुदान देणेबाबत मा.ना.श्री.आर.आर.पाटील महोदय, उपमुख्यमंत्री यांनी शिफारस पत्र दिलेले असून मा. अध्यक्ष महोदय, यांनी श्री. जोशी यांचा अर्ज मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे ठेवणेबाबत दि. ०६/०८/२००५ रोजी समक्ष सूचना दिलेली आहे.

**(४)** श्री.नेजकर महमंदगौस रसुल,रा. इचलकरंजी यांनी त्यांचे हृदयशस्त्रक्रियेकरीता संस्थानकडे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि.१०/०६/२००५ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

श्री.नेजकर यांची हृदयशस्त्रक्रिया के.एल.ई.एस. हॉस्पिटल, बेळगांव या रुग्णालयात झालेली असून अर्जासोबत उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ऑपरेशन तारीख व खर्चाचे प्रमाणपत्र पाठविलेले नसल्याने तशी पुर्तता करणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/६३७०/२००५दि.१८/०६/२००५ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

श्री. नेजकर यांनी उत्पन्नाचे प्रमाणपत्र पाठविलेले आहे. मात्र रुग्णालयाचे (खर्चाचे) प्रमाणपत्र व शस्त्रक्रिया तारखेचे प्रमाणपत्र पाठविलेली नाही. परंतु रु.८५,०००/-(पावती नं. ९०८०८) दि.१४/०४/ २००५ रोजी रुग्णालयात भरल्याची पावती पाठविलेली आहे. यावरुन शस्त्रक्रिया एप्रिल महिन्यात झाल्याचे निदर्शनास येते व अर्ज दि. १०/०६/२००५ रोजी म्हणजेच उशिरा प्राप्त झालेला आहे.

तथापि, श्री. नेजकर यांना अनुदान देणेकामी मा.नामदार हसन मुश्रीफ साहेब यांनी शिफारस पत्र दिलेले असून सदरचा अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत दि. १४/०९/२००५ रोजी दूध्वनीव्दारे कळविलेले आहे.

**(५)** श्री.जाधव मधुकर दिनकरराव, रा.कागल यांनी त्यांचे हृदयशस्त्रक्रियेकरीता संस्थानकडे वैद्यकीय अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि.१६/०७/२००५ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. अर्जासोबत श्री. जाधव यांनी शस्त्रक्रियेची तारीख, उत्पन्नाचा दाखला व उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र दिलेले नाही.

सदरचे अर्जावर कार्यवाही होऊन वरील प्रमाणे सर्व कागदपत्रांची पूर्तता ऑपरेशन तारखेपासून तीस दिवसांचे आत करुन न दिल्यास अनुदान नामंजूर होईल असे श्री. जाधव यांना इकडील जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/७८००/२००५ दि.२६/०७/२००५ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

श्री.जाधव यांनी दि.१०/०८/२००५ रोजीचे पत्रासोबत शस्त्रक्रिया तारीख व उत्पन्नाच्या दाखल्याची पूर्तता केलेली असून शस्त्रक्रिया दि.६/६/२००५ रोजी झाल्याचे दर्शविलेले आहे. तसेच श्री.जाधव यांचे वार्षिक उत्पन्न रु.९९,२१६/- आहे. मात्र श्री. जाधव यांनी उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र (मूळप्रत) दिलेले नाही.

श्री.जाधव यांची शस्त्रक्रिया दि.६/६/२००५ रोजी झालेली असल्याने त्यांनी कागदपत्राची पूर्तता दि.५/७/२००५ पर्यंत करणे अत्यावश्यक होते परंतु श्री. जाधव यांचा अर्ज दि.१६/७/२००५ रोजी म्हणजेच उशिरा इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तसेच संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार 'रुग्ण व त्याचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण दरमहा उत्पन्न रुपये ७५००/- किंवा त्यापेक्षा कमी असल्यासच अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी विचारार्थ ग्राहय समजण्यात येतो.'

श्री.जाधव यांना अनुदान देणेबाबत मा.नामदार श्री. मुश्रीफ साहेब यांनी शिफारसपत्र दिलेले आहे.

**(६)** सौ.सावंत मंगल दिलीप, रा.दहीगांव यांनी त्यांचे कॅन्सरवरील उपचारा करीता संस्थानकडे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि.१६/०९/२००५ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सौ.सावंत यांचे कॅन्सरवरील उपचार Nanal Hospitals Galaxy Laproscopy Institute, Pune या खाजगी रुग्णालयात सुरू असून त्यासाठी रु.१,०००००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र संबधीत रुग्णालयाने दिलेले आहे.

मा.विश्वस्त श्रीमती उर्मिलाताई जाधव यांनी सौ.सावंत यांचे संबधीत कागदपत्रे फॅक्सने पाठविलेली असून मूळ कागदपत्रे लवकरच पाठविणार असल्याचे दूरध्वनीव्दारे कळविलेले आहे.
संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार खाजगी रुग्णालयाचे नावे अनुदान देण्यात येत नाही. तसेच आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केल्याशिवाय अनुदान देता येत नाही.

तथापि, सौ. सावंत यांना अनुदान देणेकामी मा.विश्वस्त श्रीमती उर्मिलाताई जाधव यांनी शिफारसपत्र दिलेले असून सदरचा अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत दि. १६/९/२००५ रोजी दूरध्वनीव्दारे कळविलेले आहे.

**(७)** श्री.शशिकांत राजाराम कदम, रा. नाशिक यांनी त्यांची पत्नी सौ. रेखा शशिकांत कदम यांचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि. १४/९/२००५ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. अर्जासोबत उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) दिलेले नाही.
सौ.कदम या मेंदूवरील (पॅरेलेसीस) आजाराने ग्रस्त असून त्यांचेवर लाईफ लाईन हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, नाशिक या खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत. त्यांचे उपचाराकरीता रु. २,५०,०००/- खर्च येणार असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार सौ. कदम यांचे आजाराकरीता अनुदान देता येत नाही. तसेच खाजगी रुग्णालयाचे नावे अनुदान देण्यात येत नाही.
तथापि, सौ. कदम यांना अनुदान देणेकामी मा.आमदार श्री. दिलीपराव शंकरराव बनकर यांनी शिफारस पत्र दिलेले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ.नं. २ ते ७ श्री.रोहम, श्री.जोशी, श्री.नेजकर, श्री.जाधव, सौ.सावंत व श्री.कदम यांना त्यांचे आजारावरील उपचारासाठी वैद्यकीय उपचारासाठी संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार आर्थिक अनुदान देता येत नाही. परंतू एक विशेष बाब म्हणून कागदपत्रांची पूर्तता करुन त्यांना संस्थान नियमानुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात यावे असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.०८.** **स.नं.१०७/१०९ मधील जागेत साईभक्तांसाठी डॉरमेटरी हॉल असलेली इमारत बांधणेबाबत.**

**निर्णय क्र.५८६.** शिर्डी येथील श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर परदेशातून सुध्दा दररोज हजारोंच्या संख्येने भक्त येत असतात. येणा-या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असून संस्थानची उपलब्ध निवासव्यवस्था दिवसेंदिवस अपुरी पडत आहे. शिर्डी येथे बसव्दारे मोठया गटाने येणा-या साईभक्तांसाठी डॉरमेटरी हॉल व लॉकरची व्यवस्था असलेली इमारत बांधकाम करणे आवश्यक आहे. संस्थान मालकीचे शिर्डी येथील स.नं.१०७ मधील वाहन विभागाच्या पूर्वेस असलेल्या मोकळया जागेत सदर इमारतीचे बांधकाम करण्यास व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र. २६२ अन्वये तत्वतः मान्यता देणेत आलेली आहे. तसेच आर्किटेक्ट यांचेमार्फत तपशिलवार प्लॅन व एस्टीमेट तयार करणेत यावे असे ठरले आहे.

आर्किटेक्ट भालचंद्र चावरे,नाशिक यांनी याकामी प्राथमिक आराखडा व रुपये १६,६७,६६,५००.०० मात्रचे ब्लॉक एस्टिमेट सादर केले आहे. त्यामध्ये खालील सुविधांचा समावेश आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. एकूण इमारती सहा | - | प्रत्येक इमारतीमध्ये साधारण ५०० व्यक्तींची निवासव्यवस्था | |
| २. प्रत्येक इमारती मध्ये | - | तळमजळा - २५'.०"x२५'.०" = ६२५.०० चौ.फुट | |
| | | एकूण आठ हॉल | |
| | | पहिला मजला- २९'.०"x२५'.०"=७२५.०० चौ.फुट | |
| | | एकूण आठ हॉल. | |
| | | दुसरा मजला - ३३'.०"x२५'.०"=८२५.०० चौ.फुट | |
| | | एकूण चार हॉल. | |
| | | - ३३'.०" x ३७'.०" = १२२१.०० चौ.फुट | |
| | | एकूण चार हॉल | |
| ३. स्वच्छता गृहाची व्यवस्था- | | प्रत्येक मजल्यावर - खालीलप्रमाणे | |
| स्त्रियांकरीता | - | शौचकूपे | - १२ |
| | | स्नानगृहे | - १२ |
| | | वॉश बेसिन | - १२ |
| | | गरम पाण्याचे नळ | - ०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| पुरुषांकरीता | - | शौचालये | - १२ |
| | | स्नानगृहे | - १२ |
| | | वॉशबेसिन | - १२ |
| | | युरिनलस् | - १२ |
| | | गरम पाण्याचे नळ | - ०४ |

४. हॉलमधील सुविधा - १. पुरेशी कपाटे
२. वायुविजनाकरीता पुरेशा, योग्य अशा खिडक्या
३. मार्बल मोझॅक फ्लोरींग
४. सात फुट उंचीपर्यंत सिरॅमिक टाईल्स
५. कपडे वाळत घालण्यासाठी भरपूर जागा
६. ओ.बी.डी.रंगकाम आतील बाजूस

५. वाहनतळ - विविध प्रकारच्या वाहनांकरीता सुयोग्य ठिकाणी वाहनतळ व्यवस्था.

६. पाण्याची व्यवस्था - संपूर्ण संकुलाच्या पाण्याच्या नियोजनाकरीता दोन स्वतंत्र उंच आर.सी.सी.पाण्याच्या टाक्या

७. रंगकाम - आतील बाजूस (खोल्यांमध्ये) ओ.बी.डी.रंग
बाहेरील बाजूस टेक्स रंग

८. इतर व्यवस्था - संकुलाचे प्रशासकिय कार्यालय
रांगेत उभे राहण्याकरीता जागा
साईभक्तांसाठी उत्तम, हवेशीर प्रतिक्षालय
पुरेशी (स्त्री-पुरुषांसाठी) स्वच्छता गृहे.
पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय.

९. मध्यवर्ती (प्रत्येक इमारतीत) प्रशस्त चौक
पालख्यांची सोय अशा चौकात उत्तम त-हेने होईल.

१०. संपूर्ण साईटचे नियोजन संयुक्तिक लॅण्डस्केप
विविध प्रकारचे गार्डन
योग्य असे पदपथ
उत्कृष्ट लाईटची व्यवस्था

११.सर्व्हिसेस - एक जनरल शॉप.
कॅन्टीन
लॉण्ड्री
३००० व्यक्तिंकरीता इतर एकत्रित सुविधा

एकूण बांधकाम क्षेत्र -

| | | |
|---|---|---|
| तळमजला | - | ११५०.०० चौ.मि. |
| पहिला मजला | - | ११५०.०० चौ.मि. |
| दुसरा मजला | - | १४५३.०० चौ.मि. |
| एकूण | - | ३७५३.०० चौ.मि. |

अ) सहा इमारतीकरीता एकूण बांधकाम क्षेत्र - ३७५३.०० x ६ = २२५१८.०० चौ.मि.
ब) प्रशासकिय कार्यालयासाठी बांधकाम क्षेत्र (तळमजल्यावर) = ५७३.०० चौ.मि.
क) केअर टेकर व सेंट्रल स्टोअर करीता बांधकाम क्षेत्र = १७०.०० चौ.मि.
(तळमजल्यावर)

एकूण प्रकल्पाचे बांधकाम क्षेत्र - (अ +ब +क) = २२५१८.०० + ५७३.०० + १७०.००
= २३२६१.०० चौ.मि.
= २५०३८१.०० चौ.फुट
Say = २५०४००.०० चौ.फुट

ढोबळ अंदाजपत्रक -

बांधकाम क्षेत्र -२५०४००चौ.फुट x रु.६०० प्र.चौ.फुट = रु.१५,०२,४०,०००.००
साईट डेव्हलमेंट - १०% = रु.१,५०,२४,०००.००
(कंम्पाउंड वॉल, पाथ-वे, लॅण्डस्केप, पार्किंग, वॉचमन रुम इत्यादीसह)
म्युरल, स्टॅच्यु पेंटींग इत्यादी - १% = रु.१५,०२,४००.००
एकूण = रु.१६,६७,६६,४००.००
say = रु. १६६७.६६ लक्ष

आजचे सभेत आर्किटेक्ट भालचंद्र चावरे,नाशिक उपस्थित होते, त्यांनी तयार केलेल्या प्लॅन चित्रफितीव्दारे सर्व सदस्यांना दाखविला, तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

आर्किटेक्ट श्री भालचंद्र चावरे, नाशिक यांनी तयार केलेला प्लॅन मधील कॉमन टॉयलेटची व्यवस्था मा.सदस्यांना पसंत न पडल्याने प्रत्येक हॉलसाठी टॉयलेट अशा स्वरुपाची व्यवस्था इत्यादी सुधारणांसह श्री.भालचंद्र चावरे सह अन्य आर्किटेक्टकडून सुधारित प्लॅन तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०९. सुपर स्पेशालिटी रुग्णालयात फॉल्स सिलींग करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८७.** नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालयात एकूण ५ ऑपरेशन थिएटर, ३ आय.सी.यु., तसेच कॅथलॅब, ओ.टी इत्यादी विभाग कार्यान्वीत होणार आहेत. सदर विभागाचे सेंट्रल एअर कंडीशनींगचे काम मे.एअरबॉर्न क्लिन्लीनेस इंजिनिअर्स, मुंबई यांना दिनांक १३.०५.२००५ चे आदेशान्वये देण्यात आलेले असून त्यांचे काम रुग्णालयात चालू आहे. त्यांना दिलेल्या कामात खालील विभागात करावयाचे फॉल्स सिलींगचे काम देण्यात आलेले नाही.

| Sr.No | Description | Qty | Rate /Sq.ft | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | False ceiling of 24 guage Galvanized Sheet duly polyester coated along with galvanized suspensions with clip in arrangement | | | |
| | 1st flr.ICU | 1834 Sq.ft. | 135 | 247590.00 |
| | 1st flr.ICU | 1298Sq.ft. | 135 | 175230.00 |
| | 2nd flr.ICU | 2948 Sq.ft. | 135 | 397980.00 |
| | 2nd flr.Lobby | 200 Sq.ft. | 135 | 27000.00 |
| | 2nd flr.Cath Lab | 500 Sq.ft. | 135 | 67500.00 |
| | Gr.flr.Lobby | 220 Sq.ft. | 135 | 29700.00 |
| | | | Total | 945000.00 |

मे.एअरबॉर्न क्लिन्लीनेस इंजिनिअर्स, मुंबई यांनी त्यांचे दिनांक २१.९.२००५ चे पत्रान्वये याकामी एकूण रुपये ९,४५,०००/-चा खर्च कळविला असून सदरहू काम करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९,४५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१०. उद्यान विकसीत करणेसंबंधी आलेल्या अर्जावर चर्चा करणे.**

**निर्णय क्र.५८८.** श्री साईबाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जातात. त्यामुळे शिर्डी या महत्त्वाच्या धार्मिक स्थळाला भेट देण्यासाठी संपूर्ण देशातून त्याचप्रमाणे परदेशातून येणा-या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. शिर्डी येथे साईभक्तांच्या सोयीसाठी आजपावेतो अनेक विकास प्रकल्प संस्थानतर्फे उभारण्यात आलेले आहेत. त्यामध्ये लेंडीबाग, धर्मशाळा, नवीन भक्तनिवासस्थान, धर्मशाळा या ठिकाणी बगीचा विकसीत करण्यात आलेला आहे. पंरतू एकाच ठिकाणी सलग व विस्तीर्ण स्वरुपातील उद्यान सध्या शिर्डी परिसरात उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारचे विस्तीर्ण स्वरुपातील उद्यान शिर्डी येथे निर्माण करणेसाठी दि. १३/३/२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उद्यानाचे नियोजीत कामासाठी प्रथम तपशिलवार डिझाईन, एस्टीमेटसह प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणेसाठी लॅण्डस्केप आर्किटेक्ट व हॉर्टीकल्चरीस्ट यांची संयुक्तरित्या नेमणूक करण्यास दिनांक १३.३.२००५ चे सभेतील निर्णय क्र. १०५ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

दि.६/८/२००५ रोजी शिरडी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थानने शेती महामंडळाकडून संपादीत केलेल्या एकूण ८ हेक्टर २०आर (२०.५० एकर) जागेवर उद्यान विकसीत करणेकामी आर्कीटेक्ट सुरेश घोरपडे असो., मुंबई यांनी तयार केलेला आराखडा सादर करण्यात आला. त्यावर सविस्तर चर्चा होउन लॅन्डस्केपिंग/हॉर्टीकल्चर/गार्डनिंग कन्सल्टंटची वर्तमानपत्रात जाहिरात देउन अर्ज मागविणेबाबत निर्णय झाला होता. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देवून दिनांक १/९/२००५ पर्यत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेले खालील अर्ज व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०९.२००५ चे सभेत समक्ष उघडण्यात येऊन आलेल्या अर्जाची छाननी करुन कामाचा अनुभव इत्यादि माहितीसह यादी आजचे सभेत सादर करण्यात आली होती.

| अ.नं. | अर्जदारांचे नाव |
|---|---|
| ०१. | मढव कंन्सलटंट (इंडीया ) प्रा.लि.,मुंबई |
| ०२. | श्री. भवर एम.आर., पुणे |
| ०३. | डॉ. राजेंद्र देशमुख, मुंबई |

| | |
|---|---|
| ०४. | शोभा भोपटकर, पुणे |
| ०५. | मे.ग्रीन प्ले व्हिजन, मुंबई |
| ०६. | महाराष्ट्र स्टेट सीडस् , अकोला |
| ०७. | ग्रीन टेक, पुणे |
| ०८. | बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे |
| ०९. | अनंत टेक्नोक्रेट प्रा.लि., नाशिक |
| १०. | संदेरसन ग्रुप (इंडिया) प्रा.लि.मुंबई |
| ११. | दि डिझाईन, मुंबई |
| १२. | संदिप गोवलकर डिझाईन असो., मुंबई |

यावर सविस्तर चर्चा होऊन, शेगांव संस्थानकरीता आनंदसागर बगीचा मढव कन्सलटंट (इंडिया) प्रा.लि. मुंबई यांनी विकसित केला आहे. सदर अर्किटेक्ट सोबत व्यवस्थापन समिती सदस्यांनी पहाणी करावी. त्यानुसार आर्किटेक्ट यांना सूचना देण्यात यावी व आराखडा, अंदाजपत्रक तयार करावे असे ठरलें. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/बगीचा विभागप्रमुख)

**विषय नं.११. घन कचरा संबंधी आलेल्या अर्जावर चर्चा करणे.**

**निर्णय क्र.५८९.** संस्थान व शिर्डी शहरासाठी घनकचरा विल्हेवाट, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे इत्यादी प्रकल्प हाती घेण्याचे प्रस्तावीत आहे. याकरीता इंजिनिअरींग क्षेत्रातील पर्यावरणा विषयी सल्ला, घनकचरा व्यवस्थापन, वेस्ट पासून उर्जा इत्यादीसाठी प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाची व्यवहार्यता इत्यादी कामी सल्ला घेण्यासाठी व्यवस्थापन समितीचे दि. ६/८/२००५ रोजी झालेल्या सभेत चर्चा करणेत आली. त्यावेळी वर्तमानपत्रात जाहिरात देवून या क्षेत्रातील नामांकीत कंपन्यांकडून अर्ज/माहिती मागविणे बाबत ठरले होते. त्याप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दिनांक १/९/२००५ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेले खालील अर्ज व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०९.२००५ चे सभेत समक्ष उघडण्यात येऊन आलेल्या अर्जांची छाननी करुन कामाचा अनुभव इत्यादि माहितीसह यादी आजचे सभेत सादर करण्यात आली होती.

| अ.नं. | अर्जदारांचे नाव |
|---|---|
| ०१. | मिटकॉन कंन्सलटंट सर्व्हिसेस लि. पुणे |
| ०२. | एम डब्लू एच इंडिया प्रा.लि.,मुंबई |
| ०३. | इंप्राटेक सोल्युशन, पुणे |
| ०४. | एक्सेल इंडस्ट्रीज लि., मुंबई |
| ०५. | महाबल एनव्हायरमेंट इंजिनिअरींग प्रा.लि., नाशिक |
| ०६. | अश्वमेध इंजि. ॲण्ड कंन्सलंटट को-ऑप लि.,नाशिक |
| ०७. | मॅकलीन कंन्सलटंट प्रा.लि., पुणे |
| ०८. | तेजश्री एंटर प्रायजेस, पुणे |
| ०९. | किर्लोस्कर कन्सलटन्सी, पुणे |
| १०. | अनंत टेक्नोक्रेट प्रा.लि., नाशिक |
| ११. | ब्रीटो एनर्जी इंजिनिअर्स , मुंबई |
| १२. | स्त्री मुक्ती संघटना, मुंबई |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त अ.नं.०१ ते १२ सल्लागार अर्जदारांपेक्षा मे.वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट यांना या कामाचा प्रदीर्घ अनुभव असल्याने त्यांची नेमणूक करण्यात यावी अशी सूचना मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी केली , त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.१२. कनकुरी साठवण तलाव येथे कम्पाऊंड वॉलकरिता मटेरिअल खरेदीकामी आलेले कोटेशन उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.५९०.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०८.२००५ मधील निर्णय क्र.४१८नुसार संस्थानचे नियोजीत प्रसादालय इमारतीचे बांधकामासाठी आवश्यक असणा-या पाणी पाईप लाईनसाठी जी.आय.पाईप व इतर साहित्य खरेदीसाठी येणारे रु.१,५४,२७१/-चे खर्चास तसेच निर्णय क्र.४२० नुसार कनकुरी येथील साठवण तलावासाठी कंपाउंड करणेकामी रु.२५ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविणेत आलेल्या आहेत. पैकी क्र.१ चे लिफाफयात मूळनिविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डीडी तसेच इतर कागदपत्रांची मागणी केलेली आहे. त्यानुसार मुदतीअंती खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०२ | भनसाळी मोटर्स, राहाता |

| | |
|---|---|
| ०३ | काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड, कोपरगांव |
| ०४ | श्रीराम स्टील ट्रेडर्स, धुळे |
| ०५ | नितीन एंटरप्रायजेस, नाशिकरोड |
| ०६ | एसएलएस प्लाटोडाईट प्रा.लिमीटेड, मुंबई |
| ०७ | रिलायन्स एक्झीमो द्वारा.एस.बी.ट्रेडींग कार्पोरेशन, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन, निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे, असें ठरले. (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.१३. श्रीसाईलीला संपादकीय कार्यालयासाठी संगणक खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५९१.** ''श्री साईलीला'' संपादकीय कार्यालय मुंबई येथून कर्मचारी वृंदासह शिर्डी येथील कार्यालयात स्थलांतरीत करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ रोजीचे सभेतील विषय नं.१९ निर्णय क्रमांक १९० नुसार तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३.०५.२००५ रोजीचे सभेतील विषय नं.२८, निर्णय क्र.२३० अन्वये ठरविणेत आले आहे.

मुंबई कार्यालयाकडून शिर्डी येथे स्थलांतरीत व्हावयाच्या श्री साईलीलेच्या कामकाजाकरीता आवश्यक असलेल्या खालील वर्णनात्मक संगणकाची खरेदी करणे गरजेचे असलेबाबत कळविले आहे.

| | |
|---|---|
| 01 | Intel Original Mother Board<br>Intel Original Mother Board<br>1 GB Ram<br>80 GB hard Disk<br>128 V Ram Graphic Card<br>17" Monitor<br>CD Writer<br>Optic Mouse etc. |

तरी वरील प्रमाणे संगणक यंत्र सेट खरेदी करणेस तसेच सदरचे संगणक यंत्र ठेवण्यासाठी टेबल व व्हील चेअर खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग/प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.१४. श्रीसाईमंदीरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी.तयार करणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५९२.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी द्वारा "श्रीं साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार, व्ही.सी.डी. " २५,००० संच (२ सी.डी. चा १ संच) तयार करणेकामी मुंबई येथील खालील नामांकित सी.डी. निर्मात्यांना जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/१००८२/२००५ दि.१३.०९.२००५ अन्वये कोटेशन्स पाठविण्यात आली होती. सदरचे कोटेशन्स भरून ते दि.२६.०९.२००५ अखेर दाखल करण्याविषयी कळविण्यात आले होते.

| Sr.No | Name & Address | Sr.No. | Name & Address |
|---|---|---|---|
| 01 | A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai | 02 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03 | Dolby Music, Mumbai | 04 | Krunal Music Company, Mumbai |
| 05 | Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai | 06 | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai |
| 07 | Vandana Electronics, Mumbai | 08 | Audio Vision, Mumbai |
| 09 | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai | 10 | S.S.Enterprises, Mumbai |
| 11 | Sunrise Industries | | |

उपरोक्त पैकी खालील ८ सी.डी निर्मात्यांची कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

| Sr. No | Name & Address | Sr.No. | Name & Address |
|---|---|---|---|
| 01 | A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai | 02 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03 | Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai | 04 | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai |
| 05 | Vandana Electronics, Mumbai | 06 | Audio Vision, Mumbai |
| 07 | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai | 08 | Sunrise Industries |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता, कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचं नांव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai | २३.५० (४% व्हॅटसह) |
| ०२ | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai | २३.८७ (४% व्हॅटसह) |
| ०३ | Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai | ३०.०० सर्व करांसह |
| ०४ | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai | ३७.०० सर्व करांसह |
| ०५ | Vandana Electronics, Mumbai | २३.७६ सर्व करांसह |
| ०६ | Audio Vision, Mumbai | २३.१४ सर्व करांसह |
| ०७ | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai | २३.९२ सर्व करांसह |
| ०८ | Sunrise Industries | २६.०० सर्व करांसह |

यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑडिओ व्हिजन, मुंबई यांचे निम्नतम दराचे कोटेशन स्विकारणेत येऊन त्यांना २५,००० संच व्ही.सी.डी ( २ सी.डी.चा एक संच ) तयार करुन देणेबाबत आदेश देण्यात यावा असें ठरलें. (कार्यवाही- प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.१५. श्रीसाईसच्चरित सार (हिन्दी दोहावली) पुस्तक छपाई कामी आलेले कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५९३.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५चे सभेतील निर्णयानुसार श्री शिवनारायण टुवानी, इन्दौर लिखीत "श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली)"पुस्तक प्रकाशित करणेस मान्यता देणेत आली आहे.

प्रकाशने विभागाकडील दि.०४.०८.२००५ चे मान्यताप्राप्त प्रस्तावानुसार "श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली)" पुस्तकाचे प्रथम प्रकाशन असल्याने ५,००० प्रतींची छपाई ही श्री शिवनारायण टुवानी, इन्दौर यांचे मार्गदर्शनाखाली इन्दौर येथील नामांकित प्रेसधारकांकडून करून घेण्यात यावी,असे ठरले आहे. याबाबत उपरोक्त पुस्तकाची संपूर्ण छपाई करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी स्विकारण्याची श्री शिवनारायण टुवानी, यांनी तयारी दर्शविली आहे. त्यासाठी श्री.शिवनारायण टुवानी, यांनी साईसच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) पुस्तक छपाईकामी इन्दौर येथील खालील नामांकित प्रेसधारकांची संपूर्ण पत्त्यासह नावे फॅक्स पत्राद्वारे कळविली आहेत.

त्यानुसार खालील संबंधीत प्रेसधारकांना उपरोक्त पुस्तकाचे छपाई कामाचे कोटेशन जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/८४११/२००५.दि.०९.०८.२००५ अन्वये पाठविण्यात येवून ते दि.२५.०८.२००५ अखेर जमा करणेविषयी कळविण्यात आले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | श्रीरंग ऑफसेट, इन्दौर. |
| ०२ | वर्धमान काम्प्युटर्स, इन्दौर. |
| ०३ | श्री. ऑफसेट प्रिंटर्स, भोपाल. |
| ०४ | वर्धमान प्रिंटर्स्, इन्दौर. |

वरील ०४ प्राप्त प्रेसधारकांपैकी मुदतीत दाखल झालेली कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५चे सभेत उघडण्यात येवून प्रेसधारकांना आजचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीरंग ऑफसेट, इन्दौर. | ६३.०० | ६२.०० |
| ०२ | वर्धमान काम्प्युटर्स, इन्दौर. | ९८.२५ | ९५.०० |
| ०३ | श्री. ऑफसेट प्रिंटर्स, भोपाल. | ७५.८३ | अनुपस्थित |
| ०४ | वर्धमान प्रिंटर्स्, इन्दौर. | ९४.०० | ९४.०० |

प्रेसधारकांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता पहाता प्रेसधारकांनी देऊ केलेल्या दरात खूपच तफावत येत असल्याने श्रीसाईसच्चरित सार (हिन्दी दोहावली) पुस्तक छपाई कामी स्थानिक प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागविण्यात यावेत असे ठरले. (कार्यवाही- प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.१६. हिन्दी-इंग्लिश-तेलगु भाषेतील माहिती पत्रिकांची छपाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.५९४.** श्री साईबाबा संस्थानतर्फे साईभक्तांना देण्यात येणा-या सोयी व सुविधांची व राबवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती साईभक्तांना व्हावी यासाठी जनसंपर्क कार्यालयाने मराठी माहितीपत्रक तयार केले आहे. याच माहिती पत्रकाचे आधारे हिंदी,इंग्लिश व तेलगू या भाषेतील निष्णात व जाणकार व्यक्तिंकडून हिंदी,इंग्लिश व तेलगू भाषेत भाषांतर करून घेऊन हिंदी,इंग्लिश व तेलगू माहिती पत्रक तयार करण्यात आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान तर्फे हैद्राबाद येथे " श्रीं " चे पादूका दर्शन सोहळा व भक्तसंमेलन दि.२६ नोव्हेंबर २००५ ते २८ नोव्हेंबर २००५ या कालावधीत आयोजित करण्याचे ठरलेले आहे. या पादूका दर्शन सोहळा भक्त संमेलनाचे वेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी येथील उपलब्ध असलेल्या सोयी व सुविधांची माहिती होणेसाठी ही माहिती पत्रके फार उपयुक्त ठरतील त्यासाठी सदरच्या हिंदी,इंग्लिश व तेलगू भाषेतील माहिती पत्रकांच्या प्रत्येकी १०,००० प्रती छपाई करून घेतल्यास जास्तीत जास्त भक्तांना त्याचे वितरण करता येईल. या माहिती पत्रकांच्या छपाईसाठी अंदाजे प्रती नगास रू.२.०० पैसे प्रमाणे खर्च अपेक्षित आहे. यासाठी हिंदी -१०,००० प्रती ,इंग्लिश - १०,००० प्रती ,इंग्लिश देणगी माहितीपत्रक- १०,००० प्रती व तेलगू -१०,००० प्रती अशा एकूण ४०,००० प्रती अंदाजे प्रती नगास रू.२.०० प्रमाणे एकूण रूपये ८०,०००/- खर्च अपेक्षित असून सदरहू काम कोटेशन्स मागवून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.१७. रुग्णवाहिका नं.एमएच१७/के-६६०१ या अपघातग्रस्त गाडीचे दुरुस्ती खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.५९५.** दि.१४/०८/२००५ रोजी साईनाथ हॉस्पिटल मधून पेशंट श्री साईभक्त श्री व्ही. प्रभाकरराव यांना विजयवाडा येथे सोडणे कामी रूग्णालयाचे परवानगीने संस्थान रूग्णवाहिका नं.एमएच-१७/के-६६०१ (टेम्पो ट्रॅव्हलर) हे वाहन, घेऊन वाहनचालक श्री रामदास गोंदकर व श्री बापू गव्हाणे गेले होते. परतीच्या प्रवासात दि.१५/०८/२००५ रोजी विजयवाडा येथून ५०कि.मी. अंतरावर गाडीला सायकलस्वार आडवा आल्याने त्याला वाचवितांना गाडी पलटी होऊन अपघात झाला. दि. १८/०८/२००५ रोजी सदर गाडी वाहन विभागात आणण्यात आलेली आहे.

गाडी पलटी झाल्याने गाडीचे नुकसान झालेले आहे. सदर गाडीची दुरुस्ती करण्यासाठी बजाज टेम्पो कंपनीचे शिरडी एरियाचे अधिकृत डिलर मे. उज्वल एजन्सी. नाशिक यांचेशी संपर्क साधला असता, एजन्सीचे प्रतिनीधी श्री रवी मुळे यांनी दि.२५/०८/२००५ रोजी शिरडी येथे प्रशासकीय अधिकारी श्री प्रकाश तु. जोशी यांचेशी चर्चा केली. झालेल्या चर्चेनुसार सदर गाडी उज्वल एजन्सी, नाशिक यांचेकडे दि.२९/०८/२००५ रोजी दुरूस्ती करीता पाठविलेली आहे.

दि.०८/०९/०५ रोजी उज्वल एजन्सी, नाशिक यांनी सदर गाडी दुरूस्ती करीता येणा-या खर्चाचा तपशील पाठविलेला आहे. तो खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| स्पेअर पार्ट खर्च- | रू. १,१५,३२५.०० |
| लेबर चार्ज खर्च - | रू. १,२८,३५०.०० |
| सर्व्हिस टॅक्स १०.२% | रू. १३,०९१.७० |
| एकूण खर्च - | रू. २,५६,७६७.०० |

परंतु लेबर चार्ज बाबत श्री मुळे यांचेशी चर्चा केली असता त्यांनी लेबर चार्ज २०% कमी करून रू. १,०२,६८०/- मात्र पडेल असें दि.१२/०९/२००५चे पत्राने कळविलेले आहे. त्या नुसार येणारा खर्च पुढील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| स्पेअर पार्ट खर्च- | रू. १,१५,३२५.०० |
| लेबर चार्ज खर्च - | रू. १,०२,६८०.०० |
| सर्व्हिस टॅक्स १०.२% | रू. १०,४७३.०० |
| एकूण खर्च - | रू. २,२८,४७८.०० |

एकूण स्पेअर पार्ट व लेबर चार्ज खर्च (सर्व्हिस टॅक्स १०.२% सह ) रू.२,२८,४७८/-मात्र खर्च येणार आहे. सदर रक्कमेतील ७०% ॲडव्हान्सची मागणी उज्वल एजन्सी, नाशिक यांनी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, गाडी नं.एमएच/१७`-६६०१ चे दुरूस्ती उज्वल एजन्सी, नाशिक यांचेकडून स्पेअर पार्ट व लेबर चार्ज खर्च (सर्व्हिस टॅक्स १०.२% सह )करुन घेण्यास व याकामी येणारे रू.२,२८,४७८/-मात्रचे खर्चास तसेच या रक्कमेपैकी ७०% ॲडव्हान्सच उज्वल एजन्सी, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.१८. गुरुकृपा सेल्स, कोपरगाव यांना भक्तनिवास येथील स्टॉल, साईगंगाची विक्री करणेकामी चालविण्यास देणेबाबत.**

**निर्णय क्र.५९६.** गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांनी दिनांक १२/०८/२००५ चे अर्जान्वये संस्थानचे भक्तनिवास येथील १ स्टॉल आम्हांस साईगंगाची विक्री करण्याकरिता चालविण्यास मिळावा त्याचे होणारे डिपॉझीट भरण्यास तयार आहोत. तसेच सदर स्टॉलला विद्युत पुरवठा मिळावा सदर स्टॉलवर साईगंगाची विक्री खास साईभक्तांकरिता आपल्या कॅन्टीनच्या दराने ( सवलतीच्या दराने ) आम्ही करू तरी आमच्या अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार व्हावा अशी विनंती त्यांनी अर्जात केली आहे.

तसेच मा.श्री शंकररावजी गेणूजी कोल्हे उपाध्यक्ष ,श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांचे उपरोक्त विषयासंदर्भात दिनांक १५/०९/२००५ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून त्यांनी " साईगंगा मिनरल वॉटर विक्री स्टॉलसाठी संस्थानच्या पाचशे खोल्या भक्त निवास येथे जागा देण्याबाबत श्री अनिल पी. बोरावके, कोपरगांव यांचे अर्जाबाबत पाणी ही जीवनाश्यक बाब आहे तसेच साईगंगा मिनरल वॉटरला भारत सरकारने प्रथम क्रमांकाचे नॅशनल क्वालिटी ॲशुरन्स ॲवार्ड नुकतेच प्रदान केलेले आहे.तेव्हा देश विदेशातील साईभक्तांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळावे. तसेच मिनरल वॉटरची ५०० खोल्या भक्तनिवास शिर्डी च्या मुख्य प्रवेशव्दारा जवळ साईभक्तांना डिस्काऊंट किमंतीमध्ये ते विक्री करणार आहेत. त्या कामी स्टॉलसाठी जागा मिळावी या हेतूने श्री बोरावके यांच्या अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार करून त्यांचा अर्ज दि १८/०९/२००५ रोजीचे व्यवस्थापन समितीचे मिटींग मध्ये ठेऊन त्यावर निर्णय घ्यावा. असे म्हटलेले आहे.

संस्थानचे समाधी मंदिर परिसर, साईप्रसाद परिसर, नवीन भक्तनिवासस्थान परिसर, स्वागतकक्ष परिसर,धर्मशाळा ( २०० रुम ) परिसर या ठिकाणी गाळे/स्टॉल चालविले जात असून सदरचे व्यवसाय लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर चालविणेस दिलेले आहेत.

गुरुकृपा सेल्स यांनी भक्तनिवास ( ५०० रुम ) या ठिकाणी जागा मिळणेबाबत मागणी केली आहे. मात्र संस्थान जागेतील पूर्वी चालू असलेले इतर व्यवसांयाचे विचार करता नवीन भक्तनिवास परिसर, धर्मशाळा परिसर किंवा प्रसादालय परिसर या ठिकाणापैकी एका परिसरात संस्थानचे सोयीने गाळा प्रस्तूत गुरुकृपा सेल्स यांना त्यांचे विनंतीस अनुसरून उपलब्ध करुन लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिन्यांसाठी देता येईल .याकामी गुरुकृपा सेल्स यांना मासिक भाडे रुपये ४०००/- चे दरम्यान आकारून व डिपॉझीट रुपये १०,०००/- एका स्टॉलसाठी आकारून लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.१९. शेती महामंडळ जमीनीचे निवाड्याबाबत.**

**निर्णय क्र.५९७.** मौजे निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथील हे.४५-६४आर जमीन भू-संपादनाने घेणेबाबत प्रकरण मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे मार्फत चालू आहे.

सदर जमीनी बाबद अंतिम निवाडा तयार आहे. त्यांचेकडून सदर निवाड्याची प्रत त्यांचेकडील पत्र क्रमांक कावी/ भूसं२/८४७/२००५ दिनांक ०१/०९/२००५ अन्वये दिनांक १५.०९.२००५ रोजी आलेली आहे.त्यामधील रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | भू-संपादित जमिनीचे क्षेत्र हे | ४३-५८-०० | ६,०५,२१,५१५/- |
| ०२ | पोट खराबा क्षेत्र हे. | ०२-०६-०० | ३,०९०/- |
| | | ४५-६४ | ६,०५,२४,६०५/- |
| ०३ | फळ झाडे / वन झाडे | | १,९५,५००/- |
| ०४ | विहीर | ---- | ---- |
| ०५ | बांधकाम | ---- | ---- |
| ०६ | विच्छेद हानी | ---- | ---- |
| ०७ | ताळ | ---- | ---- |
| | **एकुण रक्कम रु.** | | ६,०७,२०,१०५/- |
| ०८ | ३०% दिलासा रक्कम | | १,८२,१६,०३२/- |
| ०९ | अतिरिक्त घटकाची रक्कम (१२% प्रमाणे दि. १९/१२/२००२ ते ३१/०८/२००५) (कलम ४ ची नोटीफीकेशन) (निवाडयाचा दिनांक )( २ वर्षे , ८ महिने,१३ दिवसाची ) | | १,९६,८९,९५०/- |
| १० | संपादित जमिनीची नुकसान भरपाई एकूण रक्कम रुपये | | ९,८६,२६,०८७/- |
| ११ | नवीन शर्त जमिनीची नजराणा रक्कम | | १,३७,८८,०४८/- |
| १२ | आगाऊ नुकसान भरपाई रक्कम ( वजा ) | | ७,४०,६८,०३२/- |
| | **एकूण :-** | | ८,७८,५६,०८०/- |
| १३ | जमीन मालकास निव्वळ देय रक्कम | | १,०७,७०,००७/- |
| १४ | आस्थापना खर्च (३%) | | २९,५८,७८३/- |
| | आस्थापना खर्च-३% रक्कम रुपये | २९,५८,७८३/- | |
| | वसूल केलेली रक्कम | २४,३१,०४९/- | |
| | **निव्वळ येणे रक्कम** | ५,२७,७३४/- | |

**निवाड्या प्रमाणे एकूण देय रक्कम खालील प्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| अ) नुकसान भरपाईची रक्कम | ९,८६,२६,०८७/- |
| ब) आस्थापना चार्जेस | २९,५८,७८३/- |
| **एकूण-** | **१०,१५,८४,८७०/- रुपये** |
| आता पर्यत संस्थानने दिलेली रक्कम ( वजा) | ८,३४,६६,००२/- |
| | **१,८१,१८,८६८/-** |

आता संस्थानने द्यावयाची रक्कम रुपये १,८१,१८,८६८/- ( रुपये-एक कोटी, एक्यांऐशी लाख,आठरा हजार,आठशे अडूसष्ट ) फक्त आहे.

संस्थानचे ॲडव्होकेट श्री पी.डी.गुजराथी यांनी त्यांचे दिनांक ६/२/२००५ रोजी पत्रात नमूद केले होते की भू-संपादन कायदा कलम २३ (१अ) प्रमाणे जमिनीचे ठरविलेल्या बाजार भावाच्या किंमतीवर भू-संपादन अधिकाऱ्याच्या निवाड्याच्या तारखेपर्यत अगर भू-संपादन संस्थेला प्रत्यक्ष ताबा मिळेपर्यत या पैकी जी तारीख अगोदरची असेल त्या तारखे पर्यत कलम ४(१ चे ) नोटीफिकेशनचे तारखे पासून १२% प्रमाणे ज्यादा रक्कम आकारण्याची तरतूद आहे. कलम ४(१) खालील नोटीफिकेशनची तारीख २०/१२/२००२ असून प्रत्यक्ष ताब्याची तारीख २२/१/२००३ ही आहे. त्यामुळे ताब्याची नोटीस ही अगोदरच्या तारखेची असल्याने व अंतिम निवाडा अद्याप झाला नसल्याने ताब्याच्या तारखे पर्यत वरिल १२% प्रमाणे जादा रक्कम भरणेची संस्थानवर जबाबदारी आहे. त्यामुळे मेहेरबान उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे दिनांक २/२/२००५ चे पत्रातील दिनांक २०/४/२००३ ते दिनांक २८/२/२००५ पर्यतची दाखविलेली रक्कम रुपये ३६,४०,१३४/- व त्यावरील आस्थापना खर्च रुपये १,०९,२०४/- ही रक्कम योग्य वाटत नाही. असे कळविले होते. संस्थानचे ॲडव्होकेट श्री पी.डी.गुजराथी यांच्या मार्गदर्शना प्रमाणे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस वशी-२/१९७९/२००५ दिनांक २३/०२/२००५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांचेकडील एल.ए.क्यू.एस.आर /१/ २००२ दिनांक २४/०८/२००५च्या निवाडयामध्ये अतिरिक्तघटकाची रक्कम ( १२ टक्के प्रमाणे १ महिन्याची ) दिनांक २०/१२/२००२ म्हणजे भू-संपादन कायदा कलम ४ ची नोटिफिकेशन ते २२/०१/२००३ पर्यत म्हणजे ताबा घेतल्या पर्यत आकारणी रक्कम रुपये- ६,०७,२०१/- फक्त केलेली आहे.मात्र सदरचा निवाडा त्यांनी परत नेला आहे व नवीन निवाडा दि.१५.९.२००५ रोजी पाठविला आहे.

मात्र त्यांचेकडील पत्र क्रमांक कावि/भूस-०२/८४७/२००५ दिनांक ०१/०९/२००५ चे पत्रा समवेत नव्याने आलेला निवाडा क्रमांक एल.ए.क्यू.एस.आर.१/२००२ दिनांक ३१/०८/२००५ मध्ये दिनांक १९/१२/२००२ म्हणजे भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ची नोटीफिकेशन ते निवाडयाचा दिनांक ३१/०८/२००५ पर्यत म्हणजे २ वर्षे , ८ महिने, १३ दिवसांचे अतिरिक्त घटक रक्कम १२ टक्के प्रमाणे रुपये- १,९६,८९,९५०/- ची आकारणी केलेली आहे.म्हणजे आता रक्कम रुपये- १,९०,८२,७४९/- नव्याने जादा आकारणी केलेली आहे.मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांचे कार्यालयाकडून (मा.प्रांतअधिकारी यांचेवतीने ) एल.ए.क्यू.एस.आर. १/ २००२ दिनांक २४/०८/२००५ च्या निवाडयाची मूळ प्रत व पत्र त्यांचे कार्यालयाचे प्रतिनिधी यांनी दि. २९/८/२००५ रोजी परत नेलेली आहे.

दिनांक २४/०८/२००५ चे प्रारुप निवाडयामध्ये कलम ३४ प्रमाणे ताबा घेतल्याच्या दिनांका पासून निवाडयाच्या तारखेपर्यंत व्याज देय (दिनांक २३/०१/२००३ ते २४/०८/२००५ ) या मुदतीसाठी रक्कम रुपये-६८,९०,७८५/- ची आकारणी केलेली होती. ती दिनांक ३१.०८.२००५ चे निवाडयात आकारलेली नाही.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ८/५/२००५ रोजीच्या ठरावास अनुसरुन खालील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित पुणे व श्री साईबाबा संस्थान, विश्वस्त व्यवस्था, शिर्डी. यांनी भू-संपादनाच्या कार्यवाही संबंधात न्यायालयात दाद मागणार नाही याबाबदचे रक्कम रु. १००/- स्टॅम्प पेपर बंधपत्र दिलेले आहे व तसे निवाड्यात नमूद केलेले आहे. तसेच भू-संपादना साठी मा.धर्मादाय आयुक्ताचे परवानगीची आवश्यकता नसल्याचे कळविणेत आलेले आहे.

भू-संपादना खालील जमीनीचा मोबदला अदा करते वेळी कलम १६ नुसार रितसर ताबा घेणेत येवून भू-संपादन मंडळास सदरहू जमिनीचा ताबा देणेत येईल. असे दिनांक ३१.०८.२००५ चे निवाड्यात नमूद केलेले आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी दिनांक २४/०८/२००५ रोजी व दिनांक ३१/०८/२००५ रोजी निवाडयाच्या दिलेल्या प्रतीमध्ये खालील बाबतीत रक्कमेचा फरक आहे.

०१) अवॉर्डमध्ये नव्याने एकूण रक्कम रुपये-९,८६,२६,०८७/- (अक्षरी रुपये-नऊ कोटी, शहाऐंशी लाख, सव्वीस हजार,सत्याऐंशी) मात्रची रक्कम एकूण नुकसान भरपाई ठरविलेली आहे.त्याचप्रमाणे आस्थापना खर्च रुपये-२९,५८,७८३/- अशी एकूण रुपये- १०,१५,८४,८७०/- मात्र ठरविलेली आहे.

पैकी रुपये-८,३४,६६,००२/- पूर्वी अदा केलेली रक्कम हिशोबात धरुन उर्वरीत रक्कम रुपये-१,८१,१८,८६८/- (अक्षरी रुपये-एक कोटी,एक्याऐंशी लाख,अठरा हजार,आठशे आडुसष्ट ) मात्रची मागणी केलेली आहे.

०२) दिनांक २४/०८/२००५ चे पत्र व निवाडयाप्रमाणे एकूण रक्कम रुपये- ८,६४,३४,१२३/- (अक्षरी रुपये- आठ कोटी ,चौसष्ट लाख,चौतीस हजार,एकशे तेवीस ) मात्र अधिक आस्थापना खर्च रुपये- २५,९३,०२४/- अशी एकूण रुपये- ८,९०,२७,१४७/- मात्रची मागणी कळविलेली होती. त्यातून यापूर्वी दिलेली रक्कम रुपये-३४,६६,००२/- हिशोबात धरता रक्कम रुपये-५५,६१,१४५/- (अक्षरी रुपये-पंच्चावन्न लाख,एकसष्ठ हजार,एकशे पंचेचाळीस ) ची मागणी केली होती.(सदर अवॉर्डची मूळ प्रत उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर कार्यालयाने परत नेलेली आहे).

०३) अ.नं.२ प्रमाणे रक्कम रुपये-८,९०,२७,१४७/- च्या ऐवजी अ.नं.१ मध्ये रक्कम रुपये-१०,१५,८४,८७०/- कळविण्यात आलेली आहे.म्हणजेच रुपये-१,२५,५७,७२३/- मात्र फरकाने आता जादा रक्कम कळविलेली आहे.

०४) उपरोक्त वाढीव रक्कम घेणेचे कारण म्हणजे १२ टक्के अतिरिक्त घटकाची रक्कम दिनांक १९/१२/२००२ (भू-संपादन कायदा ४ ची नोटीफिकेशन ) ते दिनांक ३१/०८/२००५ (निवाडा जाहीर करण्याचा दिनांक) २ वर्षे, ८ महिने,१३ दिवसांची अतिरिक्त घटकाची आकारणी रक्कम रुपये-१,९६,८९,९५०/- केली आहे.परंतू दिनांक २४/०८/२००५ चे निवाडा पत्रात दिनांक १९-२०/१२/२००२ (भू-संपादन कायदा ४ ची नोटिफिकेशन ) ते दिनांक २२/०१/२००३ ( ताबा घेतल्याची तारीख ) पर्यंतची आकारणी फक्त रुपये-६,०७,२०१/- मात्रची केली होती. मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील १२/१२/२००२ चे पत्राने शेती महामंडळाच्या दिनांक ०५.१२.२००५ चे पत्रास अनुसरुन आगावू रकमेची मागणी केली होती. त्याप्रमाणे ८० टक्के रक्कम रु. ५,८५,००,०००/- शासनाकडे जमा केल्या नंतर शेती महामंडळ व संस्थान यांनी मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर याच्या समक्ष दि. २२/०१/२००३ रोजी जमीनीचा ताबा घेतला आहे. त्यामुळे व्याज आकारणी होत नाही.

यापुर्वी दि. ३१/८/२००५ च्या निवाड्यापुर्वी मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी वेळोवेळी प्रारुप निवाड्या प्रमाणे नुकसान भरपाईच्या रकमा कळविलेल्या होत्या. दि. ३१/८/२००५ रोजी तयार केलेला निवाड्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.त्यामुळे निवाड्यास अंतीम स्वरुप प्राप्त आहे. त्यामध्ये जमीनीची नुकसान भरपाईची रक्कम अधिक फळ झाडे, वन झाडे यांची किंमत व ३० टक्के दिलासा रक्कम मान्य करण्यास हरकत नाही. मात्र निवाड्या मध्ये दि. १९/१२/२००२ ( कलम ४ ची नोटीफिकेशन ची तारीख) ते ३१/८/२००५ (निवाड्याची तारीख ) एकंदर २ वर्ष ८ महिने १३ दिवस अशी मूदत धरुन अतिरीक्त घटकाची रक्कम १२ टक्के प्रमाणे आकारलेली आहे. ती त्यापेक्षा कमी आकारणे आवश्यक होते , दि.१९/१२/२००२ (कलम ४ ची नोटीफिकेशन ची तारीख ) ते २२/१/२००३ (ताबा घेतल्याची तारीख ) पर्यतच आकारणी आवश्यक आहे. निवाड्यात २वर्ष ८ महिने १३ दिवस या १२ टक्के अतिरीक्त घटकाची आकारणी चुकीची वाटते त्यामुळे अतिरीक्त घटकेच्या रकमेच्या संदर्भात संस्थानच्या वकीलाच्या सल्ल्यास अनुसरुन भू-संपादन कायदा १८ अन्वये रेफरन्स दाखल करता येईल.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी रक्कम रुपये- १,८१,१८,८६८/- (अक्षरी रुपये-एक कोटी, एक्यांऐशी लाख, अठरा हजार, आठशे आडूसष्ट) फक्त डी.डी. ने पाठविणे बाबद दिनांक १५.०९.२००५ चे पत्राने विनंती केली आहे. सदरची रक्कम मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना मिळाल्यानंतर निवाडा जाहीर करणार आहेत,असे त्यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावि/भूस-०२/९३५/२००५ दिनांक १५/०९/२००५ चे पत्रात नमूद केले आहे.निवाड्यामध्ये संपादनाखालील जमीनीचा मोबदला अदा करते वेळी कलम १६ नुसार रितसर ताबा घेण्यात येवून भू-संपादन मंडळास सदरहू जमीनीचा ताबा देण्यात येईल असे नमूद केले आहे.

<u>खालील बाबतीत निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.</u>

०१) मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावि/भूस-०२/९३५/ २००५ दिनांक १५/०९/२००५ प्रमाणे मौजे निमगांव -कोऱ्हाळे ,तालुका-राहाता येथील शेती महामंडळाची जमीन भू-संपादन करणेसाठी निवाडयातील रक्कम रुपये-१,८१,१८,८६८/- (अक्षरी रुपये-एक कोटी, एक्याऐंशी लाख, अठरा हजार,आठशे आडूसष्ट) मात्र उर्वरीत रक्कम अंडरप्रोटेस्ट आदा करणे .

०२) निवाड्या मधील अतिरीक्त घटकाच्या रकमेच्या आकारणीचे नाराजीने संस्थानचे वकीलाच्या सल्याप्रमाणे कायदेशीर कार्यवाही करणे .

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी मागणी केलेली उर्वरित रक्कम अंडरप्रोटेस्ट म्हणून भरणा करणेत यावी व याबाबत वकीलाचे सल्ल्याप्रमाणे कायदेशिर कार्यवाही करणेत यावी असें ठरलें. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.२०. आरक्षण क्र.८ स.नं.६ मधील श्री.अशोककुमार मल्होत्रा यांची १ आर जमीन भू-संपादनाने घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५९८.** महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील अधिसुचना क्रमांक टि.पी.एस. १६०१/११४४/प्रक्र १३८/०२/नवि-९ दि. ६/८/२००३ अन्वये आरक्षण क्रमांक ८ (प्राथमीक शाळा व क्रिडांगण) ची विकसन संस्था श्री साईबाबा संस्थान,शिरडी झालेली आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २२-२३/११/२००३ चे सभेतील निर्णय क्रमांक ५६४ अन्वये स.नं. ८ मध्ये प्राथमिक शाळा या प्रयोजनासाठी दर्शविलेल्या आरक्षण क्रमांक ८ खाली येणारे क्षेत्र संस्थान तर्फे खरेदी करण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होवून सर्व्हे नं. ६ पैकी आरक्षण क्रमांक ८ खालील एकुण ५७-६५ आर क्षेत्रा पैकी श्री शहा यांचे क्षेत्र वगळता उर्वरीत ५०-६४ आर क्षेत्र खरेदीस मान्यता देण्यांत आली. त्याप्रमाणे १३ खातेदारांची ४०-६४ आर जमीन खरेदी करण्यात आली होती. मा. व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक २१-२२/०२/२००४ रोजी झालेल्या सभेत उरलेल्या ८ खातेदारांचे १७.०१ आर क्षेत्र भू-संपादनाने घेणे बाबत निर्णय क्रमांक ८३ झालेला आहे. त्यानंतर आणखी ४-५० आर जमीन खरेदी करण्यात येवून एकंदर १६ खातेदारांची एकूण ४५-१४ चौ.मी. जागा खरेदी करण्यात आली. आरक्षण क्रमांक ८ मधील उरलेले क्षेत्र १२५१ चौरस मिटरचा ( ५ खातेदारांचा ) भू-संपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस जा.नं. एसएसएस वशी-२/७६३२/२००४ दि. १५/०६/२००४ रोजी सादर केला होता. परंतू सदरचा प्रस्ताव काही त्रुटीची पूर्तता करणेसाठी दि. ९/८/२००४ रोजी परत आलेला होता. या भू-संपादन प्रस्तावात ५ खातेदारांमध्ये श्रीयुत अशोक मल्होत्रा यांचीही १ आर जमीन भू-संपादनात प्रस्तावीत केली होती. परंतू श्री अे.पी. मल्होत्रा यांनी दि. २९/०७/२००४ रोजीच्या पत्राने स्वखुशीने जमीन देण्यास तयार असलेचे कळविले वरुन मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे सुधारीत प्रस्ताव पाठवितांना श्री अशोक मल्होत्रा यांचे नांव वगळून क्षेत्र ११५१ चौ.मी. चा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे दि. २०/१२/२००४ रोजी सादर करण्यात आला.

आता श्रीयुत मल्होत्रा यांनी त्यांचे दि. २०/०२/२००५ च्या पत्रात वेगवेगळ्या शंका उपस्थीत करुन याबाबत ते सारखे दूरध्वनी करीत असतात. एकंदर वरील परिस्थितीवरुन श्रीयुत अशोक मल्होत्रा हे त्यांची जमीन स.नं. ६/२/२ब/१ क्षेत्र १ आर जमीन स्वखुशीने संस्थानला द्यावयास तयार नाहीत.

त्यामुळे आरक्षण क्रमांक ८ मध्ये असलेली श्री अशोक कुमार मल्होत्रा यांची जमीन स.नं. ६/२/२ब/१ क्षेत्र १ आर जमीन भू-संपादनाने घेणे बाबद प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना पाठविणे आवश्यक आहे.

तरी खालील बाबींवर निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता

०१) श्री अशोक कुमार मल्होत्रा यांची जमीन स.नं. ६/२/२ब/१ क्षेत्र ०-१ आर भू-संपादनाने घेणे बाबद प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पाठविणे .

०२) भू-संपादना बाबद करावयाचा करार संस्थान तर्फे मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांनी करुन देणे.

०३) मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर अथवा भू-संपादन अधिकारी यांनी भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ४ चे नोटीफीकेशन पुर्वी अथवा नंतर मागणी केल्यास त्यांचे मागणी प्रमाणे २/३ रक्कम देणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आरक्षण क्र.८ स.नं.६ मधील श्री.अशोककुमार मल्होत्रा यांची १ आर जमीन भू-संपादनाने घेण्यात यावी असें ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.२१. राहाता येथील न्यायालयास मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांचे भेटीबाबत.**

**निर्णय क्र.५९९.** श्री.जी.डी.करमासे, अध्यक्ष, राहाता तालुका बार असोसिएशन, राहाता यांचे दि.१४/०९/२००५ रोजीचे पत्रान्वये राहाता येथे दि.१७/०९/२००५ रोजी दिवाणी व फौजदारी न्यायालयास मा.श्री.दलबीरसिंग भंडारी, मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई हे भेट देणार आहेत. त्या निमित्ताने राहाता न्यायालयात छोटासा कार्यक्रम आयोजित केलेला आहे, सदरच्या कार्यक्रमासाठी मा.अध्यक्ष व सर्व विश्वस्तांना आमंत्रित केलेले असून संस्थानमार्फत स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम व फुलझाडांचे कुंडयाची व्यवस्था करणेबाबत विनंती केलेली आहे. सदरचे पत्र मा.अध्यक्ष यांचे नांवे आहे. तसेच सदरच्या पत्रावर " मा.अध्यक्ष महोदय यांनी दूरध्वनीवर मान्यता दिली आहे." असा मा.कार्यकारी अधिकारी यांनी शेरा दिलेला आहे.

यापुर्वी मागील वर्षी राहाता येथील न्यायालयाचे उद्घाटन प्रसंगी संस्थानमार्फत मंडपाचे बील अदा करण्यात आलेले आहे. यावेळेस त्यांनी मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई हे भेटीस येणार असलेने संस्थानमार्फत स्टेज, फुलझाडांचे कुंड्या, मंडप व साऊंड सिस्टीम इ.देण्यास मा.अध्यक्ष यांनी परवानगी दिली आहे. संस्थानमार्फत स्टेज, फुलझाडांचे कुंड्या देता येतील व मंडप, साऊंड सिस्टीम इ.साठी कोटेशन मागवून नेहमीप्रमाणे न्यूनतम कोटेशनधारकास आदेश काढता येईल. तसेच संबंधीतांस स्टेज व फुलझाडे घेऊन जाणेस व कार्यक्रम संपलेवर परत आणून देणेबाबत पत्र देता येईल. सदरचे कामी साधारणपणे अंदाजे रु.१७,००० ते १८,०००/- पर्यंत खर्च येण्याची शक्यता असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.२२. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय मानोरी, अध्यक्ष, गणेशखिंड देवस्थान ट्रस्ट,वांगी, सरपंच ग्रामपंचायत कार्यालय नांदुर्खी यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत**

**निर्णय क्र.६००.** खालील संस्थांनी संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, मानोरी, व श्री छत्रपती शिवाजी मित्रमंडळ, मानोरी,ता.राहुरी, जि.अ.नगर | अखंड हरिनाम सप्ताह, दि.९/९/०५ ते दि.१६/९/२००५ अखेर | वस्तुरुपाने शिधा मिळणेबाबत. रु.२५,०००/- |
| ०२. | अध्यक्ष, गणेशखिंड देवस्थान ट्रस्ट, वांगी, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर | वरद गजानन उत्सव सोहळा - दि.७/९/०५ ते दि.१६/९/२००५. अशा सोहळ्यासाठी पहिल्यांदाच देत आहोत | श्रीफळ, तांदुळ, मुगडाळ, गोडतेल मिरची पावडर, खोबरे, पत्रावळी इ.रु.२५,०००/- |
| ०३. | सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुर्खी खुर्द II, ता.राहाता, जि.अहमदनगर | अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा- दि.८/९/०५ ते दि.१५/९/२००५ अखेर | वस्तुरुपाने शिधा मिळणेबाबत. रु.११,०००/- |

उपरोक्त कार्यक्रम काळात व्यवस्थापन समितीची सभा नसल्याने मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने शिधा देणेत आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.२३. श्री पुण्यतिथी आराधना विधी- प्रसाद भोजन**

**निर्णय क्र.६०१.** श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाचे मुख्य दिवशी आराधना (श्राद्ध) विधी केला जातो. यावेळी मर्यादित संख्येत (२१/२१) ब्राम्हण-सुवासिनी यांना भोजन प्रसाद, दक्षिणा व वस्त्रदान देण्याची परंपरा आहे. तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांचे वतीने मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त व त्यांचे कुटुंबीय, माजी विश्वस्त, प्रशासकीय अधिकारी व मंदिर कर्मचारी यांना प्रसाद भोजनाकरीता निमंत्रित केले जाते. हा विधी समाधी मंदिर इमारतीचे वरील मजल्यावर केला जातो व त्याच ठिकाणी स्वयंपाक (प्रसाद) केला जातो. प्रसाद भोजनाची पंगत बसविण्याची पूर्वीपासूनची पध्दत आहे. जागा व वेळ यास मर्यादा असल्याने या संपूर्ण कार्यक्रमास मर्यादित स्वरुप आहे. या कार्यक्रमास अंदाजे संख्या २७५ ते ३०० व्यक्तीपर्यन्त असते.

श्री साईबाबांचे सानिध्यात (शिरडी येथील वास्तव्यात) जे साईभक्त आहेत व ज्यांनी श्रींची सेवा केली अशांचे वंशज आज शिरडी, पुणे, नागपूर, मुंबई या ठिकाणी आहेत. शिरडी येथील स्थानिक वशंजांनी त्यांचे कुटुंबीयांना आराधना (श्राध्द) विधीचे प्रसाद भोजनास आमंत्रित करावे अशी लेखी अर्जाव्दारे विनंती केली आहे. अशा अर्जदारांची संख्या १०५आहे.) प्रारंभापासून वंशाचा विस्तार विचारात घेऊन) ही संख्या फक्त शिर्डी येथील स्थानिक व स्थानिक असलेल्या साईभक्त वशंजांच्या परिवारातील आहे. या सर्वांना निमंत्रित करावयाचे झाल्यास श्री पुण्यतिथी आराधना विधीचे प्रसाद भोजनाची जागा अपुरी पडणार असल्याने ती बदलून ती मंगलकार्यालय येथे ठेवावी लागेल. भविष्यात शिर्डी व्यतिरिक्त परगांवी असलेल्या साईभक्त परिवाराचा विचार करावा लागेल व त्यामुळे अशी संख्या वाढत रहाणार आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी पूर्वपार चालत असलेल्या प्रथेत कोणताही बदल करुन नये असे ठरलें. (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

**विषय नं.२४. शिधा सामुग्री मिळणेबाबत समस्त गांवकरी, करुले, ता.संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.६०२.** खालील संस्थेने मा.आमदार राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | समस्त गांवकरी, करुले, ता.संगमनेर,जि.अहमदनगर | नारायणगिरी महाराज सप्ताह व दत्तमुर्तीची स्थापना कार्यक्रम दि.१५/९/२००५ ते दि.२२/९/२००५अखेर | शिधा - साखर, हरभरा डाळ, तुप डबे इ.वस्तूरुपाने मिळणेबाबत. रु.११,०००/- |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.२५. श्रींचे दिल्ली येथील पादूका दर्शन सोहळयाबाबत.**

**निर्णय क्र.६०३.** दि.०८/०२/२००५ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.०९, व निर्णय क्र. ७४ अन्वये मुंबई, दिल्ली, हैद्राबाद येथे श्रींचे पादूका दर्शन सोहळा व साई महोत्सव घेणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदरच्या निर्णयानुसार हैद्राबाद येथे दि.२६/११/२००५ ते दि.२८/११/२००५ अखेर तीन दिवस एन.टी.आर.मैदानात श्रींचे पादूका दर्शन सोहळा व साई भक्त संमेलन आयोजित करण्याचे निश्चीत केलेले आहे. त्या अनुषंगाने हैद्राबाद येथे दि.०५/०९/२००५ रोजी सायंकाळी ५.०० वा. दिलसुखनगर येथे हैद्राबाद परिसरातील ४० साई मंदिरांच्या अध्यक्ष व पदाधिका-यांना तेथील साईमंदिराच्या अध्यक्षांनी आमंत्रण दिले होते. त्यानुसार जवळ जवळ १०० अध्यक्ष/पदाधिकारी आले होते. त्यात स्थानिक समितीचे गठन करणे त्यांचेमार्फतच वेगवेगळ्या उपसमिती तयार करणे व त्यांचेवर वेगवेगळ्या कामाची जबाबदारी नेमून त्यानुसार काम होते की नाही या अनुषंगाने त्यावर संस्थानचे विश्वस्त/पदाधिकारी यांचे नियंत्रण,मंडप,स्टेज,बॅरेटींग,स्टॉल इ.व्हॉलींटीयर्स, इ.प्रसिध्दीकामी स्थानिक वृत्तपत्रातून तसेच केबल धारक/मिडीया यांचेमार्फत जाहिरात/प्रसार, बोर्डस,बॅनर्स,बॅजेस, निमंत्रण पत्रिका छपाई इ.ची तयारी स्थानिक समितीमार्फत करावयाची आहे. अशाप्रकारचे साधारणपणे आखणी करावी लागते.

उपरोक्त निर्णयानुसारच दिल्ली येथे दि.१९/११/२००५ रोजी कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी श्रींचे पादूका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलनाचे आयोजन केल्याचे कळले आहे, त्यासाठी त्यांनी नेहरु स्टेडियम, ही निश्चीत केल्याचे समजले आहे. ह्या अनुषंगाने दिल्ली येथील स्थानिक मान्यवरांची/ साईमंदिरांचे अध्यक्ष व पदाधिका-यांची सभा घेणे आवश्यक असून त्यात कशा-कशाप्रकारची तयारी करावयाची,मंडप,स्टेज,जाहिराती, बॅनर्स, बोर्डस्, इ. स्थानिक व्हॉलींटीयर्स, इ.बाबतीत ठरवावे लागेल. तसेच स्टेडीयम बुकींगसाठी परवानगी पत्र स्थानिक मेयर/कमिशनर यांना पाठवावी लागतील. तसेच दिल्ली येथे पादूका कशा न्यावयाच्या, कर्मचारी नेणेबाबत इ. बाबी निश्चित कराव्या लागतील. साधारणपणे सदर कार्यक्रमास अंदाजे रु.२५,००,०००/- ते ३०,००,०००/- खर्च येण्याची शक्यता आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे दिल्ली येथे शनिवार, दि.१९/११/२००५ रोजी श्रींचे पादुका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलन आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रक्कम रु.३०,००,०००/- (अक्षरी रु.तीस लाख मात्र) चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दिल्ली, हैद्राबाद, मुंबई व इतर ठिकाणी श्रींच्या पादुका नेण्यात येऊ नयेत त्याऐवजी मोठ्या प्रमाणावर "श्री साईमहोत्सव " आयोजित करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.२६. समाधी मंदीरामध्ये बसवावयाचे सी.सी.टी.व्ही.सिक्यूरिटी सिस्टम कामी आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.६०४.** समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व गुरूस्थान या मंदिरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने अद्ययावत सी.सी.टी.व्ही. सिक्युरिटी सिस्टीम खरेदी कामी दै टाइम्स ऑफ इंडिया, मुंबई व दैनिक सकाळ, पुणे या दोन वृत्तपत्रातून जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.त्यानुसार प्राप्त झालेल्या खालील निविदा व्यवस्थापन समितीचे दि. १८ सप्टेंबर, २००५ चे सभेत उघडण्यात आल्या होत्या .

| अ.नं. | कंपनीचे नांव |
|---|---|
| ०१. | डि-राम इंटरप्रायजेस, मुंबई |
| ०२. | मे. पॅसिफिक एक्सपोर्ट, मुंबई |
| ०३. | मे. ग्रुप ४ सिक्युरिटीज सिस्टीमस प्रा. लि., मुंबई |
| ०४. | मे. थर्ड आय सिक्युरिटी सिस्टीम ( अल्फा इंटर.), मुंबई |

उपरोक्त निविदाधारकांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो सर्व सदस्याना पुरविणेत आला होता. तसेच निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी आजचे सभेत बोलविण्यात आले होते. त्यानुसार खालील निविदासादरकर्ते आजचे सभेस उपस्थित होते.

| अ.नं. | कंपनीचे नांव |
|---|---|
| ०१. | डि-राम इंटरप्रायजेस, मुंबई |
| ०२. | मे. पॅसिफिक एक्सपोर्ट, मुंबई |
| ०३. | मे. ग्रुप ४ सिक्युरिटीज सिस्टीमस प्रा. लि., मुंबई |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांशी चर्चा केली असता, निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या स्पेशिफिकेशन्समध्ये विविधता आढळून आल्याने याकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात अणि निविदेसाठी स्पेशिफिकेशन्स वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावेत व त्यांना योग्य ती फी आदा करावी असे ठरले. (कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

**विषय नं.२७. भक्तनिवासस्थान येथील कॅन्टीन कंत्राटाबाबत.**

**निर्णय क्र.६०५.** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील साईभक्तांना प्रसाद भोजन, अल्पोपहार (नाष्टा)पदार्थ तयार करुन देणे, तसेच पेय पदार्थ पुरविणे यासाठी उपहारगृह चालविणे करीता २४ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, सर्व सेवेबाबतचे दर संस्थानमार्फत निश्चित करून निविदाधारकांकडून निविदा मागवून, निविदाधारक संस्थानला किती मासिक परवाना फी देणार व त्यासाठीची डिपॉझीट रक्कम निश्चित करून भक्तांना सेवा पुरविण्याचे काम मंजूर निविदाधारकास दिलेले आहे. त्यास अनुसरुन नेमलेले कंत्राटदार खालील प्रमाणे सेवा पुरवित आहेत. त्याचा कालावधी व देत असलेली मासिक परवाना फी व सेवा यांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | कंत्राटदाराचे नाव व कामाचे स्वरुप, अनामत रक्कम | पुरविण्यात येणा-या सेवा | कराराचा कालावधी | सध्या प्रतिमहा संस्थानला जमा होणारी परवाना फी |
|---|---|---|---|---|
| ०१. | अ] डी. रविंद्र - उपहारगृह रु. ११,०४,९९८/- | खादय पदार्थ, थंड पेये व इतर पेये भक्तांना पुरविणे | ०१/०१/०४ ते ३१/१२/०५ | रु. ४,४१,९९९/- |

वरील कंत्राटदार यांची उपहारगृहाची मूदत दि.३१/१२/०५ रोजी संपत असल्याने उपरोक्त कामासाठी नवीन कंत्राटदार नेमणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून विहित नमुन्यात पुर्वीचे अटी व शर्तीप्रमाणे पुढील १२ महिन्याचे कालावधीकरीता निवीदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

**विषय नं.२८. पेस्ट कंट्रोलबाबत.**

**निर्णय क्र.६०६.** श्री साईबाबा संस्थानचे निवासस्थानामधील साईभक्तांना देण्यात येणाऱ्या खोल्यांमध्ये झुरळे, ढेकूण इत्यादी किटकांचा उपद्रव होऊ नये या करीता किटक नाशकांची फवारणी करण्यात येत असते.

संस्थानचे खालील इमारतीत/ निवासस्थानात सन १९९७-१९९८ पासून पेस्ट कंट्रोल करण्याचे काम कंत्राट पध्दतीने करण्यात येत आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | खोल्या | हॉल्स | एकूण क्षेत्रफळ चौ.फुट |
|---|---|---|---|---|
| ०१ | भक्तनिवासस्थान | ५०१ | ४२ | १,७३,१४२ चौ.फुट |
| ०२ | चौकशी व निवासस्थान | २४० | १७ | ८८,२९७ चौ.फुट |
| ०३ | धर्मशाळा ( रुग्णालयासह) | ९६ | ०८ | १४,२७४ चौ.फुट |
| | एकूण | ८३७ | ६७ | २,७५,७१३ चौ.फुट |

सन २००४-२००५ करीता पेस्ट कंट्रोल करण्याचे कामाकरीता कोटेशन मान्य करण्यात आले होते. परंतू कोटेशनधारकांनी काम करण्यास असमर्थता दर्शविल्यामूळे विभागाअंतर्गत किटकनाशक साहित्य खरेदी करुन पेस्ट कंट्रोल करण्यात येत आहे.वेळोवेळी किटकनाशक फवारणी करुनही ढेकूण, झुरळे यांचा प्रतिबंध होत नसल्याने पेस्ट कंट्रोल काम करणाऱ्या कंत्राटदाराकडून कोटेशन्स मागवून सदरहू काम करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,१४,०००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख/अधिक्षक, भक्तनिवासस्थान/अधिक्षक,चौकशी व निवासस्थान )

**विषय नं.२९. धर्मशाळा येथील कॅन्टीन, गादी-चादर, शौचालय व गरम पाणी कंत्राटाबाबत.**

**निर्णय क्र.६०७.** श्री साईबाबा धर्मशाळा येथील साईभक्तांना प्रसाद भोजन, अल्पोपहार (नाष्टा)पदार्थ तयार करुन देणे, तसेच पेय पदार्थ पुरविणे यासाठी उपहारगृह चालविणे व धर्मशाळा इमारतीत वास्तव्यास रहाणारे साईभक्तांना गादी, चादर, उशी (कव्हरसह), सतरंजी पुरविणे व स्नानगृह व शौचालय [Pay&Use] पद्धतीने चालविणे करीता २४ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, सर्व सेवेबाबतचे दर संस्थानमार्फत निश्चित करून निविदाधारकांकडून निविदा मागवून, निविदाधारक

संस्थानला किती मासिक परवाना फी देणार व त्यासाठीची डिपॉझीट रक्कम निश्‍चित करून भक्तांना सेवा पुरविण्याचे काम मंजूर निविदाधारकास दिलेले आहे. त्यास अनुसरुन नेमलेले कंत्राटदार खालील प्रमाणे सेवा पुरवित आहेत. त्यांचा कालावधी व देत असलेली मासिक परवाना फी व सेवा यांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | कंत्राटदाराचे नाव व कामाचे स्वरुप, अनामत रक्कम | पुरविण्यात येणा-या सेवा | कराराचा कालावधी | सध्या प्रतिमहा संस्थानला जमा होणारी परवाना फी |
|---|---|---|---|---|
| ०१. | शिवालय केटरर्स -उपहारगृह रु. १,०३,८७८/- | खादय पदार्थ, थंड पेये व इतर पेय भक्तांना पुरविणे. | १७/०२/०५ ते १६/०२/०६ | रु. ४१,५५१/- |
| ०२ | श्री भाऊसाहेब विश्‍वनाथ भोसले, शिरडी - गादी, चादर, उशी सतरंजी पुरविणे. रु. २५,०००/- | भक्तांना गादी, चादर, उशी सतरंजी पुरविणे. | ०१/०१/०४ ते ३१/१२/०५ | रु. २९,५००/- |
| ०३ | सेवा फौडेंशन, अ.नगर शौचालय व स्नानगृह [Pay&Use].रु.२५,०००/- | शौचालय व स्नानगृह/गरमपाणी सुविधा पुरविणे | ०३/०१/०४ ते ३१/१२/०५ | रु. ३०,०३१/- |

वरील अ.नं. १ या कंत्राटदाराची उपहारगृहाची मुदत दि.१६/०२/०६ रोजी संपत आहे व अ.नं. २ व ३ या कंत्राटदाराची मूदत दि.३१/१२/०५ रोजी संपत आहे. तरी उपरोक्त कामासाठी नवीन कंत्राटदार नेमणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून विहित नमुन्यात पुर्वीचे अटी व शर्तीप्रमाणे पुढील १२ महिन्याचे कालावधीकरीता निवीदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-धर्मशाळा प्रमुख)

**विषय न.३०. संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.६०८.** दर वर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी एकूण वार्षिक वेतनाच्या एक बारांश (८.३३%) रक्कम ''सानुग्रह अनुदान'' म्हणून देण्यात येत असते. त्याप्रमाणे याही वर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना खालील पध्दतीने येत्या दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान देण्यात यावे, असें ठरलें.

०१. संस्थान आस्थापनेवर मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या शैक्षणिक विभाग, रुग्णालयासह इतर सर्व विभागांकडील सेवकांना दि. ०१/१०/२००४ ते दि.३०/०९/ २००५ या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२) रक्कम.

०२. कार्यकारी संपादक व सह.कार्यकारी संपादक ''साईलीला'' मराठी, इंग्रजी व हिंदी, यांना दिनांक ०१/१०/२००४ ते दिनांक ३०/०९/२००५ या कालावधीत दिलेले मानधनाच्या एक बारांश (एकूण मानधन ÷१२) एवढी रक्कम.

०३. दि.०१/१०/२००४ नंतर मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या सेवकांना दि.३०/०९/२००५ अखेरच्या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२) रक्कम.

०४. दि.३०/०९/२००५ पूर्वी निवृत्त झालेल्या वा नोकरी सोडून गेलेल्या अगर इतर कोणत्याही कारणाने (अपहार प्रकरणी कमी केलेल्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) नोकरी संपुष्टात आलेल्या; मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या सेवकांना दि. ०१/१०/२००४ अगर त्यानंतर प्रत्यक्ष नोकरीत आलेल्या तारखेपासून ते कामावर असलेल्या कालावधीत दिलेल्या वेतनाच्या प्रमाणात येणारी (एक बारांश) (याप्रमाणात येणारी रक्कम)

०५. प्रतिनियुक्तीने संस्थानकडे तात्पूरत्या कालावधीसाठी नेमणूका झालेले शासकीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या एकूण वेतनाच्या एक बारांश एवढी रक्कम.

वरीलप्रमाणे सानुग्रह अनुदान दिवाळीच्या पूर्वी देण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे यावर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान देण्यात यावे,असें ठरलें.

(कार्यवाही-आस्थापना विभागप्रमुख)

**विषय न. ३१. अधिक्षक हे पदनाम व त्या पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत श्री.रामराव शेळके व इतर दोन यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.६०९.** याबाबत व्यवस्थापन समितीचे दि.६.८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४३२ अन्वये संस्थान आस्थापनेचा आकृतीबंध लवकरच तयार करण्यात येत आहे. या आकृतीबंधानुसार पात्रताधारक कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असें ठरलें आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.३२.** **डोअर फ्रेम व हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदीकामी आलेल्या कोटेशन्सवर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.६१०.** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८.०७.२००५ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र. २१ निर्णय क्र. ३५२ अन्वये डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर व हँड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदीकामी रुपये ६,०१,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन नामांकीत वितरकांकडून सिलबंद पाकिटातून दरपत्रके मागविण्यात आली सदरची पाकीटे (कोटेशन्स) दि. १८.०९.२००५ रोजी मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांसमोर उघडण्यात आली आहे. वितरकांनी दिलेल्या दरपत्रकांचा तपशील खालील प्रमाणे दर्शविण्यात आला आहे.

**(०१) मॉडर्न सिक्युरीटी अँड सिक्रेट सर्व्हीसेस प्रा. ली. कोलकत्ता.**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर | ३५,०००/- प्रतियुनिट | १७ नग | ५,९५,०००/- |
| ०२ | हँड हेल्ड मेटल डिटेक्टर (मॉडेल एम ७ एमडी) | ३,७००/- प्रतिनग | ५० नग | १,८५,०००/- |
| इन्स्टॉलेशन चार्चेस रुपये ५,०००/- प्रति डोअर मेटल डिटेक्टर करीता होणारी रक्कम रुपये | | | | ८५,०००/- |
| | | | पी. अँड एफ चार्चेस ६ टक्के | ४६,८००/- |
| | | | एकूण रक्कम | ९,११,८००/- |

**०२) मगनुम इलेक्ट्रॉनिक्स, बेंगलोर**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर | ४६,०००/-प्रतियुनिट | १७ नग | ७,८२,०००-०० |
| ०२ | हँड हेल्ड मेटल डिटेक्टर (एमई.डब्ल्यु.टी.एम.डी. ०१) | १२,७००/-प्रतिनग | ५० नग | ६,३५,०००-०० |
| | | | १२.५ टक्के व्हॅट | १,७७,१२५-०० |
| | | | ४ टक्के जकात (अ.नं.१ व २ वर) | ५६,६८०/- |
| २० टक्के अॅडव्हान्स पेमेंट ऑर्डरसोबत / वाहतुक व इतर खर्च वेगळा द्यावा लागेल | | | | |
| | | | एकूण रक्कम | १६,५०,८०५-०० |

**०३) सिव्हीटेक इंडिया, नाशिक**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर (मेटास्कन एस ३- डिएस) | ४२,०००/-प्रतियुनिट | १७ नग | ७,१४,०००/- |
| ०२ | हँड हेल्ड मेटल डिटेक्टर (व्हेलीडॅटॉर एस-१५) | ३,२००/-प्रतिनग | ५० नग | १,६०,०००/- |
| इन्स्टॉलेशन चार्चेस रुपये २,०००/- प्रति डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर | | | | ३४,०००/- |
| अतिरोक्त टॅक्सेस द्यावे लागतील / ५० % अॅडव्हान्स पेमेंट ऑर्डरसोबत | | | | |
| | | | एकूण रक्कम | ९,०८,०००/- |

**०४) युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनिक्स, चेन्नई**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर | ४६,३००/- प्रतियुनिट | १७ नग | ७,८७,१००/- |
| ०२ | हँड हेल्ड मेटल डिटेक्टर (मॉडेल युई-०१ युके मेक) | ६,९००/- प्रतिनग | ५० नग | ३,४५,०००/- |
| सर्व करांची रक्कम अतिरोक्त द्यावी लागेल / १०० % अॅडव्हान्स पेमेंट | | | | |
| | | | एकूण रक्कम | ११,३२,१००/- |

**०५) अॅपेक्स ऑटोमेशन अँड सिक्युरिटी सिस्टीम्स, नागपूर**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर (एमएमडी- ०६) | १,०८,०००/- प्रतियुनिट | १७ नग | १८,३६,०००/- |
| ०२ | हँड हेल्ड मेटल डिटेक्टर (एमडी-३००३) | ८,५००/- प्रतिनग | ५० नग | ४,२५,०००/- |

| | |
|---|---|
| १२.५ % व्हॅट | २,८२,६२५/- |
| इन्स्टॉलेशन चार्चेस रुपये | १०,०००/- |
| एकुण रक्कम | २५,५३,६२५/- |

**०६) ब्रम्हा सेल्स अँड सर्व्हीसेस, सांगली**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर (मॉडेल डी- १०) | ३६,०००/- प्रतियुनिट | १७ नग | ६,१२,०००/- |
| ०२ | हॅंड हेल्ड मेटल डिटेक्टर (मॉडेल केवाय ०५) | ३,१००/- प्रतिनग | ५० नग | १,५५,०००/- |
| | | | १२.५ % व्हॅट | ९५,८७५/- |
| | | | इन्स्टॉलेशन चार्चेस प्रति डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर रु. ५५०० प्रतिनग प्रमाणे | ९३,५००/- |
| | | | ४०% अॅडव्हान्स पेमेंट | |
| | | | एकूण रक्कम | ९,७३,६३३/- |

**०७) रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स, अंबड, नाशिक**

**अ)**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर (मॉडेल रोबो ३ एम.एस. सिंगल झोन) | २७,०००/- प्रतियुनिट | १७ नग | ४,५९,०००/- |
| ०२ | हॅंड हेल्ड मेटल डिटेक्टर (मॉडेल आरई-एएच ०१) | २,०००/- प्रतिनग | ५० नग | १,००,०००/- |
| | | | १२.५ % व्हॅट | ६९,८७५/- |
| | | | एकूण रक्कम | ६,२८,८७५/- |

**०७) रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स, अंबड, नाशिक**

**ब)**

| अ. नं. | तपशील | दर | मागणी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर (मॉडेल रोबो ३ एम.एस. सिंगल झोन) | २७,०००/- प्रतियुनिट | १७ नग | ४,५९,०००/- |
| ०२ | हॅंड हेल्ड मेटल डिटेक्टर (मॉडेल आरई २००३) | २,७००/- प्रतिनग | ५० नग | १,३५,०००/- |
| | | | १२.५ % व्हॅट | ७४,२५०/- |
| | एकुण रक्कम | | | ६,६८,२५०/- |

वरील प्रमाणे वितरकांकडून आलेल्या कोटेशन्समधील दरपत्रकांचा तुलनात्मक तपशील दर्शविला असून अ. नं. ७ मधील रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक यांनी वर नमूद केलेप्रमाणे (अ) मधील एकूण किंमत रु. ६,२८,८७५/- व (ब) मधील एकूण किंमत रु. ६,६८,२५०/- इतर कोटेशन्स मधील दरांपेक्षा निम्नतम आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८.०८.२००५ चे सभेतील विषय नं. २१ निर्णय क्र. ३५२ अन्वये वरीलप्रमाणे डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर व हॅंड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदीकामी रुपये ६,०१,०००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. निम्नतम दरांप्रमाणे रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक यांचेकडून खरेदी करावयाची झाल्यास रुपये (अ) प्रमाणे ६,२८,८७५/- व (ब) प्रमाणे खरेदी करावयाची असल्यास रुपये ६,६८,२५०/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च हा रुपये ६,०१,०००/- या मंजूर झालेल्या खर्चापेक्षा अधिक येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे. रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स, अंबड, नाशिक यांनी त्यांचे प्रस्तावात दिलेल्या 'ब' प्रमाणे डोअर फ्रेम व हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ६,६८,२५०/- चे खर्चास मान्यता देणेत आली. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र. ३५२ अन्वये वरीलप्रमाणे डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर व हॅंड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदीकामी रुपये ६,०१,०००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. परंतू प्रत्यक्षात रुपये ६,६८,२५०/- इतका खर्च येत आहे. म्हणजेच मंजूर रक्कमेपेक्षा येणारे रक्कम रुपये ६७,२५०/- मात्रचे जादा खर्चासही मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं.३३** **मालिकेच्या जाहिरातीसाठी मंदिर परिसरात व्हीडिओ स्क्रिन लावून धार्मिक गीते दाखविणेबाबत.**

**निर्णय क्र.६११.** श्री सत्य राघवन, सहा.उपाध्यक्ष, स्टार प्लस यांनी त्यांचे दिनांक १० सप्टेंबर,२००५ चे फॅक्स पत्रान्वये श्री रामानंद सागर निर्मीत "श्री साईबाबा " ही मालिका आम्ही दिनांक ०९ ऑक्टोबर,२००५ रोजी स्टार प्लस या

दुरचित्रवाहिनीवरुन दाखविण्यास प्रारंभ करणार आहोत. त्यासाठी मालिकेची जास्तीत जास्त भक्तांना माहिती होणेकरीता संस्थानकडून खालीलप्रमाणे सहकार्य मिळावी अशी विनंती केलेली आहे.

अ) सदरच्या मालिकेच्या जाहिरातीसाठी (जेणे करुन जास्तीत जास्त भक्तांना माहिती होईल ) मंदिर परिसरात दिनांक २ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर,२००५ या कालावधीत दोन व्हीडीओ स्क्रिन लावून त्यावर सदर मालिकेतील धार्मिक परंपरा व धार्मिक गीते दाखविणेस परवानगी मिळावी. सदरचे दोन व्हीडीओ स्क्रिन आपण ज्या ठिकाणी लावणेस परवानगी द्याल त्या ठिकाणी लावणेत येतील.

ब) ज्यावेळी भक्त सदरचे कार्यक्रम पाहण्यासाठी व्हीडीओ स्क्रीनजवळ येतील त्यावेळेस त्यांना शो-कार्डस् वाटण्याची इच्छा असून त्यास परवानगी मिळावी.

क) सर्व साईभक्तांना (प्रामुख्याने मुंबईतील) SMS/MMS व्दारे त्यांच्या प्रार्थना कळविण्याची सुविधा आम्ही आमचे स्टार SMS नबर ७८२७ वर उपलब्ध करुन देणार आहे. याबाबत सविस्तर माहिती आम्ही या आठवड्यात तयार करुन आपणास कळविणार आहोत. तरी त्यासाठी आपले संस्थानचे संकेतस्थळ (Website) वापरणेस परवानगी मिळावी जेणे करुन आमचे संकेतस्थळाला भेट देणारे अनेक व्यक्ती आपले संकेतस्थळास भेट देऊन सदर कार्यक्रमाची त्यांना माहिती होईल.

आजपर्यन्त कोणत्याही खाजगी प्रसारणस मंदिर परिसरात संस्थानचे स्वत:चे कार्यप्रणालीवर परिणाम होऊ नये या कारणास्तव जाहिराती अगर तत्सम प्रसारणास परवानगी देण्यात आलेली नाही. तथापि, स्टार प्लस वाहिनीला मंदिर परिसर सोडून प्रसादालय, धर्मशाळा, भक्तनिवास आदी ठिकाणी परवानगी देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी /आय.टी.विभागप्रमुख)

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं ०१.** **नवीन नियोजित रुग्णालयाच्या कर्मचारी निवासस्थान योजनेबाबत.**

**निर्णय क्र.६१२.** नवीन नियोजित रुग्णालयाचा कर्मचारी आकृती बंध शासनाला सादर केला जात आहे. त्यातील कर्मचारी वर्गाची संख्या, मानद पदे वगळता ५३१ एवढी आहे. यापैकी काही स्थानिक कर्मचारी वगळता अंदाजे ४०० कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान उपलब्ध करुन देणे महत्वाचे आहे. शिवाय १०० परिचारिका विद्यार्थिनींसाठी वसतीगृह आवश्यक आहे. आज मितीस अशी फक्त १५ ते २० निवासस्थाने या कर्मचा-यांसाठी उपलब्ध आहेत. दिनांक १८/७/२००५ रोजीच्या विश्वस्त सभेत परिचारिका प्रशिक्षण केंद्राबद्दलही ठराव पारीत झाला आहे. त्याचाही समावेश या निवासस्थानांमध्ये घेण्यात आला आहे.

खालील योजनेत ३८१ निवासस्थाने व अंदाजे १०० विद्यार्थीनींना राहण्यासारखे परिचारिका वसतीगृह यांचा समावेश आहे.

निवासस्थाने खालीलप्रमाणे.

१) **वरिष्ठ प्रशासक/मेडिकल डायरेक्टर** - रुग्णालय विभागातील सर्वोच्च पदासाठीच्या निवासस्थानासंबंधी अपेक्षा अंदाजे १४०० स्क्वे.फुट बांधकामाचे ३ BHK निवासस्थान स्वतंत्र बंगला बाग इत्यादी सहित. यातील दोन बेडरूम्समध्ये पाश्चिमात्य पध्दतीचे शौचालय व बाथरुम जोडलेले असावेत. या शिवाय भारतीय स्वरुपाचे १ शौचालय व १ बाथरुम असावे.

२) **वैद्यकीय प्रशासक/वैद्यकीय अधिक्षक**, प्रत्येकी एक असे एकूण दोन निवासस्थाने, ज्यामध्ये एक जोडबंगला (Twin Bunglow) स्वरुपात दोन निवासस्थाने अंदाजे १२०० स्क्वे.फु. प्रत्येकी २ BHK स्वरुपात व दोन टॉयलेट सह ज्यातील एक पाश्चिमात्य असावे. बाग व गच्ची अपेक्षीत आहे.

३) **डॉक्टरांची निवासस्थाने** - एकूण ५० असावीत, एका बिल्डींगमध्ये ६ फ्लॅट या स्वरुपात प्रत्येक फ्लॅट अंदाजे १००० स्क्वे.फु. आकाराचा असून प्रत्येकी दोन टॉयलेट ज्यातील एक पाश्चिमात्य स्वरूपात असेल.

४) **मेट्रन/प्रिन्सीपॉल नर्सिंग कॉलेज/ असिस्टंट मेट्रन २ -** एकंदर चार फ्लॅट असलेल्या इमारतीत अंदाजे प्रत्येकी १००० स्क्वे.फु. आकाराचे असून प्रत्येकी दोन टॉयलेटपैकी एक पाश्चिमात्य असावा.

५) **निवासस्थान स्टाफ नर्सेस**- किमान १५० जणांसाठी यातील सुमारे १८ फ्लॅटस् २ BHK स्वरुपात किमान ८५० स्क्वे.फु. स्वरुपात असावीत व बाकी १ BHK स्वरूपात किमान ६५० स्क्वे.फुट स्वरुपाची असावीत.

६) **लिपीक,फार्मासिस्ट, टेक्निशियन** इत्यादी वर्गासाठी अंदाजे २४ निवासस्थाने प्रत्येकी ६५० स्क्वे.फू. आकाराची १ BHK स्वरुपाची असावीत.

७) **चतुर्थश्रेणी कर्मचारी** निवासस्थाने अंदाजे १५० असावीत. प्रत्येक कमीत कमी ४०० स्क्वे.फूट आकाराचा व बाथरुम शौचालयाच्या सोयीसहित असावा.

८) **परिचारिका** प्रशिक्षण केंद्रासाठी सध्या २० मुलीच्या तंत्रिक प्रशिक्षणाची सोय करण्याचे नियोजन आहे. परंतु पुढील वाढीव योजना लक्षात घेता १०० मुलीं राहण्यासारखे, स्वंतत्र खोली व सामाईक शौचालये बाथरुम असलेले वसतीगृह अपेक्षीत आहे. ज्यात वॉर्डन साठी २ BHK निवासस्थानाची सोय असावी. सध्या २० मुली त्यात राहू शकतील. इतर खोल्यात सेवेत असलेल्या एकटया परिचारिका राहू शकतील, दरवर्षी २० मुली ३ $^{1}/_{2}$ वर्षे राहणार असल्यामुळे मुलींची संख्या प्रत्येक वर्षी खालीलप्रमाणे राहील.

प्रथम वर्षे - २० विद्यार्थिनी

व्दितीय वर्षे - ४० विद्यार्थिनी

तृतीय वर्षे - ६० विद्यार्थिनी

चतुर्थ वर्षे (६ महिने) - ८० विद्यार्थिनी

वरील विद्यार्थिनींना २ वर्षाचा बाँड पूर्ण करावा लागणार असल्याने त्याही काळात त्या वसतीगृहात राहू शकतील.

वरील प्रकल्पाबाबत बांधकाम विभागाकडून या संबंधीचे मत मागविण्यात आले. ही निवासस्थाने रुग्णालयाला जवळ असावीत. अशा जागेची पाहणी करुन बांधकाम विभागाने एकूण क्षेत्रफळ २,४५,३५० चौ.फुटबांधकामासाठी जमीन खर्च वगळता रु.१३,६८,१२,०००/-(अक्षरी रु.तेरा कोटी अड्डूसष्ट लाख बारा हजार मात्र) अपेक्षित असून त्यास तत्वत: मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं ०२.** **श्री देशपांडे पुरुषोत्तम एकनाथ, अहमदनगर, श्री कुलकर्णी सर्जेराव रंगनाथ, शिर्डी, श्री गुंजाळ नागेश चनाप्पा,सोलापूर व श्री.गोकुळ महादेव वाकचौरे, शेवगे, दारणा यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.६१३.** **०१)**श्री.देशपांडे पुरुषोत्तम एकनाथ,रा.अहमदनगर यांनी त्यांची पत्नी सौ. नलिनी यांचे हृदयशस्त्रक्रियेकरीता संस्थानकडे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि. २१/०९/२००५ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे.

अर्जासोबत श्री. देशपांडे यांनी रुग्णालयाचे फायनल बील जोडलेले आहे. त्यावरुन सौ.देशपांडे यांची ह्दयशस्त्रक्रिया ग्रँट मेडिकल फाऊंडेशन रुबी हॉल क्लिनीक, पुणे या रुग्णालयात दि. २७/०७/२००५ रोजी झालेली असून त्याकरीता रु.१,८९,८७९/- खर्च आल्याचे निदर्शनास येते.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार अनुदान मागणी अर्ज शस्त्रक्रियेच्या तारखेपासून एक महिन्याचे आत इकडील कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. सौ. देशपांडे यांची शस्त्रक्रिया दि. २७/०७/२००५ रोजी झालेली असल्याने त्यांचा अनुदान मागणी अर्ज दि. २६/०८/२००५ पर्यंत इकडील कार्यालयास मिळणे आवश्यक होते. परंतु सदरचा अर्ज दि. २१/०९/२००५ रोजी म्हणजेच उशिरा प्राप्त झालेला आहे.

**०२)**श्री.कुलकर्णी सर्जेराव रंगनाथ यांनी त्यांचा मुलगा चि.श्रीनाथ यांचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि. १८/०९/२००५ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे.

अर्जासोबत श्री कुलकर्णी यांनी खालील प्रमाणे कागदपत्रे दिलेली नाहीत.

१) उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) मूळप्रत.

२) शस्त्रक्रिया तारीख नाही

३) प्रमाणित प्रती नाहीत.

चि.श्रीनाथ हा हर्षप्रुंग (HIRSCHSPRUNGS) या आजाराने ग्रस्त असून त्यांचेवर तोतला हॉस्पिटल,औरंगाबाद या खाजगी रुग्णालयात उपचार चालू असून शस्त्रक्रिया होणार आहे.शस्त्रक्रियेसाठी रु.३०,०००/- खर्च येणार असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार चि.श्रीनाथ यांचे आजाराकरीता अनुदान देता येत नाही. तसचे खाजगी रुग्णालयाचे नावे अनुदान देण्यात येत नाही.

०३) श्री. नागेश चनाप्पा गुंजाळ, रा.सोलापूर यांनी त्यांचे हृदयशस्त्रक्रियेकरीता संस्थानकडे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि. ०१/०३/२००५ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. अर्जासोबत शस्त्रक्रिया तारीख,खर्चाचे प्रमाणपत्र व उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही.

सदरचे अर्जावर कार्यवाही होऊन श्री. गुंजाळ यांनी वरील प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता ऑपरेशन तारखेपासून एक महिन्याचे आत करणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/ २४९८/२००५ दि.०९/०३/२००५ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

श्री. गुंजाळ यांनी वरील प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता केलेली असून सदरची कागदपत्रे दि. २५/०६/२००५ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेली आहे. श्री. गुंजाळ यांची ह्दयशस्त्रक्रिया एन.एम.वाडीया इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिओलॉजी, पुणे या रुग्णालयात दि.१०/०२/२००५ रोजी झालेली असून त्याकरीता रु. १,३०,०००/- खर्च आल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री. गुंजाळ यांनी कागदपत्रांची पूर्तता दि. ०८/०४/२००५ अखेर करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी दि. २५/०६/२००५ रोजी म्हणजेच उशीरा पूर्तता केलेली आहे. त्यामुळे इकडील जा.नं. एसएसएस/एसएसएच/अनुदान/६९२७/२००५ दि. ०४/०७/२००५ व जा.नं.एसएसएस/ एसएसएच/अनुदान/९७१८/२००५ दि.०८/०९/२००५ चे पत्रान्वये श्री. गुंजाळ यांना आपला अनुदान मागणी अर्ज उशीरा म्हणजे शस्त्रक्रियेच्या तारखेपासून एक महिन्यानंतर आलेला आहे असे कळविण्यात आलेले आहे.

श्री. गुंजाळ यांना अनुदान देणेकामी मा.श्री. धर्मण्णा सादूल, माजी खासदार, सोलापूर तसेच श्री.विष्णूपंत कोठे, संपर्क प्रमुख, (मा.श्री. सुशिलकुमार शिंदे संपर्क कार्यालय) सोलापूर यांनी शिफारस पत्र दिलेले आहे.

**०४)** श्री. गोकुळ महादेव वाकचौरे, शेवगे दारणा यांनी त्यांचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे अनुदान मागणी अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि. २५/०७/२००५ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. अर्जासोबत उत्पन्नाबातचे प्रतिज्ञापत्र व शस्त्रक्रियेची तारीख दिलेली नाही.

श्री. वाकचौरे यांचे दोन्ही पायांच्या खुब्यांची शस्त्रक्रिया (HIP REPLACEMENT) के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई या रुग्णालयात होणार असून त्याकरीता रु. १,६०,०००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री. वाकचौरे यांचे आजाराकरीता अनुदान देता येत नाही. तथापि,मा.विश्वस्त श्री. अशोक खांबेकर साहेब यांनी सदरचा अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत कळविलेले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ.नं. १ ते ४ श्री.देशपांडे, श्री.कुलकर्णी, श्री.गुंजाळ व श्री वाकचौरे यांना त्यांचे आजारावरील उपचारासाठी वैद्यकीय उपचारासाठी संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार आर्थिक अनुदान देता येत नाही. परंतू एक विशेष बाब म्हणून कागदपत्रांची पूर्तता करुन त्यांना संस्थान नियमानुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात यावे असें ठरलें.

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३. नवीन नियोजित रुग्णालयासाठी मशिनरी/शस्त्र खरेदीबाबत.**
**निर्णय क्र.६१४.** खालील काही मशिन्स व ऑपरेशन्ससाठी लागणारे साहित्य, शस्त्र, औषधे, स्पेशल गाद्या इत्यादी तातडीने खरेदी करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रुपये १,५१,९०,०००.०० खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं | तपशील | मागणी | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | ६ ऑपरेशन थिएटरसाठी आवश्यक असलेले शस्त्र खरेदी | | ५०,००,०००.०० |
| ०२. | मशिनरी | | |
| | अ) सिरिन्ज पम्पस्/इन्फ्यूजन पम्पस | २० | १०,००,०००.०० |
| | ब) लॅपरोस्कोप (निदान/शस्त्रक्रिया) | ०१ | २०,००,०००.०० |
| | क) कार्डियक ऑपरेशन टेबल | ०१ | २०,००,०००.०० |
| | ड) ऑक्सीजन व गॅससाठी सिलेंडर | ७५ | १,५०,०००.०० |
| | इ) हवा व पाणी भरलेल्या गाद्या | २० | ४०,०००.०० |
| ०३. | आवश्यक ती औषधे खरेदी | | ५०,००,०००.०० |
| | एकूण रक्कम रुपये | | १,५१,९०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील खरेदीसाठी किंवा यापूर्वी मान्यता मिळालेल्या मशिनरीच्या खरेदीसाठी जेंव्हा जेंव्हा आवश्यक असेल तेंव्हा तेंव्हा मशिनरी आयात करण्यासाठी L.C काढून पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. भारतीय/परकीय चलनात L.C काढणे, त्यासाठी आवश्यक ते डिपॉझीट बँकेकडे ठेवणे किंवा बँकेकडे असणाऱ्या गुंतवणूकीपोटी L.C घेणे व त्याकरीता द्यावे लागणारे बँक कमिशन आदा करणेस मान्यता देण्यात आली. नवीन नियोजित रुग्णालयासाठी आवश्यक असणारे मशिन्स व ऑपरेशन्ससाठी लागणारे साहित्य शस्त्र, औषधे, स्पेशल गाद्या इत्यादीसाठी रुपये ५ लाखापेक्षा अधिक खर्च येणार असेल तर त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच रुपये ५ लाखापेक्षा कमी खर्च अपेक्षित असेल तेथे दरपत्रके मागवून खरेदी करण्यात यावीत असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं ०४. जयपूर फूट शिबीर आयोजित करणेबाबत.**

**निर्णय क्र.६१५.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) तर्फे मोफत अपंग सहाय्यता शिबीर (जयपूर फूट शिबीर) घेण्यात येत असते. मागील वर्षी सदर शिबीर नोव्हेंबर,२००४ मध्ये घेण्यात आले होते. चालू वर्षी सदर शिबीर २७ नोव्हेंबर,२००५ ते २ डिसेंबर,२००५ या कालावधीमध्ये आयोजित करणेबाबत ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांना कळविले आहे. या शिबीरासाठी कृत्रिम पाय बनविणाऱ्या संस्थेचा सहभाग घ्यावा लागतो, त्याप्रमाणे दिनांक १७.०९.२००५ रोजी ग्रामीण आरोग्य प्रकल्प जामखेड यांनी प्रस्ताव देऊन शिबीर आयोजित करणेबाबत कळविले आहे. या शिबीरात १५० रुग्ण लाभ घेतील असा अंदाज आहे.

या शिबीरासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशील | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | (अ) गुडघ्याखालील पाय रु.८००/- प्रत्येकी १०० पायांकरिता<br>(ब) गुडघ्यावरील पाय रु.१२५०/- प्रत्येकी ५० पायांकरिता | ८०,०००.००<br>६२,५००.०० |
| ०२. | वर्कशॉपमध्ये कामास असणारे कुशल तंत्रज्ञ कामगार (१० कारागीरांना रु.१००/- प्रत्येक दिवसाला ०७ दिवसासाठी) मानधन रु.७,०००/- तसेच जेवण, चहा, नाष्टा इ.खर्च रु. १,५००/- | ८,५००.०० |
| ०३. | रुग्ण व नातेवाईक यांना सकाळ संध्याकाळ जेवण व चहा | २५,२००.०० |
| ०४. | (अ) शिबीराच्या प्रचारासाठी वर्तमानपत्रात जाहिरात (दै.सकाळ, दै.सार्वमत, दै.लोकसत्ता, दै.गावकरी, दै.लोकमत व दै.सामना यांच्या स्थानिक आवृत्त्यामध्ये)<br>(ब) कापडी बॅनर्स- ०६ नग परिसरात लावणेस व उद्घाटन समारंभासाठी-०१ | १८,०००.००<br>२,०००.०० |
| ०५. | फेवीकॉल व गॅस सिलेंडर इ.साठी अंदाजे खर्च | ५,०००.०० |
| ०६. | कंत्राटी कर्मचारी-वर्कशॉप करिता ४ कंत्राटी कर्मचारी, ७ दिवसांसाठी व उद्घाटन समारंभासाठी ५ कर्मचारी ०१ दिवसासाठी | ३,५००.०० |
| ०७. | इतर किरकोळ खर्च | ५,०००.०० |
| | अंदाजे एकूण खर्च रक्कम रुपये- | २,०९,७००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, २७ नोव्हेंबर,२००५ ते २ डिसेंबर,२००५ या कालावधीमध्ये वरील प्रमाणे जयपूर फूट शिबीर आयोजित करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,०९,७००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षिका, रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं ०५. प्रसादालय हॉल, किचन व उपभांडाराचे आतील भागातील रंगकाम व दुरुस्ती बाबत.**

**निर्णय क्र.६१६.** प्रसादालय नूतनीकरणाचे कामाकरिता, सन २००४ मध्ये तत्कालीन व्यवस्थापन मंडळाचे काळात निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्लॅनमध्ये काही सुधारणा करावयाचे असल्याने व्यवस्थापन समितीचे सभेत सदर निविदा रद्द करावी व सुधारीत आराखडा तयार करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. याकामी काही कालावधी जाणार असल्याने प्रसादालय प्रमुख यांनी प्रसादालय हॉल किचन ऑफीस उपभांडार इ. रंगकाम करुन मिळण्याची विनंती केली होती. याकामी रु. ८५,१५२.०० मात्र खर्च अपेक्षित होता. मात्र नूतनीकरणाचे काम दोन महिन्यात सुरु होणार असल्याने रंगकाम स्थगीत ठेवण्यात आले होते.

दि. ०३/०५/२००५ निर्णय क्र. १८२ अन्वये सध्याचे प्रसादालय नूतनीकरणाचे काम स्थगित करुन ,शेती महामंडळाचे जागेत नव्याने प्रसादालय बांधकाम करण्याचे ठरविले आहे. प्रसादालय बांधकामाकरीता निविदा मागविण्यात येत आहे. या करिता एक वर्षाचा कालावधी लागणार असल्याने सध्याचे प्रसादालयाचे आतील भागातील रंगकामाकरीता व इतर दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याकरीता खालीलप्रमाणे अंदाजे ४,२५,०९०.०० खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | तपशील | एकूण अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | प्रसादालय आतील भागातील रंगकाम करणे | १,४४,९१९.०० |
| ०२ | प्रसादालय हॉल खराब झालेले पत्रे, टाईल्स बदलणे इ. दुरुस्ती | २,८०,१७१.०० |
| | **एकूण रुपये** | **४,२५,०९०.००** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं ०६** **संस्थानचे दादर येथील साईनिकेतन इमारतीचे विस्तारीकरण करणेसाठी मे.ऑरगॅनिक्स (आर्किटेक्ट श्री अंबेकर), मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेबाबत**

**निर्णय क्र.६१७.** साईनिकेतन इमारत विस्तारीकरण व विकसित करणेसाठी मे.हीरा-नंदानी, मुंबई यांची सल्लागार म्हणून व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८.०५.२००५ चे सभेतील निर्णय क्र.२२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. याकामी मे.हिरा-नंदानी यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र त्यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्याने आर्किटेक्ट राहूल पी. आंबेकर, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१८/०९/२००५ चे पत्रान्वये, मा. सदस्य श्री.शैलेश कुटे यांचे सूचनेवरुन त्यांनी श्री साईबाबा संस्थानचे मुंबईतील दादर येथील साईनिकेतन इमारतीची पहाणी केली आहे. तसेच तेथील इमारत व जागेबाबत त्यांनी अभ्यास केला असून त्याबाबतचा अहवाल ते सादर करणार आहेत.

वरीलप्रमाणे संस्थानचे साईनिकेतन (दादर) इमारतीसाठी आर्किटेक्चरल सेवा पुरविणेबाबत संस्थानचे नेमणूक पत्र मिळावे अशी विनंती केली आर्किटेक्ट श्री.आंबेकर यांनी वरील पत्राव्दारे केलेली आहे. याठिकाणी नवीन विस्तारीत इमारत बांधकामासाठी आराखडे (Schematic Designs) ते सादर करणार आहेत.

तरी संस्थानचे दादर येथील साईनिकेतन इमारतीचे विस्तारीकरण करणेसाठी मे.ऑरगॅनिक्स, मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं ०७** **कनिष्ठ महाविद्यालयासाठी लागणारे बेचेंस, ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.६१८.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०५.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेतील निर्णय क्र.२२९ नुसार कनिष्ठ महाविद्यालयातील नव्याने सुरु झालेल्या इ.११ वी कला आणि वाणिज्य शाखेच्या वर्गासाठी ६० बेंचेस प्रचलित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास रु. ९०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. तथापि; याबाबत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांशी चर्चा केली असता त्यांनी औद्यागिक प्रशिक्षण संस्थेत चांगले आणि टिकाऊ बेंचेस तयार करता येतील असे सांगितले . त्यानुसार एका बेंच करीता रु.१९७७/- पर्यंत खर्च येईल.

कनिष्ठ महाविद्यालयासाठी लागणा-या ६० बेंचेस करीता लागणारे साहित्य प्रचलित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,१८,६२०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग/प्राचार्य,आय.टी.आय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं ०८** **पार्ले बिस्कीटे खरेदीबाबत**

**निर्णय क्र.६१९.** सन २००५-०६ सालासाठी कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असणारे बिस्कीटे खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०७.२००५ चे सभेत निविदाधारकांशी चर्चा तथा वाटाघाटी होवून न्यूनतम दराने मे.वर्धमान ट्रेडर्स, बेलापूर यांना जा.क्र.८४३६ दि.१०.०८.२००५ अन्वये पार्ले बिस्कीटे तसेच इतर किराणा माल पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. मे.वर्धमान ट्रेडर्स, बेलापूर यांनी पार्ले बिस्कीटासाठी कंपनी दरावर २ टक्के सूट देवू केलेली होती. त्यानुसार त्यांचा पुरवठा चालू आहे.

मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांनी त्यांचे पत्रानुसार पार्ले कंपनीने राहाता व त्याच्या आसपासचे विभागासाठी डिलरशिप दिलेली आहे. श्री साईबाबा संस्थान, शिरडी राहाता परिसरात येत असल्याने तसेच मे.वर्धमान ट्रेडर्स, बेलापूर यांचेकडील डिलरशीप रद्द झालेली असल्याने मे.अग्रवाल एजन्सीज संस्थानसाठी पार्ले बिस्कीटे पुरवठा करण्यास इच्छुक आहे. मे.वर्धमान ट्रेडर्स यांनी दिलेल्या सूटीप्रमाणेच तेही २ टक्के सूट देण्यास तयार असून नियमानुसार सुरक्षा अनामत रक्कम भरणेसही तयार असल्याचे कळविलेले आहे. मे.वर्धमान ट्रेडर्स, बेलापूर यांनी त्यांचे दि.२१.०९.२००५ चे पत्राने राहाता तालुक्यासाठी श्री अग्रवाल एजन्सी यांची नेमणूक करण्यात आलेली असल्याने पुढील पुरवठा श्री अग्रवाल एजन्सी हे करतील तसेच पारले बिस्कीटे पुरवठयासाठी त्यांची संस्थानकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेची विनंती केलेली आहे.

मे.वर्धमान ट्रेडर्स हे गेले २ वर्षापासून पार्ले बिस्कीटांचा पुरवठा करीत आहेत. सन २००३-०४ मध्येही वरीलप्रमाणेच मे.लोंगाणी ट्रेडर्स, कोपरगांव यांचेकडील डिलरशीप रद्द होवून मे.वर्धमान ट्रेडर्स यांना देण्यात आल्याने त्यांना त्यावेळी पुरवठा आदेश देणेत आलेला होता. मे.वर्धमान ट्रेडर्स यांना सन २००५-०६ करीता पार्ले बिस्कीटे तसेच इतर मालासाठी पुरवठा आदेश देणेत आलेला असून बिस्कीटासाठी रु.४२०००/-व इतर मालासाठी रु.१५,८४९/- अशी एकूण रु.५७,८४९/- रक्कम त्यांचे सुरक्षा अनामत खाती जमा करणेत आलेली आहे. तरी मे.वर्धमान ट्रेडर्स, बेलापूर यांचेकडील

डिलरशीप मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडे वर्ग झाल्याने, वर्धमान ट्रेडर्स यांचा बिस्कीटांसाठी पुरवठा आदेश रद्द करुन अग्रवाल यांना देण्यास मान्यता असावी. नियमाप्रमाणे त्यांचेकडून सर्व कागदपत्रे व सुरक्षा अनामत रक्कम जमा करुन घेण्यात येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं ०९ एअरकंडिशनर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.६२०.** श्रीसाईबाबा संस्थानचे रुग्णालय ,साईनिवास अतिथीगृह, ध्वनीक्षेपण व लेखाशाखा तसेच मुंबई कार्यालयासाठी आवश्यक असणारे स्प्लिट व विंडो एअर कंडीशनर्स खरेदीस मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | वॉल माऊंटेंड स्प्लिट २ टा | वॉल माऊंटेंड स्प्लिट १.५ टा | **विंडो** | रक्कम | निर्णय क्र./दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | रुग्णालय | २४ | ०२ | ०२ | ९६८००० | ७१/२१.१०.२००४ |
| ०२. | साईनिवास/ध्वीक्षेपण, लेखाशाखा मनिऑर्डर | ०३ | ०१ | -- | १९०००० | २०६/०३.०५.०५ |
| ०३. | मुंबई कार्यालय | ०४ | ०२ | -- | २२०००० | १४६/१७.०४.०५ |
| | **एकूण** | **३१** | **०५** | **०२** | | |

उपरोक्त नमूद केलेल्या एसी खरेदीसाठी संबंधित कोटेशनधारकांना दि.०९.०७.२००५ चे सभेत आमंत्रित करुन सूट देणेबाबत सांगणेत आलेले होते. प्राप्त सूट पत्रे मा.स्थानिक विश्वस्त सभेत उघडणेत येऊन इलेक्ट्रीसिटी व मेंटेनन्स खर्च कमी येणेकामी खरेदीबाबत विद्युत विभाग प्रमुखांचा अभिप्राय घेणेत यावा असे सांगणेत आलेले होते .विद्युत प्रमुख यांनी व्होल्टास कंपनीचे एसीचा परफॉरमन्स इतरांपेक्षा चांगला आहे. या एसीचा मेंटेनन्स अत्यंत कमी असून बिघाडाचे प्रमाण कमी आहे व सर्व्हीस चांगली आहे असा अभिप्राय दिला, त्यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०९.२००५ निर्णय क्र.५०३ नुसार मे.व्होल्टास लिमीटेड,पुणे यांचेशी संपर्क साधून आणखी सूट मिळवून व्होल्टास कंपनीचे एसी खरेदी करणेत यावे असा निर्णय झालेला आहे.मे.व्होल्टास लि,पुणे यांनी त्यार्चे फॅक्स पत्रानुसार सुधारीत दर दिलेले असून त्यांचे अधिकृत विक्रेते मे.लकी रेफ्रिजरेशन, नासिक यांना पुरवठा आदेश देणेत यावा असे नमूद केलेले आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **पूर्वीचे दर** | सुधारीत दर + इन्स्टॉलेशन चार्जेस |
|---|---|---|---|
| ०१. | स्प्लिट एसी - २ टा व्हर्टीस मॉडेल | २९५००.०० | २६३००.००+१५००.०० |
| ०२. | स्प्लिट एसी-१.५ टा व्हर्टीस मॉडेल | २५५००.०० | २२६५०.००+१५००.०० |
| ०३. | विंडो एसी -१.५ टा व्हर्टीस मॉडेल | ----------- | १७०००.००+७५०.०० |

त्यांचे निविदेमध्ये दिलेल्या दराव्यतिरिक्त ५ मिटरपेक्षा जास्त पाईप लागल्यास रु.३५०/- प्र.मीटर व एम.एस.स्टॅण्ड आदि साहित्यासाठी वेगळा चार्ज पडेल असे नमूद केलेले आहे. तसेच मे.व्होल्टास लिमीटेड,पुणे यांनी दरपत्रकामध्ये ९० टक्के रक्कम डिलेव्हरीचे वेळी मागणी केलेली होती. मात्र दि.३०.०९.२००५ रोजी मे.व्होल्टास लिमीटेड यांचे श्री अजय देशमुख , एरिया मॅनेजर यांनी समक्ष येवून ५० टक्के डिलेव्हरीचे वेळी ,४० टक्के प्रत्यक्ष उभारणी सुरु झालेवर १५ दिवसांनी व उर्वरित १० टक्के उभारणी पूर्ण झालेनंतर मिळणेची विनंती केलेली आहे. तसे त्यांनी दि.३०.०९.२००५ रोजी पत्र दिलेले आहे.

यापूर्वी ५ एसी देणगी म्हणून आलेले असून आणखी ५ ए.सी देणगी देण्याचे २ साईभक्तांनी मान्य केलेले आहे. तरी उर्वरीत खरेदीसाठी मे.व्होल्टास लि.पुणे यांचे मागणीप्रमाणे ५० टक्के ए.सी.साईटवर आलेवर , ४० टक्के उभारणी काम सुरु झालेवर १५ दिवसांनी व उर्वरीत १० टक्के पेमेंट उभारणी पूर्ण झालेनंतर देणेस तसेच आवश्यक जादा पाईपींग , एमएस स्टॅण्ड इ.खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं १०. ड्रेनेज चेंबर्स वरील लोखंडी झाकणे बनविणेबाबत.**

**निर्णय क्र.६२१.** उपरोक्त विषयास अनुसरुन स्वच्छता विभाग प्रमुख यांनी उपरोक्त संदर्भीय डी.पी.अन्वये साईप्रसाद परिसर, कारपार्कींग परिसर व साईनिवास परिसर या ठिकाणी एकूण १० नग लोखंडी फ्रेमचे व मध्ये गज लावलेले व त्यावर लोखंडी पत्रा बसविलेली झाकणे बनवून व बसवून मिळणेसाठी मागणी केली आहे. उपरोक्तप्रमाणे चेंबर्सवरती लोखंडी झाकणे तयार करण्यासाठी खालील प्रमाणे मटेरिअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३४,७२०.०० चे खर्चास

मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | तपशील /साईज | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम. एस. ॲंगल<br>साईज - ५० X ५० X ५ एम.एम | ०२३० किलो | रु.०२८.००<br>प्रती किलो | रु.०६,४४०.०० |
| ०२) | एम.एस.प्लेट.( चेकर प्लेट )<br>८ फूट X ४ फूट X ८ एम.एम. | १०१० किलो | रु.०२८.००<br>प्रती किलो | रु.२८,२८०.०० |
| | | | एकूण रक्कम | रु.३४,७२०.०० |

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं ११. आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ, नांदूरी दुमला, ता.संगमनेर संचलित, साई सेवा निवासी मतिमंद मुला-मुलींची शाळा, शिर्डी यांचे विद्यार्थ्यांना मोफत भोजन देणेबाबत.**

**निर्णय क्र.६२२.** आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ, नांदुरी दुमाला ता. संगमनेर या संस्थेने शिरडी येथे साई सेवा निवासी मतिमंद मुला-मुलींची शाळा सुरु केलेली आहे. सदर शाळा कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर चालू केलेली आहे. संस्था नवीन असल्याने आर्थिक अडचणीत असल्याचे नमूद केलेले आहे. या संस्थेच्या शाळेत सध्या २५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.संस्थेला शासकिय अनुदान मिळेपर्यंत २५ मुला-मुलींना संस्थानकडून सकाळ / सायंकाळ (दोन वेळेस) मोफत भोजन मिळावे अशी संस्था चालकांनी केलेली विनंती मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग/प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं १२. मे.साई गोपी असोसिएटस व मे.साई गोपी रिसोर्टस प्रा.लि.,यांची जमीन गट नं.१०८/१/१ ते १०८/१/४ क्षेत्र ३-७८ आर १७ चौ.मी.भू-संपादनाने घेणे व आस्थापना चार्जेस देणेबाबत.**

**निर्णय क्र.६२३.** मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे मे.साई गोपी असोसिएटस व मे. साई गोपी रिसोर्टस प्रा.ली यांची खाली नमूद केलेली जमीन शैक्षणीक उपक्रम राबविणे व शैक्षणीक विकासात्मक योजनेसाठी भू-संपादन करुन मिळावी म्हणून मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे इकडील पत्र क्रमांक एसएसएस वशी-२/११६६/९९ दिनांक २९/१२/१९९९ ने प्रस्ताव पाठविलेला होता.

| अ.क्र. | सर्व्हे नं. | क्षेत्र हेक्टर आर. चौ.मी. |
|---|---|---|
| १) | १०८/१/१ | ००-२४-८५ |
| २) | १०८/१/२ | ००-५५-३२ |
| ३) | १०८/१/३ | ०१-१४-०० |
| ४) | १०८/१/४ | ०१-१४-०० |
| | **एकूण** | **०३-७८-१७** |

मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक भूस / कार्या-१६/अ/५६/२००० दिनांक ८/२/२००० अन्वये भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ५२अ प्रमाणे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे सदरचे प्रकरण सोपविलेले आहे.

सदर प्रकरणा मध्ये भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ६ ची अधिसूचना दिनांक १७/४/२००३ रोजी प्रसिध्द झालेली आहे. भू-संपादन कायदा कलम ९(१)(२) व कलम ९(३)(४) ची नोटीस दिनांक ७/५/२००३ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक १२-१३/७/२००३ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रमांक २८८ खालील प्रमाणे झालेला आहे.

"...प्रकरण ०५ स.नं. १०८/१/१ ते १०८/१/४ क्षेत्र हे. ३-७८ आर १७ चौ.मी. शैक्षणीक उपक्रमासाठी संपादित करावयाची जमीनीची किंमत ८,५९,२०,२२४/- एवढी फार मोठी होत असून त्यामध्ये प्रत्यक्ष निवाड्याचे वेळी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर भू-संपादनाचे प्रकरण सोडून देऊन ते रद्द करण्यात यावे असे ठरले..."

सदर ठरावा प्रमाणे सदरचा भू-संपादनाचा प्रस्ताव मागे घेण्यात येत असून तो रद्द करण्यात यावा असे मा. जिल्हाधिकारी, अ.नगर यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस वशी-०२ / ७१७२/२००३ दि. २७/०८/२००३ ने कळविलेले आहे.

भू-संपादनाचा प्रस्ताव दिल्या नंतर भू-संपादन मंडळाने सदरचा प्रस्ताव रद्द केला किंवा मागे घेतला तरी देखील शासन, महसूल व वन विभाग, ठराव क्रमांक एल.क्यु.एन.४३७-अ-२ दि.१३/१२/१९७५ अन्वये जर भू-संपादनाच्या प्रकरणा मध्ये भू-संपादन कायदा कलम ६ ची नोटीफिकेशन झाली असेल तर निवाड्याच्या प्रस्तावीत रकमेच्या ३ टक्के आस्थापना चार्जेस शासनाला द्यावे लागतात.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग , श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावी/ एल.ए.क्यु./ एस.आर/१४/२००० दि. १७/१२/२००३ अन्वये नुकसान भरपाईची रक्कम ८,७०,८३,२६३/- ( आठ कोटी सत्तर लाख त्र्याऐंशी हजार दोनशे त्रेसष्ठ मात्र ) होत असून त्याच्या ३ टक्के आस्थापना चार्जेसची रक्कम २६,१२,४९८/- ( सव्वीस लाख बारा हजार चारशे अठ्ठ्यान्नव मात्र) होत आहे. असे कळविले आहे. तसेच सदरची रक्कम शासनाकडे भरावी असेही कळविले आहे.

मा. जिल्हाधीकारी सो.,अहमदनगर यांना अर्धशासकीय पत्र क्रमांक एस.एस.एस. वशी-०२/१९८२/२००५ दि. २३/०२/२००५ अन्वये सदरची रक्कम माफ करण्यात यावी म्हणून विनंती केली होती. परंतू त्यांनी त्यापूर्वीच त्यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक मह/कार्या /२०/४६५/२००४ दिनांक ०५/२/२००५ अन्वये सदरची रक्कम भरावी असे कळविलेले आहे. सदर प्रकरणी भू-संपादन प्रकरण मागे घेतल्याने आता आस्थापना चार्जेस रक्कम रु.२६,१२,४९८/-(सव्वीस लाख बारा हजार चारशे अठ्ठ्यान्नव मात्र ) भरावे लागणार आहेत.

संस्थानचे सध्या जमीन विकत घेण्याचे धोरण आहे. उपरोक्त जागा ही साईबाबा संस्थानच्या शैक्षणीक संकुला शेजारी आहे. त्यामुळे सदरची जमीन भू-संपादनाने घेतली तर पुढे शैक्षणीक विकासासाठी तिचा उपयोग होणार आहे.

एकदा भू-संपादनाचा प्रस्ताव मागे घेतला व परत सुरु करावयाचा असल्यास पहिल्या प्रकरणा मध्ये भरावी लागणारी आस्थापना चार्जेस ही रक्कम परत भरावी लागते किंवा कसे याबाबद जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेशी संपर्क साधून माहिती घेण्यात येत आहे.

मा.उप विभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावी-२/७३०/२००५ दि.१/०८/२००५ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे की मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील दिनांक १६/७/२००५ चे पत्रानुसार गट नं. १०८ मधील संपादना खालील जमीनीचा ताबा घेण्याच्या कार्यवाहीस शासनाने स्थगिती दिलेली आहे.

याबाबत खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता

**०१)** स.नं. १०८/१/१, १०८/१/२, १०८/१/३, १०८/१/४ क्षेत्र हे.३-७८ आर १७ चौ.मी. जमीन भू-संपादनाने घेणे बाबदची कार्यवाही रद्द करणे बाबद.मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि. १२-१३/७/२००५ रोजी झालेल्या निर्णय क्रमांक २८८ (५) रद्द करुन त्या ऐवजी प्रस्तूत जमीन भू-संपादनाने घेणे अथवा न घेणे.

**०२)** जमीन भू-संपादनाने घेणे झाल्यास पुर्वीच्या प्रकरणातील आस्थापना चार्जेसची रक्कम रु. २६,१२,४९८/- न देता त्याऐवजी फेर भू-संपादन प्रकरणा प्रमाणे आस्थापना चार्जेसची रक्कम घेणे बाबद मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेशी पत्र व्यवहार करणे.

**०३)** जमीन भू-संपादनाने घेणे न झालेस /न ठरल्यास आस्थापना चार्जेस बाबतीत तगादे चालू असलेल्या भू-संपादन प्रकरणातील आस्थापना चार्जेसची रक्कम माफ करणेबाबत मा.शासन/ मा.जिल्हाधिकारी यांचेकडे विनंती करणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जमीन भू-संपादनाचा ३ टक्के आस्थापना चार्ज माफ करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना पुनःश्च विनंती करावी,असें ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं १३.** **श्रीसाई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि.,शिर्डी यांचेमार्फत चालविण्यात येणारे स्वागत कक्ष येथील क्लोकरुमला मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.६२४.** नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूस असलेले संस्थान मालकीचे सर्व्हे नं ११४ मधील पोलीस स्टेशनचे वापरांतील इमारतीचे नव्याने नुतनीकरण करणेत आले असून जुने पोलीस स्टेशन ऐवजी दिनांक २१/१०/२००४ पासून तिथे साईभक्तांचे सोयीसाठी स्वागतकक्ष सुरु करणेत आले आहे.पोलीस स्टेशनची व्यवस्था आता बदल करून भक्तांचे सुरक्षिततेचे दृष्टीने पूर्वीचे जागेऐवजी जवळच पत्राशेड मध्ये करणेत आलेली आहे.

श्री साईबाबांचे दर्शन घेवून लगेच पुढील प्रवास ज्या साईभक्तांना करावयाचा असतो अशा साईभक्तांचे सामान ठेवणेची व्यवस्था नुतनीकरण केलेल्या उपरोक्त स्वागत कक्षाचे जागेत करणेत आलेली असून सदरचा व्यवसाय चालविणेस श्री साई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि. शिरडी

यांना दिनांक २२/१०/२००४ रोजी पासून पुढील ११ महिने कालावधी करिता मासिक परवाना फी रक्कम रुपये ३००/- प्रति महा व मिटर रिडींगप्रमाणे लाईटबील वेगळे आकारुन चालविणेस इतर व्यवसायांप्रमाणेच लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर परवानगी देणेत आलेली आहे.

आता सदरचे व्यवसाय/गाळयांची मूदत दिनांक २१/०९/२००५ रोजी संपत असल्याने पुढील मुदतीत चालविणे साठी श्री साई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि. शिरडी यांनी दिनांक ०१/०९/२००५ रोजीचे पत्राने मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे. त्यात त्यांनी "श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को -ऑप सोसायटी लि. शिरडी ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्थान कर्मचाऱ्यांचीच संस्था आहे. संस्था आपले संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी अनेक व्यवसाय चालवित आहे. संस्था एस.टी.स्टॅण्ड समोरील आपले संस्थानचे स्वागतकक्ष इमारतीत (माहिती व सुविधा केंद्र) श्री साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी क्लोकरूम हा व्यवसाय चालवित आहे. सदर व्यवसायाची ११ महिन्यांची मूदत दिनांक २१/०९/२००५ रोजी पूर्ण होत आहे तरी श्री साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पाच वर्षाकरिता चालविण्यास मूदत वाढ मिळावी अशी विनंती केली आहे "

यापूर्वी पतपेढीकडून अशा सुविधा भक्तांना पुरविल्या जातात ही बाब विचारात घेऊन दिनांक दिनांक २२/०९/२००५ पासून पुढील ११ महिने मुदतीचे कालावधी करिता मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करून व मीटर रिडींगप्रमाणे लाईटबील वेगळे आकारुन सदरचे क्लोकरुम चालविणेस मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं १४. प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, लोणी यांचे जागा/गाळा मिळणेबाबत पत्र**

**निर्णय क्र.६२५.** प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित लोणी यांनी दिनांक २३.०९.२००५ व २४/०९/२००५ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

१) भोजनगृह शेजारी संस्थेस बेदाणा विक्रीसाठी जागा मिळणेबाबत.

२) ५०० रुम मध्ये संस्थेस बेदाणा विक्रीसाठी गाळा मिळणेबाबत विनंती अर्ज केलेले आहेत.

प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक संस्था,लोणी शेतक-यांचे द्राक्षे खरेदी करून बेदाणा विक्री करते संस्था जागा/गाळा बाबत भाडे देणेस तयार असल्याचे अर्जात नमूद केले आहे.

तरी उपरोक्त ठिकाणी गाळयासाठी/जागेसाठी प्रत्येकी रुपये १०,०००/- डिपॉझीट व दरमहा प्रत्येकी गाळा रुपये ८००/- व जागेसाठी रुपये ८००/- मात्र लायसेन्स फी आकारुन १२ महिने मुदतीसाठी गाळा व जागा लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देता येईल.

संस्थानचे ५०० रुम भक्तनिवास इमारत व प्रसादालयाचे परिसरांत संस्थानने सोबतचे तक्त्याप्रमाणे लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर भक्तांचे सुविधांसाठी काही संस्थेस /व्यक्तीस परवानगी दिलेली आहे. सदर माहितीचा विचार करता १२ महिने मुदतीसाठी गाळा/जागेसाठी प्रत्येकी रुपये १०,०००/- डिपॉझीट व दरमहा प्रत्येकी गाळा रुपये ८००/- व जागेसाठी रुपये ८००/- मात्र लायसेन्स फी आकारुन १२ महिने मुदतीसाठी गाळा व जागा लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं १५. भारतातील इतर ठिकाणी बनविणेत येणारे श्री साईबाबांचे समाधीबाबत**

**निर्णय क्र.६२६.** श्री. रमेश खन्ना,मुख्य संपादक श्री साईनाथ टाईम्स, नवी दिल्ली यांनी दिनांक १७/०८/२००५ रोजीचे पत्र इकडेस पाठविले आहे उत्तर भारतामध्ये बरेच लोक त्यांना स्वतः ला " दत्तअवतार " किंवा साई अवतार असल्याचा दावा करू लागले आहेत.

तथाकथित बाबामुळे साईभक्तांचे मनामध्ये काय खरे काय खोटे याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. समाधी मंदिरे बांधणेचे नावांवर हे लोक साईभक्तांकडून पैसे गोळा करतात असे प्रस्तुतचे पत्रात म्हटले आहे.

साई समाधी मंदिर शिरडी मध्ये असून दुसरीकडे असू नये. अन्यथा पुढील पिढीस खरी समाधी कोठे आहे शिरडी मध्ये, गझियाबाद मध्ये अथवा अलिगढ (युपी) किंवा दांडी असे पत्रात नमूद केले आहे. इतरही मंदीरे याबाबत अनुकरण करतील. व्दारकामाईचे मंदीरे या अगोदर बांधलेली आहेत असेही प्रस्तुत पत्रात नमूद केले आहे.

उपरोक्त पत्रामध्ये श्री. रमेश खन्ना यांनी उदाहरणादाखल काही व्यक्तींची/संस्थांची नांवे नमूद केली आहेत.

१) यु.पी.मध्ये सपनावतमध्ये (गाझीयाबाद) श्री.जे.पी.सोडिया सन २००२ मध्ये समाधी मंदीर बांधले. साईबाबांनी स्वप्नात येऊन त्यांना शामा म्हटलेले वर्तमानपत्रात त्यांनी प्रसिध्द केले.

२) श्री. डी.पी.अग्रवाल, अलिबाग यांनी गेल्या महिन्यात असे मंदिर बांधले.

३) मिसेस माधुरी शर्मा यांनी दांडी येथे समाधी मंदीर बांधले

४) श्री.वेद स्वरुपानंद हे स्वत:स दत्त अवतार म्हणून घेतात.

५) काही पेपर्स कोणत्याही प्रकारची खात्री न करता जाहिराती प्रसिद्ध करीत असतात.

अशा घटनेबाबत संस्थानकडून खुलासा व्हावा. असे प्रस्तुतचे भक्ताने पत्रात विनंती केलेली आहे. संस्थानने नियमितपणे याबाबत मार्गदर्शन केलेस ते त्यांचे वर्तमानपत्रात "ओम साईनाथ टाईम्स" मध्ये प्रसिध्द करू असेही त्यांनी पत्राचे शेवटी नमूद केले आहे.

साईबाबांचे समाधी मंदीराप्रमाणे मंदिराचे बांधकाम इतरत्र होणे त्याबाबत संस्थानला कायदेशीर कार्यवाही करून प्रतिबंध करणे शक्य होणार नाही. अशी वकीलाबरोबर चर्चा झाली आहे. मात्र उपरोक्त वर्तमान पत्रात व इतर वर्तमानपत्रातून -

" श्री साईबाबांचे मूळ मंदीर शिरडी, ता. राहाता, जि- अहमदनगर, महाराष्ट्र येथे आहे त्यांचा इतर मंदिरांशी कोणताही संबंध नाही. साईभक्तांची इतर संस्थानकडून कोणत्याही प्रकारची फसवणूक होऊ नये. त्यांस संस्थान जबाबदार राहणार नाही "

अशा आशयांचे प्रकरण संस्थानला प्रसिध्द करता येईल असे वकीलांनी सुचविले आहे

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता

१) संस्थानचे ॲडव्होकेटचे सल्ल्याप्रमाणे भारतांतील उपलब्ध माहितीचे साई मंदीरात वरील आशयाचे प्रकरण प्रसिध्द करणेस संबंधित मंदीरास विनंती करणे.

२) संबंधित समाधी मंदीर बांधणारे लोकांविरुध्द कार्यवाही करणेबाबत ज्या त्या राज्यातील धर्मादाय आयुक्त किंवा तत्सम खात्यांस कार्यवाही करणेस विनंती करणे.

तसेच साईबाबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी, श्री साईबाबा संस्थान शिरडी असे नामसाधर्म्य असलेल्या संस्था देखील उदयांस येऊ लागल्या आहेत. त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द होणेबाबतही त्या राज्यांतील धर्मादाय खात्यास कळविता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी वकीलाचा सल्ला घेऊन कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे ठरलें. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं १६.** **मुंबई महानगरपालिकेच्या दप्तरी असलेल्या संस्थानचे मुंबई येथील स्थावर मालमत्ता धारकाच्या नावात बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.६२७.** संस्थानची मुंबई येथे (साईनिकेतन ८०४ बी, डॉ.आंबेडकर रोड, दादर , मुंबई ४०० ०१४) ही इमारत आहे. सदरची इमारत तळमजला + तीन मजले तसेच आऊट हाऊस अशी असून प्रत्येक मजल्यावर दोन ब्लॉक व तिसऱ्या मजल्यावर कार्यालय आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी साठी महाराष्ट्र अधिनियम १४/२००४ हा लागू करण्यात आला असून सदरचा न्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नावाने अस्तित्वात आलेला आहे.

संस्थानचे मालकीचे साईनिकेतन,८०४ बी या मालमत्ता धारकाचे नांव श्री नागेश आत्माराम सावंत यांचेऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असे करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका मालमत्ता कार्यालय, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- कार्यालय अधिक्षक, मुंबई कार्यालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं १७** **श्रीराम आईस्क्रिम व दूग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी बुथ (स्टॉल) ठेवण्यासाठी जागा मिळणेबाबत श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव.संघ लि.,बाभळेश्वर ता.राहाता यांचे पत्र.**

**निर्णय क्र.६२८.** श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संध लि.,बाभळेश्वर यांना संस्थानचे नवीन भक्तनिवास इमारत परिसरातील १ गाळा लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर डिपॉझीट रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार ) व दरमहा रुपये ८००/- (अक्षरी रुपये आठशे ) मासिक परवाना लायसेन्सी फी तसेच मिटर रिडिंगप्रमाणे विद्युत बील वेगळे याप्रमाणे एका स्टॉल साठी आकारून दिनांक १०/०९/२००५ रोजी पासून पुढील ११ माहिने कालावधी लिव्ह लायसेन्स तत्वावर - व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार जा.नं. एसएसएस/वशी-०२/९८९२/२००५ दिनांक ०९/०९/२००५ रोजीचे आदेशाने चालविणेकामी देण्यात आलेला आहे.

उपरोक्त विषयाचे व संदर्भात श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर यांचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यात त्यांनी " संघास दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी भक्तनिवास इमारत शिर्डी येथे गाळा उपलब्ध करून दिला त्याबाबत आभारी असल्याचे कळविले आहे. संघाने याच पत्रात श्रीराम आईस्क्रिम व दूग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी १०x१० या साईजचे आईस्क्रिम बुथ तयार केले असून सदर बुथ मध्ये दूग्धजन्य पदार्थ विक्री करणे जास्त सोईस्कर आहे. गाळयामध्ये वीजेचा खर्च, व्यवस्थापन खर्च याचा विचार करता विक्री कमी होईल. परिणामी आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे असे पत्रात म्हटले असून संस्थानचे २०० रुमचे कार्यालयाचे आवारात व प्रसादालय या २ (दोन) ठिकाणी १० x १० ची जागा बुथ स्टॉल ठेवणेसाठी उपलब्ध करून दिल्यास जास्त प्रमाणात विक्री होऊन आर्थिक फायदा होईल. त्याकरिता दोन ठिकाणी दुग्धजन्य पदार्थ विक्री करिता बुथ (स्टॉल) ठेवणेसाठी जागा उपलब्ध करून दयावी अशी विनंती केलेली आहे.

श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्यावसायिक संघ यांची २ ठिकाणी जागा मिळणेबाबत मागणी आहे मात्र संस्थान जागेतील पूर्वी चालू असलेल्या इतर व्यवसायांचाही विचार करावा लागेल. सदर परिस्थितीचा विचार करून २०० रुम परिसर किंवा प्रसादालय परिसर या ठिकाणापैकी एका परिसरात संस्थानचे सोयीने १० x १० ची जागा बुथ स्टॉलसाठी प्रस्तुत दूध संघास त्यांचे विनंतीस अनुसरून उपलब्ध करुन देता येईल. व लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर १२ महिन्यांसाठी डिपॉझीट रुपये १०,०००/- मासिक परवाना फी ८००/-ठरवून देऊन देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं १८.** **श्रीसाईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका-२००६ छपाईबाबत.**

**निर्णय क्र.६२९.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४११नुसार श्री साईबाबा दैनंदिनी २००६ ची ५०,००० नग व श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ चे (कॅलेंडर ६ सीट तारखेसह प्रत्येक सीटवर दोन महिने) ७५,००० नग व दिनदर्शिका २००६ (कॅलेंडर) सिंगल सीट बिगर तारखेचे २०,००० नग छपाई करणेस व त्यासाठी एकूण रूपये ३३,५०,०००/- मात्र अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील निर्णयानुसार दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी दाखल झालेली कोटेशस दि.१८.०९.२००५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात येऊन सभेतील निर्णय क्र.५०८ नुसार श्री साईबाबा दैनंदिनी २००६ व श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ (सिंगल सीट) करीता मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे व मे.मॅग्ना ग्रॅाफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांचे दर मान्य करण्यात येऊन, मे.मॅग्ना ग्रॅाफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांना एकूण पुरवठ्याच्या ६०% व मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना ४०% पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. तत्पूर्वी व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या ६०% व ४०% या प्रमाणात छपाई करून देणेबाबत त्यांची लेखी संमती घेऊन नंतरच छपाई आदेश देण्यात यावेत असा निर्णय पारित झालेला आहे.

सन २००५ मध्ये ८५,००० दैनंदिनी छपाई करण्यात आल्या होत्या. दैनंदिनीसाठी भक्तांची मागणी चांगली असल्याने तसेच या वर्षाची दैनंदिनी जास्त आकर्षक, सुशोभित काढण्यात येणार असल्याने भक्तांकडून मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेता श्री.साईबाबा दैनंदिनी -२००६ ची छपाई संख्या ५०,००० नगा ऐवजी ९०,००० नगांपर्यत छपाई करून घेण्यास हरकत नाही. उपरोक्त श्री साईबाबा दैनंदिनी -२००६ चे ९०,००० नग छपाई करून घेणेस प्रती नगास छपाई मान्य दर रू.४१/- प्रमाणे रू. ३६,९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च दैनंदिनी विक्रीतून वसूल होऊ शकेल.

तसेच श्री साईबाबा दैनंदिनी २००६ चा छपाई प्रती नग दर रू.४१/- असा आहे. तिची संस्थानद्वारा प्रती नगास विक्रीची किमंत रू.५०/- ठेवणेस व श्री साईबाबा दिनदर्शिका -२००६ (सिक्स शिट) साठी छपाई प्रती नग दर रू.८.५० पैसे असा आहे. त्याचा संस्थानद्वारा प्रती नगास विक्रीची किमंत रू.१०/- तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका (सिंगल सिट ) साठी छपाई प्रती नग दर रू.३/- असा आहे. त्याचा संस्थानद्वारा प्रती नगास विक्रीची किंमत रू.५/- मात्र ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा दैनंदिनी-२००६ ची छपाई संख्या ५० हजाराऐवजी ९० हजार छपाई रुपये ४१/- प्रती नगा प्रमाणे एकूण रक्कम रुपये ३६,९०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहू काम मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावे. दिनदर्शिका-२००६ सिंगल सिटर व सिक्स सिटर्सचे अनुक्रमे २० हजार नग व ७५ हजार नग छपाईचे सर्व काम मे.मॅग्ना ग्राफिक्स(इंडिया) लि.मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावे.

तसेच श्रीसाईबाबा दैनंदिनी-२००६ ची विक्री किंमत रुपये ५०/- व श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ (सिक्स सिटर) रुपये १०/- तसेच श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ (सिंगल सिट) रुपये ५/- या दराने साईभक्तांना विक्री करण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं १९. मा.सदस्यांना उत्सवाचे फोटो देणेबाबत.**

**निर्णय क्र.६३०.** श्री साईबाबांचे दर्शनासाठी अनेक महत्वाच्या, अतिमहत्वाच्या व्यक्ती येत असतात. त्यांचे भेटीच्या वेळी मा.सदस्य उपस्थित रहातात. तसेच संस्थान आयोजित तीनही उत्सवात व विविध विभागांतर्गत आयोजित कार्यक्रमांनाही मा.सदस्य उपस्थित राहतात.

व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ०१-०३/०७/२००४ चे सभेतील निर्णय क्र. ३५२ अन्वये मागील पाच/दहा वर्षाचे कालावधीतील उत्सव/इतर महत्वाचे समारंभ या प्रसंगी उपस्थित असलेल्या संबंधितांचे फोटोंचे अल्बम, तसेच सदर कालावधीतील प्रत्येक उत्सवाचे शुटींगच्या डिव्हीडीज प्रत्येक विश्वस्तास स्मृती म्हणून विनामुल्य देण्यात याव्यात असा निर्णय झालेला आहे.

तरी महत्वाच्या, अतिमहत्वाच्या व्यक्तींचे शिरडी भेटीचे वेळी संस्थानचे तीनही उत्सवांचे वेळी व संस्थानचे विविध विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांचे वेळी जे जे मा.सदस्य उपस्थित रहातील त्यांना सदरच्या कार्यक्रमांचे फोटोग्राफ्स त्यांनी मागणी केली तर ते त्यांना विनामुल्य तयार करुन देण्यात यावेत. या फोटोग्राफ्स् बरोबर सी.डी.सुध्दा देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं २०. श्रीतुळजा भवानी मंदीर संस्थान, तुळजापुर यांना विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.६३१.** सदरहू विषय मागे घेण्यात आला.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं २१. महाविद्यालयाचे बांधकामासाठी व श्रीसाईबाबा महाविद्यालय असे नांव देणेस आर्थिक मदत मिळणेबाबत, प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव, ता.खटाव, जिल्हा सातारा यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.६३२.** सदरहू विषय मागे घेण्यात आला.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं २२. पुणे येथील न्युरोसायन्सेस ट्रस्ट ॲण्ड रिसर्च सोसायटीचे समवेदना या उपक्रमाला संस्थानमार्फत जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य देणेबाबत.**

**निर्णय क्र.६३३.** सदरहू विषय मागे घेण्यात आला.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं २३. श्री सत्यवान भैरु शेजवळ, वर्ग-४ कर्मचारी यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबत**

**निर्णय क्र.६३४.** श्री सत्यवान भैरु शेजवळ यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/५४६/२००३ दि.०३/०३/२००३ अन्वये दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी प्रतिमहा रु.२०००/-एकत्रीत नियत वेतनावर वर्ग-४ चे कर्मचारी या पदावर तात्पुरती नेमणूक करण्यात आली होती त्यानुसार ते दि.०३/०३/२००३ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

दि.०२/०३/२००५ अखेर त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात आल्यानंतर यांना वर्ग-४ या पदावर संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेकामी श्री शेजवळ यांचे काम, वर्तणूक,व प्रामाणिकपणा तसेच त्यांचे चालू अथवा प्रस्तावित असलेल्या प्रकरणांबाबत संबंधीत विभागप्रमुख यांचेकडून गोपनीय अभिप्राय मागविण्यात आले होते.त्यानुसार अधिक्षक,व प्रशासकीय अधिकारी,प्रसादालय यांचे प्रतिकुल अभिप्राय विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१३१ नुसार श्री शेजवळ वर्ग-४ चे कर्मचारी यांना सध्या देण्यात येणारे दरमहा रु.२५००/- वर त्यांची सेवा पुढे चालू ठेऊन त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी सहा महिन्यांनी वाढविण्यात यावा असा निर्णय झाला आहे.त्यानुसार त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी दि.०३/०३/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आला आहे.वाढविण्यात आलेल्या परिवीक्षाधीन कालावधीची मुदत दि.०२/०९/२००५ अखेर संपुष्टात आलेली आहे.

श्री शेजवळ यांचे विरुध्द चालू असलेली खातेचौकशी संपलेली असून,त्यांचेवरील आरोप अंशतः शाबीत झाल्याचा अहवाल चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला आहे." वाढीव परिवीक्षाधीन कालावधीमध्ये श्री शेजवळ यांचेकडून कोणतेही गैरवर्तन घडलेले नाही.त्यांचे वर्तणूकीत सुधारणा झालेली असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांना वेतनश्रेणी देऊन वर्ग-४ चे पदावर सेवेत कायम करण्यास हरकत नाही." असे अभिप्राय अधिक्षक प्रसादालय यांनी दिलेले आहे.

अधिक्षक, प्रसादालय विभाग यांचे श्री शेजवळ यांचेबाबतचे वाढीव परिवीक्षाधीन कालावधीमधील काम,वर्तणूकीबाबतचे अनुकूल अभिप्राय व कामगार अधिकारी यांचे खातेचौकशीबाबतचे अभिप्राय विचारात घेऊन श्री शेजवळ यांना वर्ग-४ चे पदांची रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० ही विहीत वेतनश्रेणी देऊन, त्यांना संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं २४.** **पुणे विद्यापीठात श्रीसाईबाबा अध्यासनाची स्थापना करणे.**

**निर्णय क्र.६३५.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०८.२००५ चे सभेत निर्णय क्र.४६८ अन्वये पुणे विद्यापीठात श्री साई अध्यासन सुरु करणेत यावे असे ठरलेले आहे.

पुणे विद्यापीठात सध्या संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संत श्री नामेदव महाराज यांचे अध्यासन आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज व श्री नामदेव महाराज यांचे अध्यासनाप्रमाणेच श्री साईबाबा अध्यासन (Shri Saibaba Chair) स्थापन व्हावे या करीता संस्थांनचे मा.अध्यक्षांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ.अशोक कोळस्कर यांची दिनांक २७ सप्टेबर,२००५ रोजी समक्ष भेट घेऊन चर्चा केली. यावेळी त्यांनी पुणे विद्यापीठात श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेसंबधीचा प्रस्ताव मा.कुलगुरुंना सादर केला व अध्यासनासंबंधी संस्थानचा दृष्टीकोन विशद केला.

पुणे विद्यापीठात श्री साईबाबा अध्यासन (Shri Saibaba Chair) सुरु केल्यामूळे श्री साईबाबांचे जीवन, चरित्र आणि शिकवणूकीचा एखादी व्यक्ती त्या ठिकाणी अभ्यास करु शकेल, पी.एच.डी करु शकेल तसेच शोधनिबंध लिहू शकेल. यासाठी श्री साईबाबांचे जीवन, चरित्र आणि शिकवणूकीच्या संदर्भात सर्व साहित्य वाङ्मय, फोटो त्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री साईबाबा संस्थान प्रकाशित वाङ्मयाचे भारतीय आणि परकीय भाषांत भाषांतराची अडचण यावेळी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.कुलगुरुंच्या निदर्शनास आणली असता सर्व आधुनिक भारतीय भाषा (Modern Indian Languages) आणि काही परकीय भाषा (Modern Foreign Languages) मध्ये श्री साईबाबा संस्थान प्रकाशित वाङ्मयाचे भाषांतर, पुणे विद्यापीठातील जाणकार भाषांतर तज्ञांच्या देखरेखीखाली बिनचूक करता येईल असे कुलगुरुंनी सांगितले.

संस्थानच्या वेबसाईटवर सध्या मराठी व इंग्रजी भाषेत संस्थानची माहिती उपलब्ध आहे. श्री साईबाबा संस्थान प्रकाशित वाङमय आणि या वाङ्मयाचे सर्व आधुनिक भारतीय भाषा (Modern Indian Languages) आणि काही परकीय भाषा (Modern Foreign Languages) यामध्ये भाषांतर केल्यानंतरचे भाषातंरीत वाङ्मय संस्थानच्या बेवसाईटवर उपलब्ध करुन देता येईल. यासाठी पुणे विद्यापीठातील तज्ञांचे सहकार्य मिळेल असे डॉ.कोळस्कर यांनी सांगितले. या भाषांतरामुळे जगातील सर्व साईभक्तांना आपापल्या मातृभाषेत श्रीसाईबाबांच्या विषयीचे वाङ्मय मिळेल आणि श्रीसाईबाबांचे कार्य, शिकवण संपूर्ण जगातील जास्तीत जास्त लोकांना उपलब्ध होईल.

श्रीसाईबाबांचे जीवन चरित्र, सर्वधर्मसमभाव, शिकवण, समानता व बंधुभाव या मूल्यांवर आधारित शिक्षणशास्त्र (Education), तत्वज्ञान (Philosophy) आणि सामाजिक शास्त्रे (Social Sciences) या विषयातील कुणीही व्यक्ती संशोधन/पी.एच.डी.करु शकेल. यासाठी पुणे विद्यापीठातील संबंधित विषयाचे मार्गदर्शक (Guide) संशोधकांना उपलब्ध करुन देण्यात येतील असे मा.डॉ.कोळस्कर यांनी सांगितले. तसेच श्रीसाईबाबा अध्यासनाचे काम करण्यासाठी एखादी जाणकार आणि साईभक्त असलेली विद्यापीठातील व्यक्ती समन्वयक (Co-Ordinator) म्हणून उपलब्ध करुन दिली जाईल असे सांगितले.

श्रीसाईबाबांचे जीवन चरित्र तसेच सर्वधर्मसमभाव, शिकवण, समानता व बंधुभाव या मूल्यांवर आधारित इ.१ ली ते इ.१० वी च्या पाठ्यपुस्तकांत एक धडा असावा असा विचार पुढे आला. या संदर्भात इ.१ ली ते इ.८ वी करिता महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे (बालभारती) आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडे विद्यापीठाचे मार्फत विषय माडण्यात येईल असे मा.डॉ.कोळस्कर यांनी सांगितले.

गुरुवार दिनांक २९.९.२००५ रोजी मा.डॉ.कोळस्कर प्रवरानगर येथे दौऱ्यावर आले होते. मा.अध्यक्ष महोदयांच्या विनंतीवरुन या दिवशी ते शिर्डी येथे मुक्कामी आले. यावेळी त्यांनी पुणे विद्यापीठात श्रीसाईबाबा अध्यासन सुरु करणेसंबंधीचा संस्थानचा प्रस्ताव राबविण्यासंबंधी कार्यवाही करण्यासाठी खालील प्रमाणे दोन प्रकारे अनुदान रुपाने निधीची तरतूद करता येईल असे सुचविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**(अ)** संस्थानकडून एक रकमी एकदाच एक कोटी रुपये विद्यापीठाला अनुदान देऊन त्यावरील व्याजावर श्रीसाईबाबा अध्यासनाचे कार्य चालविता येईल. (या पद्धतीने मौलिक हक्क अध्यासन

{Intellectual Property Rights Chair} पुणे विद्यापीठात स्थापन करण्यात आलेली आहे. यासाठी पुणे विद्यापीठाला एकरकमी दहा लक्ष रुपये Council of Scientific and Industrial Research यांनी दिलेले आहेत.)

**किंवा**

**(ब)** श्रीसाईबाबा अध्यासनाचे कार्य सुरु करण्यासाठी सुरुवातीला पहिल्यावर्षी १० लक्ष रुपये अनुदान रुपाने संस्थानकडून पुणे विद्यापीठाला देण्यात यावे आणि पुढील पाच वर्षे प्रतिवर्षी १० लक्ष रुपये प्रमाणे अनुदान देण्यात यावे. असे एकूण ६० लक्ष रुपये याकामासाठी उपलब्ध होतील. या रकमेवरील व्याज आणि सुरुवातीच्या अनुदानापैकी काही रक्कम श्रीसाईबाबा अध्यासनाचे कार्यासाठी वापरण्यात येईल. नंतर फक्त व्याजावर श्रीसाईबाबा अध्यासनाचे कार्य चालेल.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त पैकी " ब" पर्याय स्वीकारणेत यावा असे ठरले.

(कार्यवाही- प्रकाशने विभागप्रमुख/जनसंपर्क अधिकारी/प्राचार्या, कन्या विद्या मंदिर )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं २५. इनफोकस स्क्रीन प्ले बाबत.**

**निर्णय क्र.६३६.** ओनिडा कंपनीच्या ॲडोनिस या नवीन उपनामाखाली इनफोकस ब्रॅन्डचे स्क्रीन प्लेअर विविध आकाराच्या डिस्प्ले स्क्रीन द्वारे लाईव्ह प्रक्षेपण मोठया स्वरुपात दिसू शकते. हे इनफोकस ब्रॅन्डचे स्क्रीन अत्याधुनिक तंत्रज्ञानावर तयार केलेले असून यामुळे या स्क्रीनवरील चित्र हे कमीत कमी २ फूटापासून सव्वाआठ फूटापर्यंत स्क्रीनवर मोठे दिसते. यासाठी लागणारे स्क्रीन प्लेअरही ओनिडा कंपनी इनफोकस ब्रॅन्डच्या नावाने पुरवतात. या स्क्रीन प्लेअरमुळे समोर प्रक्षेपित होणारे चित्र हे अत्यंत सुस्पष्ट दिसते. या स्क्रीनवर श्री साई भक्तांना सकाळची काकड आरती व रात्रीची शेजारती तसेच मंदिरात होणारे उत्सवातील कार्यक्रम दाखवता येवू शकतील. हे स्क्रीन अत्यंत कमी वजनाचे असून ऑप्टीकल मटेरियल पासून बनवलेले असतात.

मुंबई येथील ओनिडा कंपनीचे प्रतिनिधी श्री प्रशांत कवळे व श्री. व्ही.जी.कल्याण हे दि. १० सप्टेंबर, २००५ रोजी इनफोकस ब्रॅन्डचे स्क्रीन प्लेअर व स्क्रीन घेवून आले होते. त्यांनी त्या दिवशी समाधी मंदिराजवळील स्टेडियमच्या स्टेजवर स्क्रीन लावून स्क्रीन प्लेअरच्या साहाय्याने रात्रीच्या शेजारतीचे प्रात्यक्षिक दाखवले आहे. सदर स्क्रीनची प्लेअरसह अंदाजे किंमत रू. १५ लाख इतकी सांगितलेली आहे.

आजचे सभेत ओनिडा कंपनीचे प्रतिनिधी श्री प्रशांत कवळे व श्री व्ही.जी कल्याण हे उपस्थित होते. त्यांनी चित्रफितीव्दारे इनफोकस स्क्रीन प्लेअर माहिती सभेस करुन दिली. तसेच सभेने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी यथावकाश निर्णय घेण्यात यावा असे ठरलें.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं २६. एल.ई.डी.डिस्प्लेबाबत माहिती घेणे.**

**निर्णय क्र.६३७.** हैद्राबाद येथील मे. एम.आय.सी. इलेक्ट्रॅानिक्स् लि. यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाधारीत एलईडी डिस्प्ले २००२ पूर्वीपासून बाजारात आणलेले असून त्यांनी यापूर्वी माहितीपत्रके व सीडीज् पाठविलेल्या आहेत. एलईडी डिस्प्लेमधील अत्याधुनिक तंत्राच्या वापरामुळे यात प्रक्षेपण अत्यंत सुस्पष्ट दिसते. या टि.व्ही. मध्ये डिस्प्ले सर्व्हर, डिस्प्ले कंट्रोलर व एलईडी डिस्प्ले टि.व्ही. स्क्रीन हे मुख्य भाग आहेत. डिस्प्ले सर्व्हर हे फायबर ऑप्टीक अथवा सामान्य केबलद्वारे डिस्प्ले कंट्रोलरला जोडलेली असतात. एलईडी डिस्प्ले टि.व्ही. हे विविध आकारात उपलब्ध आहेत. सध्या बाजारात ७२ इंचापर्यंतच्या आकाराचे टि.व्ही. उपलब्ध आहे.

एलईडी डिस्प्ले संस्थानचे परिसरात लावल्यास आपणास मंदिरातील थेट कार्यक्रम व आरती तसेच पालखी सोहळा प्रक्षेपित करता येईल, यामुळे साईभक्तांच्या मंदिर परिसरातील गर्दीचे योग्य व्यवस्थापन (Crowd Management ) करता येईल, व यामुळे निश्चितच साईभक्तांची सोय होईल. तसेच या डिस्प्लेद्वारे श्री साईबाबांचे चित्रपट व इतर कार्यक्रम दाखवता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत मे. एम.आय.सी. इलेक्ट्रॅानिक्स् लि. कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. विजयकुमार सपाटी हे उपस्थित होते. त्यांनी चित्रफितीव्दारे एल.ई.डी.डिस्प्लेबाबत माहिती सभेस करुन दिली. तसेच सभेने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी यथावकाश निर्णय घेण्यात यावा असे ठरलें.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७. दलित बांधवांना दीक्षा भूमी नागपूर येथे शिधा देणेबाबत.**

**निर्णय क्र.६३८.** श्री योगीराज खोंडे, अध्यक्ष राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे दिनांक ०१.१०.२००५ चे पत्रान्वये राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने नागपूर येथे दीक्षा भूमीवर दसऱ्याच्या दिवशी तसेच दादर येथे दिनांक ०६ डिसेंबर, २००५ रोजी चैत्य भूमीवर हजारो बांधवांना पुरी भाजीचा नाष्टा, चहापाणी व भोजन देण्यात येत आहे. गेले कित्येक दिवसांपासून मध्यवर्ती संघटनेच्या मार्फत हा उपक्रम चालू असून नाष्ट्याची सुरुवात पहाटे ६.०० वाजेपासून करण्यात येते तर भोजन व्यवस्था मध्यरात्रीपर्यन्त चालू असते. जवळ जवळ १५ ते १७ हजार बांधव याचा लाभ घेत असतात.

येत्या दसऱ्याच्या दिवशी नागपूर येथील दीक्षा भूमीवर दरवर्षीप्रमाणे नाष्टा, चहापान व भोजनाची व्यवस्था संबंधित बांधवांसाठी करीत असून या कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे शिधा मिळणेबाबत विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशील | मागणी |
|---|---|---|
| ०१ | तांदूळ | २० क्विंटल |
| ०२ | आटा | १० क्विंटल |
| ०३ | तेल | १० डबे |
| ०४ | साखर | १ पोते |
| ०५ | चहा पावडर | ५० किलो |
| ०६ | बटाटे | १०० क्विंटल |
| ०७ | कांदे | १०० क्विंटल |
| ०८ | मसाला-तिखट | १० किलो |

यावर सविस्तर चर्चा होऊन, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी मागणी केल्याप्रमाणे बटाटे, कांदे इत्यादी नाशवंत वस्तू वगळता उर्वरित रुपये ५०,०००/- पर्यन्त वस्तू शिधा स्वरुपात मदत देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही -प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८. स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थान परिसरात शाखा सुरु करणेसाठी साईनाथ छाया इमारतीत लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर हॉल देणेबाबत**

**निर्णय क्र.६३९.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था ,शिर्डी येथे सिटी सर्व्हे नं.३२३ व ग्रामपंचायत मिळकत नं.८०२ मध्ये जूनी साईनाथ छाया इमारतीचे जागेवर संस्थानने नव्या इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

या इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास आले असून शिर्डी येथे येणाऱ्या देशी विदेशी साईभक्तांचे सोईसाठी व जनतेच्या सोईसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेने शिर्डी येथे त्यांचे शाखेसाठी कार्यालय सुरु करणार असल्याचे बँकेतर्फे सांगणेत आले असून याकामी संस्थानकडून जागा मिळणेबाबत दिनांक १३.०७.२००५ चे पत्रान्वये विनंती केलेली आहे.

साईनाथ छाया इमारतीतील पहिला मजला स्टेट बँक ऑफ इंडिया यांना दिल्यास योग्य राहील. प्रस्तूत इमारत संस्थानचे परिसराजवळ येत असल्याने ही सर्वाच्या सोईच्या दृष्टीने योग्य आहे. त्यामूळे लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर स्टेट बँक ऑफ इंडिया यांना १२ महिन्याचे कालावधीसाठी देता येईल. याकामी भाडे सरकारी पी.डब्लू.डी. खाते किंवा उभयतांनी विचार विनिमय करुन लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यावर चर्चा होऊन रुपये २५,०००.०० मासिक लायसेन्स फी आकारुन इमारतीचा पहिला मजला १२ महिनेसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेस सदरचा कालावधी नंतर पुढील कालावधीसाठी ज्या त्या वेळी विचार विनिमयाने निर्णय घेता येईल.

(कार्यवाही-प्रशासनशाखा- विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२९. मंदिर परिसरातील सभाकुंड येथे पॉलिमर कोटेड पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत**

**निर्णय क्र.६४०.** मंदिर पुर्नविकास प्रकल्पामध्ये मंदिराचे उत्तर बाजूस सभाकुंड व स्टेज उभारण्यात आलेले आहे. सदर सभाकुंडावर स्लॅब नसल्यामूळे उत्सवाचेवेळी "श्री" चे समोर हजेरी लावणेसाठी कलाकारांचा कार्यक्रम मुखदर्शन हॉलमधील स्टेजवर होतात. परंतू आता सभाकुंडावर आर.सी.सी.स्लॅब टाकण्यात आलेले असल्याने सदरचे कलाकारांचे हजेरी लावण्याचे कार्यक्रम व इतर कार्यक्रम सभाकुंडाचे ठिकाणी घेता येतील. सभाकुंडाचे मध्यभागी सध्या असलेला कारंजाची साईज कमी असल्याने तो काढून व त्या ठिकाणी असलेली झाडे काढून त्याठिकाणी पॉलिमर कोटेड पेव्हींग ब्लॉक बसविता येईल.

मंदीर परिसरातील कास्ट आयर्न कंम्पाऊड वॉलचे काम करीत असलेले ठेकेदार मे.एन.बी. औताडे, पोहेगांव यांचेकडून सदर काम करुन घेता येईल.

ठेकेदार मे.एन.बी.औताडे, पोहेगांव यांचेकडून करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,८५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच सभाकुंडातील जुना कारंजा काढून त्या ठिकाणी १२' x १२'साईजमधील बांधकाम करुन त्यामध्ये MIST + ARETING JET TYPE FOUNTAN तयार करणेबाबत चर्चा झाली. अशाप्रकारे फाऊंटनचे काम करणाऱ्या एजन्सीजकडून दर मागविण्यात आले होते. त्यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| ०१. | नेलट्रॉनिक्स, पुणे | रुपये १,३५,०००/- |
| ०२. | फाऊंट्रॉनिक्स,अहमदनगर | रुपये १,५२,५००/- |
| ०३. | एक्वाट्रॉनिक्स, अहमदनगर | रुपये १,५५,५००/- |

उपरोक्त पैकी अ.नं.०१ चे मे. नेलट्रॉनिक्स, पुणे यांचे दर रुपये १,३५,०००/- निम्नतम आहेत. त्यांचेकडून कारंजा बसविण्याचे काम करुन घेण्यात यावे.

सदरचे काम दिनांक १०.१०.२००५ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे नियोजित भेटीपूर्वी पूर्ण करण्यात यावे. तसेच याकामी आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांची नेमणूक करण्यात यावी असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३०. मे.आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचे फी बाबत.**

**निर्णय क्र.६४१.** आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्,श्रीरामपूर हे सन १९९० पासून संस्थानचे बांधकाम प्रकल्पांाठी आर्किटेक्ट म्हणून सेवा देत आहेत. सदर कामासाठी त्यांना सुरुवातीपासून कामाचे किंमतीचे १% इतकी फी देण्यात येत आहे. सध्या संस्थानतर्फे नेमण्यात आलेल्या इतर आर्किटेक्ट यांना कामाचे किंमतीच्या २% इतकी फी देण्यात येत आहे.

आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी त्यांचे दिनांक ०३.०९.२००५ चे पत्रान्वये कॉम्प्युटर स्टेशनरी,प्रिंटींग तसेच कर्मचारी पगार, विद्युत व टेलिफोन बील, प्रवास खर्च इत्यादी खर्चात गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने सध्या देण्यात येत असलेली १% आर्किटेक्ट फी ऐवजी २% आर्किटेक्ट फी मिळावी अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस् ,श्रीरामपूर हे सन १९९० पासून संस्थानला आर्किटेक्ट म्हणून सेवा देत आहेत. त्यांना सुरुवातीपासून कामाचे किंमतीचे १% इतकी फी देण्यात येत आहे. सध्या संस्थानतर्फे नेमण्यात आलेल्या इतर आर्किटेक्ट यांना कामाचे किंमतीच्या २% इतकी फी देण्यात येत आहे.तरी संस्थानतर्फे नेमण्यात आलेल्या इतर आर्किटेक्टप्रमाणे यापूढे संस्थानतर्फे नव्याने देण्यात येणाऱ्या बांधकामासाठी आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांना कामाचे किंमतीचे २% आर्किटेक्ट फी देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३१. नवीन नियोजित रुग्णालयाचे नावाबाबत.**

**निर्णय क्र.६४२.** दि.२३/०८/२००४ रोजी नव्या विश्वस्त सभेचे कार्य सुरु झाले. कार्यभार सांभाळल्यानंतर त्यांच्या नजरेसमोर रुग्णालयाची नूतनीकरण केलेली भव्य इमारत होती. यामध्ये काहीतरी नाविन्यपूर्ण कार्य करावे हा उद्देश समोर ठेऊन या नव्या इमारतीत उच्च श्रेणीच्या सेवा देता याव्या व या सोबत चांगल्या प्रतीच्या सामान्य सेवा सशुल्क देता याव्या असा विचार सुचला व जुने रुग्णालय सध्याच्या स्थितीत धर्मादाय उपचारासाठी सुरुच ठेवावे असे नियोजन ठरविले गेले. ज्यायोगे धर्मादाय १८० पलंगाचे रुग्णालय व सामान्य सेवा सहीत उच्च श्रेणीच्या सेवा देणारे २०० पलंगाचे रुग्णालय नव्या इमारतीत असावे, या सशुल्क रुग्णालयातून मिळणा-या लाभातून धर्मादाय रुग्णालयाचा खर्च निभावता यावा म्हणजे दोन्ही रुग्णालये मिळून ते एक स्वतंत्र, आर्थिकदृष्टया स्वयंचलित एकक निर्माण व्हावे ज्यामुळे पुढील काळात या रुग्णालयांना धर्मार्थ पेटी उत्पन्नावर कमीतकमी अवलंबून राहावे लागेल. यात पलंगांची संख्या वाढून निरनिराळया थरातील रुग्णांची सेवा शक्य होऊ शकेल व जनतेला वाढीव सोयींचा व सेवांचा लाभ घेता येईल. धर्मादाय रुग्णालयाचे नाव पूर्वीपासूनच श्री साईनाथ रुग्णालय असे आहे. नव्या रुग्णालयाच्या नावासंबंधी विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील नावांचा किंवा आणखी नव्या सुचविल्या जातील अशा नावांचा विचार होणे गरजेचे असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

१) श्री साईनाथ वरिष्ठ सुविधा रुग्णालय
२) श्री साईनाथ उच्च सेवा रुग्णालय व संशोधन केंद्र
३) Shri Sai Medical Centre

४) Shri Sai Super Speciality Centre
५) श्री साईनाथ उच्च श्रेणी सेवा रुग्णालय
६) श्री साईनाथ उच्च वैद्यक प्रतिष्ठान
७) श्री साईनाथ नुतन सेवा रुग्णालय
८) श्री साईनाथ सुपर हॉस्पीटल
९) श्री साई वैद्यक नव सेवा केंद्र
१०) श्री साईनाथ ग्रामीण वैद्यक प्रतिष्ठान
११) श्री साईनाथ वैद्यकीय उच्च सेवा प्रतिष्ठान
१२) श्री साईनाथ उच्च चिकित्सा केंद्र
१३) श्री साई विशेष सेवा रुग्णालय
१४) श्री साईनाथ वरिष्ठ सेवा रुग्णालय
१५) श्री साई नव चिकित्सालय
१६) Shri Sainath Memorial Medical Institute (For Super Services)
१७) श्री साईनाथ वैद्यकीय निदान व उपचार प्रतिष्ठान
१८) श्री साई नर्सिंग होम
१९) श्री साई सुश्रुशा केंद्र
२०) श्री साईनाथ वैद्यक सेवा व संशोधन संस्था
२१) श्री साई उच्च वैद्यकीय केंद्र व संशोधन संस्था
२२) श्री साईनाथ वरिष्ठ चिकित्सा संस्था
२३) Shri Sainath MultiSpeciality Hospital
२४) श्री साईनाथ बहुविध सेवा रुग्णालय

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे नियोजित रुग्णालयास "श्री साईबाबा हॉस्पीटल "असे नांव देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३२.** **थालासेमिक आजाराचे औषधोपचारासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत श्रीमती साधना सुधीर पोकळे, मुंबई यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.६४३.** श्रीमती साधना सुधीर पोकळे, घाटकोपर (पूर्व) मुंबई यांनी त्यांचे दिनांक ०३.०८.२००५ चे पत्रान्वये त्यांचा मुलगा चि.विशाल सुधीर पोकळे हा १५ वर्षाचा असून तो जन्मापासूनच "थालासेमिक (Thalassemic)या असाध्य रोगाने आजारी आहे. सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई येथे त्याच्यावर उपचार सुरु आहेत. मी परित्यक्ता असून मिळेल त्या रोजगारावर काम करते. मासिक उत्पन्न रुपये १२००/-आहे. गेली १५ वर्षापासून मुलाच्या खर्चाचा भार उचलित आहे.

अर्जासोबत त्यांनी सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई यांचे खर्चाचे प्रमाणपत्र सादर केले असून उपचारासाठी रुपये १६,०००/- ते २०,०००/- ची तातडीची आवश्यकता असलेबाबत कळविले आहे.

श्रीमती पोकळे यांना आर्थिक मदत देणेबाबत मा.विश्वस्त श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांनी शिफारस केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,एक विशेष बाब म्हणून थालासेमिक आजाराचे औषधोपचारासाठी संस्थान नियमानुसार श्रीमती साधना सुधीर पोकळे, मुंबई यांना आर्थिक मदत देण्यात यावी असें ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३३.** **श्री तुकाराम शंकरराव गोंदकर व श्री वसंत महादू गोंदकर यांचे जागेबाबत.**

**निर्णय क्र.६४४.** श्री तुकाराम शंकरराव गोंदकर यांची समाधी मंदिराजवळ असलेली जागा व श्री वसंत महादू गोंदकर यांची संस्थानचे कनकुरी साठवण तलावाजवळील जागेबाबत त्यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांना प्रदान करणेत आले.

(कार्यवाही- विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३४.** **संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक फी च्या परताव्याबाबत**

**निर्णय क्र.६४५.** संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्यांना देण्यात येणाऱ्या फी परताव्याबाबत सुधरित नियमावली तयार करणेची जबाबदारी मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष व मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी स्वीकारली. सुधारित नियमावली तयार झालेवर ती व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे निमगांव को-हाळे, कनकुरी व शिर्डी येथील जमीन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६४६.** मा व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक १०-१२/०४/२००३ रोजी निर्णय क्रमांक १२५ खालीलप्रमाणे झालेला आहे. " ... यावर सविस्तर चर्चा होऊन, उच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील उर्वरित ७६ हेक्टर १५ आर जमीन देखील संपादन करण्यास संस्थानची (मा.उच्च न्यायालयाने अनुकूल कॉल दिल्यास ) तयारी आहे. असे शेती महामंडळास कळविणेत यावे असे ठरले "

उपरोक्त ठरावाप्रमाणे मा. मुख्य कार्यकारी ( प्रशासन ) महाराष्ट्र शेती महामंडळ पुणे यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी ०२/ ४३००/२००३ दिनांक १७/०५/२००३ अन्वये कळविलेले आहे. शेती महामंडळाच्या जमिनीबाबत मा. नामदार हायकोर्ट,मुंबई खंडपीठ औरगांबाद येथे दाखल क्रमांक ३४९१/८९ ३३९५/९१,१६९/ ९४, व ३९९९/९८ चे निकाल झालेले आहेत. शेती महामंडळ व शासनाने शेती महामंउळाच्या जमिनी निर्गत करू नये म्हणून दिलेला अंतिरिम आदेश रद्द झालेला आहे. स्थावर व्यवस्थापक, लक्ष्मीवाडी मळा, यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक लक्ष्मी/प्रशाजमीन/ सासशि/०४-०५/१९४ दिनांक १७/०८/२००४ अन्वये मौजे निमगांव को-हाळे शिर्डी व कनकुरी येथील शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राची माहिती कळविलेली आहे.

शेती महामंडळाचे गांव निहाय उपलब्ध असलेल्या क्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | गावांचे नांव | एकूण गट नंबर | क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|---|
| १ | निमगांव को-हाळे | १७ | ६३.०९ |
| २ | शिर्डी | ०२ | ११.८२ |
| ३ | कनकुरी | ०३ | ०६.६५ |
| | | | **८१.५६** |

मौजे निमगांव को-हाळे येथील शेती महामंडळाची भूसंपादनाने ४४.७९ आर (अतिक्रमण क्षेत्र हेक्टर ०-९५ ताब्यात मिळालेली नाही ) जमीन ताब्यात आलेली आहे. परंतु सदरचे क्षेत्र विखुरलेले असून काही गट नंबर येथील क्षेत्र फारच छोटे आहे. त्यामुळे त्या ठिकाणी मोठी योजना राबविता येत नाही त्यासाठी आणखी क्षेत्राची आवश्यकता आहे. मौजे निमंगाव को-हाळे येथील एकंदर १७ गट नंबर मधील क्षेत्र हेक्टर ६३-०९ आर भूसंपादनाने मिळाल्यास सलग क्षेत्र (Compact block) होईल. त्यामुळे सदरचे क्षेत्र घेणे आवश्यक आहे. मौजे निमगांव - को-हाळे येथील प्रस्तावित क्षेत्राची तीन विभागात वर्गवारी केली. त्याबाबत तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | तपशील | भूसंपादनाने घ्यावयाचे क्षेत्र **हेक्टर आर** |
|---|---|---|
| अ) | ज्या गट नंबर मधील काही क्षेत्र भूसंपादनाने मिळालेले असून उर्वरित क्षेत्राची मागणी केली आहे असे गट नंबर ८५,२३८, २४५, २५०, २३४ | १८.९१ |
| ब) | पूर्वी भूसंपादनाने घेतलेल्या गट नंबर लगत आता भूसंपादनाने घ्यावयाचे गट नंबर ८६, १७१,१८०,१८१/१,१८१/२, ८९, १७०, १८४, ९०/२, ८४/१, १८४/१ | ४३.७७ |
| क) | अ व ब मध्ये प्रस्तावित केलेल्या गट नंबर लगत असलेला गट नंबर १७७ | ००.४१ |
| | **एकूण** | **६३.०९** |

**कनकुरी येथील जमिनीचा तपशील तक्ता क्रमांक ---**

| अ.नं | गट नंबर | तपशी ल | **क्षेत्र हेक्टर आर** |
|---|---|---|---|
| १ | गट नंबर ८८, १०७ | कनकुरी,पिपंळवाडी व संस्थानच्या संयुक्त पाणीपुरवठा योजनेच्या साठवण तलावाजवळ आहेत. भविष्यात वाढीव पाणीपुरवठा योजना अंमलात आल्यास हया दोन्ही गटाच्या क्षेत्राचा साठवण तलावासाठी उपयोग होईल्. | **५.९९** |
| २ | गट नंबर १०४ | संस्थानच्या विविध उपक्रमासाठी उदा. कर्मचारी | **०.६६** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निवास अथवा इतर कामासाठी | |
| | | **एकूण** | **६.६५** |

मौजे शिर्डी येथील गट नं १५९ व १६१ हेक्टर एकमेकास लागून आहेत या दोन्ही गट नंबर चे क्षेत्र हेक्टर ११-८२ आर आहेत सदरचे क्षेत्र संस्थानच्या विविध उपक्रमासाठी उदा. शैक्षणिक संकूल, भक्त निवास अथवा अन्य कामांसाठी उपयुक्त आहे.

मौजे निमगांव को-हाळे, कनकुरी,शिरडी येथील गावनिहाय प्रस्तावित हे संपादित करावयाच्या क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | गावाचे नांव | संपादित करावयाचे क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|
| १ | निमगांव को-हाळे<br>अ) १८.९१<br>ब) ४३.७७<br>क) ००.४१ | **६३.०९** |
| २ | कनकुरी | ०६.६५ |
| ३ | शिर्डी | ११.८२ |
| | **एकूण** | **८१.५६** |

उपरोक्त जमिनी हया संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनीलगत आहे. तसेच मौजे कनकुरी येथील जमिनी हया पाणीपुरवठा योजनेलगत आहेत.मौजे शिरडी येथील जमिनी संस्थानचे विविध उपक्रमासाठी उपयुक्त आहेत. या सर्व जमिनी शेतीमहामंडळाच्या मालकीच्या आहेत सदरच्या जमिनी भूसंपादनाने घेतल्याने संस्थानचे विकासकामासाठी त्यांचा उपयोग होणार आहे.

खालील बाबीवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

१) मौजे निमगांव को-हाळे येथील हेक्टर ६३.०९ आर, शिर्डी येथील हेक्टर ११.८२ आर, कनकुरी येथील हेक्टर ०६.६५ आर अशी एकूण हेक्टर ८१.५६ आर शेती महामंडळाची असलेली जमीन भूसंपादनाने घेणे .

२) उपरोक्त जमिनी बाबत भू संपादनाने घेणेसाठी शासनाची परवानगी मिळणेसाठी कार्यकारी अधिकारी साहेब यांनी शासनाशी पत्रव्यवहार करणे..

३) शासनाची प्रशासकीय मंजूरी आलेनंतर मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे भू संपादनाचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी पाठविणे.

४) मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर किंवा भू संपादन अधिकारी यांनी नुकसान भरपाई पोटी अनामत म्हणून रक्कम मागणी केल्यास ती देण्याबाबत मंजूरी देणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी मौजे निमगांव को-हाळे येथील हेक्टर ६३.०९ आर, शिर्डी येथील हेक्टर ११.८२ आर, कनकुरी येथील हेक्टर ०६.६५ आर अशी एकूण हेक्टर ८१.५६ आर शेती महामंडळाची असलेली जमिन भूसंपादनाने घेण्यात यावी असे ठरले .

(कार्यवाही-प्रशासनशाखा विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा विषय नं.३६.** **आयकर विषयक तरतूदींन्वये अखर्चित उत्पन्नाविषयी निर्णय घेणेबाबत..**

**निर्णय क्र.६४७** **अ)** श्रीसाईबाबा संस्थान,शिर्डी यांस सर्व माध्यमांद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा, १९६१ चे कलम १०(२३) (सी) (V) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

" Provided also that the fund or trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (iv) or sub clause (v) [or sub-clause (vi) or sub-clause (VIA)]

(a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April, 2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

वरील सुधारित तरतूदींनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तसे शक्य न झाल्यास या ८५% पैकी अखर्चित रक्कम त्यापुढील पाच आर्थिक वर्षांमध्ये खर्च करता येईल व दरम्यान ह्या रक्कमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पद्धतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील पाच वर्षांच्या मुदतीसाठी ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र उत्पन्न म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कलम ४ अन्वये त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

**ब) १.** उपरोक्त तरतूदींनुसार सन २००१-२००२, २००२-२००३ व २००३-०४ या आर्थिक वर्षातील संस्थानचे आयकर विवरण, आयकर कार्यालयाकडे दाखल करतांना अखर्चित उत्पन्न जे पुढील पाच वर्षामध्ये खर्च करावयाचे आहे, ते खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेले आहे.

**सन २००१-२००२ रुपये - २२,९५,९३,६०६/-**

**सन २००२-२००३ रुपये - २८,०८,३६,२१२/-**

**सन २००३-२००४ रुपये - ३२,५७,९९,१९५/-**

ह्या अखर्चित उत्पन्नाच्या रकमा, उपरोक्त तरतूदींन्वये पुढील पाच आर्थिक वर्षांमध्ये कोणकोणत्या उद्दीष्ठांवर खर्च करण्यात याव्यात याविषयी मा.व्यवस्थापन मंडळाच्या / समितीच्या दि. १५-१६ ऑक्टोंबर,२००२, दि.३-५ ऑक्टोंबर,२००३ व दि. २१ ऑक्टोबर, २००४ रोजी झालेल्या सभेतील अनुक्रमे निर्णय क्र.५०९, निर्णय क्र.४३७ व निर्णय क्र. ३८ मध्ये सविस्तर नियोजन नमूद करण्यात आलेले आहे. मा.व्यवस्थापन मंडळाचे / समितीचे हे निर्णय सन २००१-२००२, २००२-२००३ व २००३-०४ या आर्थिक वर्षांसाठीच्या संस्थानच्या आयकर विवरण पत्रासोबत, आयकर विभागाकडे सादर करण्यात आले आहे.

२. सन २००३-२००४ या आर्थिक वर्षामध्ये मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २१ ऑक्टोबर, २००४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र. ३८ अन्वये रु. ११,८५,३८,१४६/- एवढा खर्च सन २००१-२००२ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नातून खर्च केल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. सदरचा खर्च वजा जाता दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी सन २००१-२००२ या आर्थिक वर्षातील उर्वरीत अखर्चीत उत्पन्न रु. ११,१०,५५,४६०/- एवढे होते.

क) सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण मे.एन.पी.रेडीज ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांनी पूर्ण केले असून, सदर लेखापरिक्षण अहवालाची प्रत दि.१२ ऑगष्ट, २००५ रोजी संस्थानकडे प्राप्त झाली आहे. सदर अहवाल मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४ ऑगष्ट,२००५ रोजी झालेल्या सभेत नोंद घेण्यासाठी ठेवण्यात आला होता. त्याची नोंद निर्णय क्र.४७१ अन्वये घेण्यात आलेली आहे.

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या एकूण खर्चापैकी काही खर्च मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.१५-१६ ऑक्टोंबर, २००२ व दि. ३-५ ऑक्टोबर, २००३ च्या सभेतील निर्णय क्रमांक अनुक्रमे ५०९ व ४३७ मधील नमूद नियोजनानुसार, सन २००१-२००२ व सन २००२-२००३ या आर्थिक वर्षाच्या अखर्चित उत्पन्नातून केला असल्याबाबत दर्शविण्यात आले आहे. याबाबत संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे.एन.पी.रेडीज ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई व संस्थानचे आयकर सल्लागार मे.एस.एस.गणपूले ॲण्ड कंपनी, मुंबई यांचा सल्ला घेण्यात आला आहे. त्याविषयीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१. सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाच्या अखर्चीत उत्पन्नातुन दर्शविण्यात आलेला खर्च :

| अ.नं. | खर्चाचा तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | साईनाथ रुग्णालय इमारतीतील फेरबदल व वाढीव काम | २,२७,९७,२४३/- |
| २. | साईनाथ छाया इमारत | २५,६३,७८१/- |
| ३. | मंदीर परिसरातील वाढीव बांधकाम | १२,८२,००८/- |
| ४. | साईप्रसाद इमारत नं. २ व कुंपण भिंत | १२,२३,९९६/- |
| ५. | भक्तांसाठी स्वागत कक्ष | ४,९५,२६६/- |
| ६. | साईनाथ रुग्णालय यंत्रसामुग्री, फर्निचर, संगणक इ. | ५७,८६,७७१/- |
| ७. | साईनाथ रुग्णालयाकरीता रुग्णवाहिका | १०,८०,०००/- |
| ८. | शैक्षणिक संकुलासाठी स्कुल बस, फर्निचर इ. खरेदी | ११,७०,०३७/- |
| | **एकूण :** | **३,६३,९९,१०२/-** |

२. सन २००२-२००३ या आर्थिक वर्षाच्या अखर्चित उत्पन्नातून दर्शविण्यात आलेला खर्च :

| अ.नं. | खर्चाचा तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विविध रस्त्यांची विकास कामे | ३,०७,०३,६१६/- |

| | | |
|---|---|---|
| २. | ए टाईप निवासस्थान | ४४,४२,०५१/- |
| ३. | मध्यवर्ती भांडार इमारत | ११,५१,५२१/- |
| | **एकुण :** | **३,६२,९७,१८८/-** |

ड) उपरोक्तप्रमाणे मागील आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाचा काही भाग खर्च झाल्याचे दर्शविल्यानंतर सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील एकूण अखर्चित उत्पन्न रुपये ३७,१०,९०,७७६/- एवढे दर्शविण्यात आले आहे. सदरचे अखर्चित उत्पन्न परिच्छेद "अ' व "ब' मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार पुढील पाच वर्षात संस्थानचे ध्येय व उद्दीष्टांवर खर्च करणे बंधनकारक आहे.

सदर अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दिष्टांसाठी खर्च करण्यात येईल याबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा तपशील-वजा-निर्णय दि.३१ ऑक्टोंबर, २००५ पूर्वी सादर करावयाच्या आयकर विवरणासोबत जोडणे बंधनकारक आहे. यादृष्टीने पुढील पाच वर्षांमध्ये कोणकोणते मोठे प्रकल्प हाती घेण्यात येतील याविषयी मा.व्यवस्थापन समितीने जे निर्णय घेतलेले आहेत किंवा कल्पना मांडण्यात आलेल्या आहेत त्या अनुषंगाने नियोजनाचा ढोबळ मसूदा सोबत जोडण्यात येत आहे.

१. उपरोक्त परिच्छेद "ब आणि क' मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २००१-२००२ च्या अखर्चित रक्कम रुपये ११,१०,५५,४६०/- पैकी रक्कम रुपये ३,६३,९९,१०२/- मात्र व सन २००२-२००३ च्या अखर्चित रक्कम रुपये २८,०८,३६,२१२/- पैकी रक्कम रुपये ३,६२,९७,१८८/- मात्र सन २००४-०५ या आर्थिक वर्षामध्ये खर्च झाल्याचे दर्शविणेबाबत.

२. उपरोक्त परिच्छेद "ड' मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील अखर्चित रक्कम रुपये ३७,१०,९०,७७६/- मात्र पुढील पाच आर्थिक वर्षांमध्ये खर्च करण्याविषयी खालीलप्रमाणे निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

Shri Saibaba Sansthan is contemplating to take up various project towards the fulfillment of its objects, the cost of which is estimated at Rs. 201 Crores. The execution of these projects would take a period of 4-5 years.

The Sansthan is likely to generate a surplus for the accounting year ended on 31st March 2005. Such surplus could be expended for the fulfillment of these projects.

It is, therefore, recommended that an amount to the extent of Rs 201 Crores or the surplus, whichever is lower be set aside out of the surplus for the year, to be spent on the projects as resolved hereinafter.

An application in this regard be also made to the Income Tax Assessing Officer, to set aside the funds in terms of section 11(2) of the Income Tax Act,1961.

**RESOLUTION**

"Resolved that such surplus as is available for the year ending 31st March, 2005 shall be accumulated or set apart as per requirements of section 11(2) of the Income Tax Act, 1961 and shall be spent on the following objects and activities of the Sansthan :

( Rs. In Crores )

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1. | To create additional infrastructure of various essential services as well as residential and other facilities for Sai Devotees | 4.00 |
| 2. | To expand / add to the existing educational technical vocational and professional training facilities set up by the sansthan by starting new institutions, courses etc. | 3.00 |
| 3. | To undertake appropriate renovation of existing Buildings and facilities thereat by suitable expansion, additions and alterations of the said buildings | 5.00 |
| 4. | To provide additional rooms / lodging facilities to Sai devotees by constructing new Bhaktaniwas buildings, prasadalaya and other Buildings etc. | 80.00 |
| 5. | To purchase additional machinery, equipment, furniture, apparatus for medical, education, prasadalaya, and other various departments | 15.00 |
| 6. | Construction of an additional buildings for Godowns / Marriage Hall / School / Staff Quarters and other necessary purposes. | 30.00 |
| 7. | Construction of an addtional building for medical and education purpose for provision of better, modern and additional medical and education facilities. | 10.00 |
| 8. | Purchase of Land for various development works | 20.00 |

| | | |
|---|---|---|
| 9. | Grant in Aid to the local infrastructural development works i.e. various roads, Primary School, Parking area, Garden etc. and other necessary development work in Shirdi Nagarpanchayat area | 15.00 |
| 10. | To develop Garden for Sai devotees. | 15.00 |
| 11. | Additions and Modernisation in existing audio – visual facilities and install additional devotee facilitation, installations, services / equipments and computerisations with the Temple Complex / Education Complex and other buildings of sansthan. | 4.00 |
| | TOTAL | 201.00 |

FURTHER RESOLVED THAT an application be made to the Income Tax Office seeking permission U/s 11(2) of the Income Tax Act, 1961 and a copy of this Resolution be provided along with the application for the purpose of their record".

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७. नियोजित श्री साई भक्तनिवास व कर्मचारी निवासस्थाने बांधकामाचे निविदापूर्व बैठकीबाबत.**

**निर्णय क्र.६४८.** शिर्डी सर्व्हे नं. १४८/२ मधील नियोजित श्री साई भक्तनिवास व मौजे निमगांव-कोऱ्हाळे गट नं. १६९ मधील नियोजित कर्मचारी निवासस्थाने बांधकामाच्या निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा धारकांनी आर्थिक बाबींविषयी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. निविदेसोबत सादर करावयाची बयाना रक्कम (E.M.D.) मूदत ठेव पावतीच्या स्वरुपात स्विकारणेत येऊ नये. सदर रक्कम निविदा शर्तीनुसार डी.डी. चे स्वरुपात स्विकारण्यात यावी.

२. मोबीलायझेशन अॅडव्हान्स देण्यात येऊ नये.

३. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दि. १६.०५.२००५ चे शासन निर्णयानुसार Price Variation Clause निविदेत सामाविष्ट करण्यात यावा.

४. सिलबंद निविदा उघडल्यानंतर व्यवस्थापन समितीव्दारे सर्व निविदा सादरकर्त्यांशी वाटाघाटी करण्यात याव्यात. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८. श्री साईबाबांचे तैलचित्र तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.६४९.** स्थानिक तैलचित्र कलाकार श्री हेमंत शिवाजी वाणी, शिर्डी यांनी श्री साईबाबांचे तैलचित्र सादर केले. त्यांनी सादर केलेल्या तैलचित्राबाबत उपस्थित मा.सदस्यांनी समाधान व्यक्त केले. श्री साईचरित्राचा अभ्यास करुन काही प्रासंगिक तैलचित्रे काढण्यास मान्यता मिळणेबाबत श्री वाणी यांनी विनंती केली. याबाबत चर्चा होऊन त्यांचेकडून ३'x४' साईजची दहा तैलचित्रे तयार करुन घेणेस मान्यता देण्यात आली. त्यांचे मानधनाबाबत नंतर निर्णय घेण्यात यावा असे ठरलें.(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.५७९ ते ६४९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरित/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

*Saturday*
*08102005*

{14} 02.10.2005 Shirdi.